# माणूस

शनिवार । २० नोव्हेंबर १९७६ । साठ पैसे



I shall resign the Presidency effective at noon tomorrow.......

हे भाषण करण्यापूर्वी एक्झिक्युटिव्ह ऑफिस बिल्डिंगमध्ये काँग्रेसमधील महत्त्वाच्या व्यक्ती जमा झाल्या होत्या. त्यांना भेटण्यासाठी निक्सन तिकडे वळला. प्रत्येकाच्या जवळ जाऊन, हस्तांदोलन करीत तो निरोप घेत होता. त्याचं अंतःकरण पिळवटून आलं होतं. जीव मुठीत धरून तो पुढे जात होता. निक्सनचे खास सिनेटर्स स्नेही निरोप देण्यास जमा झाले होते. निक्सनला पाहिले आणि त्यांना रडूच कोसळले. निक्सनचे डोळे देखील ओलावले होते.

प्रत्येकाजवळ जात निक्सन सांगत सुटला :

'I have let you down–मी तुमचा विश्वासघात केला–

विश्वासघात केला...............मला माफ करा'

शरीरावरचा त्याचा ताबा सुटला. उभा राहण्याचा ताण देखील त्याच्यात राहिला नाही. बॅरी गोल्डवॉटर निक्सनला धरून त्याच्याबरोबर चालला होता.

सगळीकडे रडारड—बोलणं नाहीच !

---

विसरत चाललेल्या निक्सन प्रकरणावर नव्या पुस्तकांच्या, कागदपत्रांच्या, माहितीच्या आधारे प्रकाश टाकणारी एक लेखमाला...

## अशी चौकशी....अशी फाशी !

पृष्ठ....१२

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक पंचविसावा

२० नोव्हेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


### "व्हाय नॉट दि बेस्ट ?"

# जिमी कार्टर

**प्रा. राम बिवलकर**

'माझं नाव जिमी कार्टर. १९७६ सालच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक मी लढवत आहे. यंत्रज्ञ आहे. धंदेवाला व्यापारी आहे. नियोजनकार आहे. वैज्ञानिक आहे. आज जॉर्जियाचा गव्हर्नर आहे. आणि सच्चा ख्रिश्चन आहे.'

१३ डिसेंबर १९७४ या दिवशी वॉशिंटन येथे बोलावलेल्या प्रेसकॉन्फरन्समध्ये जिमी कार्टर आपली ओळख करून देत होते. दक्षिणेतला हा जवळजवळ अज्ञात माणूस मोठ्या आत्मविश्वासाने बोलत होता. वृत्तपत्रप्रतिनिधी त्याचे बोलणे कौतुकाने ऐकत होते. वीस वर्षांपूर्वी गावच्या शाळेच्या कार्यकारी-मंडळात शिरून सामाजिक कार्याचा श्रीगणेशा केलेला हा माणूस राष्ट्राध्यक्ष होण्याची स्वप्ने पाहात होता. जॉर्जियाचा गव्हर्नर म्हणून निवडून येईपर्यंत राष्ट्राध्यक्ष कसा दिसतो, कसा वागतो हेही त्याने पाहिले नव्हते. १९५२ साली 'नॉटिलस्' नामक अणुपाणबुडी बांधण्याचा न्यूलंडनमध्ये राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी नारळ फोडला तेव्हा अमेरिकन नेव्हीतला एक लेफ्टनंट म्हणून राष्ट्राध्यक्षांचे त्याला दुरून दर्शन झाले होते एव्हढेच ! पण गव्हर्नर झाल्यावर रिचर्ड निक्सन, ॲग्न्यू, मॅक्गव्हर्न, वॉलेस, रॉकफेलर अशा मंडळींशी त्याच्या भेटीगाठी होऊ लागल्या. ही मंडळी अध्यक्षपदावर होती अगर इच्छुक होती. पण त्या मंडळीत मिसळतानाही जिमीला कधी इन्फीरिऑरिटी कॉम्प्लेक्स् वाटला नाही. 'आपण काही कमी नाही. थॉमस जेफर्सन किंवा जॉर्ज वॉशिंग्टनशी काही सामना नव्हता. सामनेवाल्यात आपण नक्कीच उजवे ठरू,' हा आत्मविश्वास गाठी होता. निवडणुकांचा, राजकारणाचा, शासकीय नियंत्रणाचाही अनुभव नावे जमा होता.

जेम्स् अर्ल कार्टर (ज्यू.) चा जन्म १ ऑक्टोबर १९२४ रोजी दक्षिणेतील जॉर्जिया राज्यातील प्लेन्स् नामक खेडेवजा शहरी झाला. घरातला तो वडील मुलगा होता. त्याला सारे जिमी म्हणत. तेच नाव त्याला आवडे. पुढे जॉर्जियाचा गव्हर्नर झाल्यावर विधेयकावरील त्याची सहीसुद्धा 'जिमी कार्टर' अशी असे. राष्ट्राध्यक्ष झाल्यावरही आपण अशीच सही करू, असा त्याचा विचार आहे. त्याचे बालपण प्लेन्स्-पासून तीन मैलांवर असलेल्या आर्चरी नामक छोट्या वाडीवर गेले. त्या वाडीची आजची लोकसंख्याही सारी ६८३ आहे. वाडीवरच्या ३० कुटुंबांपैकी श्वेतवर्णी फक्त दोन ! जिमीच्या वडिलांचे तिथे मोठे शेत आहे. गेल्या पाच पिढ्या कार्टर कुटुंब एक शेतकरी कुटुंब म्हणून ओळखले जाते. आर्चरीच्या शेतावरील जिमीची पिढी साचवी. शेतवाडी आणि एक छोटेसे वाण पामानाचे दुकान – ही चरितार्थाची साधने.

इथे जिमी वाढला. पहाटे ४ वा. उठावे. हाती मिणमिणता कंदील घेऊन खेचरामागे जावे. शेतात राबावे. शाळेत जावे. खेळावे, कुदावे. त्याचे सार मित्र कृष्णवर्णी होते. मित्रमित्र मिळून शिकारी करीत. मासे मारीत. नवनवीन गोष्टी शोधून काढीत. झोपड्या बांधीत..मधमाशांची पोळी काढीत. घोड्यांवरून रपेटी करीत. पत्त्यांचे अड्डे टाकीत. जीवन मुक्त होते. स्वच्छंद होते. उसाचे गुऱ्हाळ चालविण्याचा, खेचरे लावून नांगरट करण्याचा, गवत कापायचा, कलिंगडे जोपासायचा, कोंबड्या - बदकांची निगा राखायचा, मेंढ्या भादरून लोकर काढायचा, कपाशी वेचायचा, गाईंना पाजायचा, कुंपण घालण्याचा कसलाच कंटाळा जिमीला ठाऊक नव्हता. कामे करताना तांबडमातीने

अंग भरे, चोक्टावच्ची आणि किचाटूनींच्या खारटाणातून हिंडावे लागे. पण जिमी आणि त्याचे काळे दोस्त कुठल्याही कामात पुढे असत. दिवसभर बरोबर हुंदडणारी मुले फक्त चर्चमध्ये प्रार्थनेला जायची वेळ झाली की वेगळी होत. का कोण जाणे, जिमीला हे खटके. पण बोलता येत नसे. समाजाचे अलिखित, पण जखडून टाकणारे जाचक नियम कुणी तोडणे अशक्य होते. पण जिमीच्या आईनेच ते तोडायचा आदर्श जिमीपुढे उभा केला. ती उदारमतवादी होती. सुधारक होती. स्वतंत्र बुद्धीची होती. व्यवसायाने परिचारिका होती. आणि व्यवसायाची नीतिमत्ता पाळून, रंग-भेदाचा विचार न करता कुणाच्याही शुश्रूषेला धावत होती. तिला सारे 'मिस् लिलियन' या नावाने संबोधित. अमेरिकन पीस कोअरची कार्यकर्ती म्हणून वयाच्या ६७ व्या वर्षी ती भारतात दोन वर्षे राहिली होती. आज ती ७७ वर्षांची आहे. पण वागणे, बोलणे, मदतीला धावणे सारे चालू आहे. गावातला कुणी कृष्णवर्णीय दारी आला तर आपल्या घरी ती त्याचे प्रेमाने स्वागत करते. जिमीचा सनातनी बाप मात्र अशावेळी 'हॅलो' करून बाहेर निघून जाई. पत्नीची मते आणि वागणे त्याला मानवत नसे, पण तो त्याला विरोधही करीत नसे.

जिमी अशा आईच्या छायेत वाढला. त्यामुळे आजही त्याच्या मनात काळा–गोरा हा भेद चुकूनही येत नाही. जिमी मोठा होत होता. प्राथमिक–माध्यमिक शिक्षण संपले तेव्हा कॉलेज-शिक्षणाचा विचार त्याच्या मनात रुंजी घालीत होता. पण खाजगी कॉलेजात शिकणे परवडणे कठीण होते. शिवाय चुलता नेव्हीत होता. दुसऱ्या महायुद्धात तो जपान्यांच्या हाती लागला होता. वडिलांनीही आर्मी लेफ्टनंट म्हणून पहिल्या महायुद्धकाळात देशसेवा बजावली होती. परिणामतः आपण अन्नापोलीस येथे यु. एस. नेव्हल ॲकॅडमीमध्ये दाखल व्हायचा निर्णय जिमीने घेतला. १९४२ साली जॉर्जियामधील तांत्रिक महाविद्यालयात पूर्व-परीक्षेची तयारी करून १९४३ मध्ये तो नेव्हल ॲकॅडेमीत दाखल झाला. त्याच्या आयुष्याची पुढली १० वर्षे नौदलाच्या सेवेत गेली. दर्यावर्दी जीवन अंगवळणी पडले. तोफखाना कसा चालवायचा, जहाज कसे हाकारायचे, यांत्रिकी, नौदलाच्या हिकमती, अनेक गोष्टी तिथे शिकता आल्या. परदेशी भाषा म्हणून स्पॅनिश आत्मसात झाली. नेव्हीच्या टीममधून तो क्रॉसकण्ट्री धावला. १४० पौंडांखालच्या फुटबॉल टीममध्ये चमकला. दुसऱ्या महायुद्धाची धुमश्चक्री चालू होती. तेव्हा जिमी आणि त्याचे सहकारी एका जुन्या युद्धनौकेवर शिक्षण घेत होते. प्रत्यक्ष युद्धाच्या रणधुमाळीपासून दूर–हात शिवशिवत होते–जिद्द जागली होती. पण युद्ध दूर होते. हॅरी ट्रुमन यांनी हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबाँब टाकून युद्धसमाप्ती केली–तरी जिमीचे शिक्षणच चालूच होते.

१९५२ साली जिमीने आपल्याला अणु–पाणबुडीच्या प्रकल्पामध्ये स्थान मिळावे म्हणून अर्ज केला. कॅ. हिमन रिकोव्हर–मोठ्या हिमतीने विरोधाला तोंड देत हा कार्यक्रम यशस्वी करायला निघाले होते. जिमीचे अन्नापोलीस ॲकॅडेमीतले शिक्षण संपून तो स्नातक झाला होता. दोन वर्षे नौदलातली सागरी चाकरी त्याने बजावली होती. आता लेफ्टनंट झालेला जिमी १९४८ सालापासून पाणबुड्यांच्या जथ्याला मिळाला होता. अनेक पाणबुड्यांवर त्याने कामगिरी बजावली होती. पूर्व–आशियाई सागरात तो चार वर्षे कामगिरीवर होता. आता तो U.S.S. K.I. वर अंमलदार होता. अणु-पाणबुडी प्रकल्पांसाठी त्याची कॅ. रिकोव्हरने जी मुलाखत घेतली, ती जिमीच्या स्मरणात आजही अगदी ताजी आहे.

एका प्रशस्त खोलीत ती मुलाखत झाली. ती आठवण जिमी अशी सांगतो,

'त्या प्रशस्त खोलीत आम्ही दोघेच दोन तासांहून अधिक काळ बोलत बसलो होतो. माझ्या आवडीचे कुठलेही विषय मी चर्चेसाठी निवडावेत असे कॅ. रिकोव्हरने मला सांगितले. त्या काळी मला ज्याविषयी चांगले ज्ञान होते, असे विषय मी मोठ्या काळजीपूर्वक निवडले. चालू घडामोडी, दर्यावर्दी जीवन, संगीत, साहित्य, नौदली हिकमती, इलेक्ट्रॉनिक्स्, गनरी, किती तरी विषय मला चागले अवगत होते. पण कॅ. रिकोव्हरने या विषयावरच मला प्रश्न विचारायला सुरुवात करताच मी गडबडून गेलो. त्या खोचक प्रश्नांनी माझी खात्री पटवली की, आपण निवडलेल्या विषयातही आपल्याला फार थोडे कळलेले आहे. त्यांची धारदार नजर माझ्या डोळ्यांचा ठाव घेत होती. त्यांच्या चेहऱ्यावर त्या दोन–अडीच तासांत एखादीही स्मितरेषा झळकली नाही. त्या भेदक नजरेने मला थंडा घाम फुटला! शेवटी त्यांनी मला एक प्रश्न-विचारला,

'नेव्हल ॲकॅडेमीत तुझा कितवा क्रमांक आला?' प्रश्न ऐकून माझी छाती अभिमानाने फुगली. मी मोठ्या दिमाखाने उत्तरलो—

'महाशय, ८२० विद्यार्थ्यांत मी ५९ वा क्रमांक पटकावला!' मला वाटले होते. कॅप्टन पुढे सरकतील. हात पुढे करतील आणि माझे हार्दिक अभिनंदन करतील. पण तसे घडले नाही. उलट प्रश्न आला,

'डिड यू डू युवर बेस्ट?'

मी चटकन् म्हणत होतो–

'येस् सर–' पण मी कुणाजवळ बोलतोय हे क्षणात ध्यानी येऊन मी ते शब्द गिळले. म्हणालो–

'नाही नाही महाशय. आय् डिडंट ऑल्वेज् डू माय् बेस्ट'

त्यांनी बराच वेळ आपली तीक्ष्ण नजर माझ्याकडे लावली आणि म्हणाले,

'व्हाय नॉट?'

माझ्याजवळ या प्रश्नाला उत्तर नव्हते. त्यांनी तोंड फिरवले आणि मुलाखत संपली.

पण त्या क्षणापासून 'व्हाय नॉट दि बेस्ट?' हा जिमीच्या जीवनाचा हुंकार ठरला. त्याच्या निवडणुकीच्या धुमाळीचा परवलीचा शब्द तोच. अलीकडे त्याने आत्मचरित्र लिहिले, आहे त्याचे नावही हेच आहे.

कॅ. रिकोव्हरने तो प्रश्न जिमीला विचारला तेव्हा त्याने जे उत्तर दिले असेल ते पुरेसे ठरले असेल. कारण जिमीची अणुपाणबुडी–प्रकल्पासाठी निवड झाली. अणुभट्टी-तंत्रज्ञान आणि अणु–पदार्थविज्ञान या विषयाचाही तो ग्रॅज्युएट झाला. अमेरिकेच्या 'दि सी वुल्फ' नामक दुसऱ्या अणु–पाणबुडी वरील यांत्रिकी अंमलदार म्हणून त्याची नेमणूक व्हायचेही नक्की झाले. पण अणु–पाणबुडी प्रकल्पात एक वर्ष उलटले आणि 'दि सी वुल्फ' पाण्याखाली जायला साडे-

तीन वर्षे बाकी असताना जिमीच्या वडिलांना कर्करोगाने पछाडले. घरचा तैगार सांभाळण्यासाठी जिमीने घरी परतणे आवश्यक होते. समोर दिसत असलेले प्रमोशन सोडणेही कठीण होते. जिमीने खूप विचार केला आणि राजीनामा द्यायचे ठरविले. पत्नीला, रोझॅलिनला तो अविचार मान्य नव्हता. ती जिमीशी भांडली, रडली,पण जिमीचा निश्चय कायम होता. त्याने शांतपणे आपला नेव्हीतला संसार आवरला आणि रोझॅलिनला आणि तिघा मुलांना घेऊन तो प्लेन्सला परत आला. कर्करोगाने वडिलांचा बळी घेतला होता. शेतवाडी, जमीनजुमला, व्यापार आणि कुटुंब यांचा भार जिमीला उचलावा लागला.

पुढल्या दहा वर्षात जिमीने घरच्या धंद्याचे, शेतीवाडीचे आधुनिकीकरण केले. गावच्या शाळेच्या कार्यकारी मंडळावर जाऊन सामाजिक कार्याचीही मुहूर्तमेढ घातली. लवकरच तो स्कूल कमिटीचा अध्यक्षही झाला. १९६४ साली सार्वजनिक शाळांतून कलर–वाद पाळण्यास बंदी घालणारा अत्युच्च न्यायालयाचा निकाल आला. दक्षिणेत या निकालाने खळबळ माजली. 'गोऱ्या नागरिकांची मंडळे स्थापून गोऱ्या मुलांसाठी वेगळ्या खाजगी शाळा सुरू करण्याची, मोहीम सुरू झाली जिमीने या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. त्याने 'गोऱ्या नागरिक मंडळा'ची ५ डॉलर्सची वर्गणी देण्याचेही नाकारले. त्याच्यावर-त्याच्या धंद्यावर बहिष्कार घालण्याची भाषा तावातावाने सुनावली जाऊ लागली. कुटुंब भयभीत झाले. पण जिमी शांत होता.

'वादळ उठले तसे आपोआप शमले.'

'१९६२ साली, जिमीचा अकरा वर्षांनी लहान असलेला त्याचा छोटा भाऊ विली, धंद्यात हाताशी आला आणि जिमी कार्टर राजकारणात लक्ष घालायला मोकळा झाला वयाच्या सवतिसाव्या वर्षी जिमीने जॉर्जिया राज्याच्या सिनेटची निवडणूक लढविली. निवडणुकीची मोहीम त्याने जिद्दीने आखली. तो खेडोपाडी हिंडला. राज्याचा नैर्ऋत्य भाग त्याने अक्षरशः प्रचाराने विंचरून काढला. दोनशे वर्षे ज्या भागात कार्टर कुटुंब स्थायिक होते तिथली निवडणूक राजकीय कर्तृत्व गाजवायला सुपीक ठरावी असा कयास होता. पण सामना प्रस्थापित नेतृत्वाशी होतो. मतपेट्या उघडल्या आणि मतमोजणी झाली तेव्हा जिमी अक्षरशः मूठभर मतांनी पराभूत झाला होता. जिमीला आश्चर्य वाटले. त्याला आपल्या यशाची खात्री होती. मग कळ कुठे फिरली? पाठीत सुरा कसा खुपसला गेला? पण निकालाच्या कागदांनी उलगडा केला. एका कौण्टीमध्ये ३३३ मतपत्रिका दिल्या गेल्या होत्या. पण मतपेटीत ४२० मतपत्रिका सापडल्या होत्या. बहुतेक जादा मते जिमीच्या विरोधकाला पडली होतो! जिमीने निवडणूक अर्ज केला. अटलांटा येथील प्रख्यात वकील चार्लस् किर्बो यांना वकीलपत्र दिले. खटला गाजला. निकाल जिमीच्या बाजूचा लागला. जिमीच्या मतदार संघात पुन्हा निवडणूक घेण्याचा आदेश न्यायालयाने दिला. जिमीने हीही निवडणूक जिद्दीने लढविली आणि १५०० मते जादा मिळवून तो सिनेटवर निवडून गेला! आज किर्बो, जिमीचे जवळचे मित्र, राजकीय सल्लागार आहेत.

दोन दोन वर्षांच्या दोन आमदारकीच्या टर्म्स पूर्ण केल्यानंतर अमेरिकन लोकप्रतिनिधिमंडळाची निवडणूक लढविण्याचे जिमीने ठरविले. पण तेवढ्यात जॉर्जियाचे गव्हर्नर हृदयविकाराच्या दुखण्यामुळे निवृत्त झाले. आपल्या पक्षाने त्या जागेसाठी निवडणूक लढविण्यासाठी आपली नियुक्ती करावी म्हणून जिमीने विनंती केली. नियुक्ती मिळाली. जिमीने आणि त्याच्या कुटुंबाने ही निवडणूक जिंकण्यासाठी जिवाचे रान केले. पण वर्णविद्वेषी लेस्टर मेडॉक्स विजयी झाला. डोक्यावर कर्ज काढले होते. वजन २२ पौंडांनी घटले होते. महिन्याभरात त्याने जिद्द परत मिळवली. पुढली निवडणूक जिंकायची तर सारे राज्य पायातळी घालायला हवे होते. जिमीचे हे दौरे राजकीय होते. नवनव्या मंडळींशी स्नेहाचे धागे जुळत होते. याच अवधीत काळ्या–गोऱ्यांची प्रार्थना मंदिरे एक असावीत अशी खटपट करीत तो फिरत होता. पण प्लेन्समधील चर्चही काळ्यांना खुले करण्यात त्याला यश आले नाही. त्याच्या बाजूने घरातली ५ आणि आणखी एकाचे धरून फक्त ६ मते पडली. १९६८ आणि ६९ साली जिमीने पेन्सिल्व्हानिया व मेसाच्युसेट्स् या शहरांतून घराघराला मिशनरी म्हणून भेट दिली. पुढे प्युर्टोरिकन आणि क्यूबन लोकांतही त्याने काम केले. जिमीच्या लोकप्रियतेत या कामाचाही वाटा मोठा आहे.

जिमीच्या बहिणीने-रूथने आपले जीवन चर्चला अर्पण केले आहे. तिने एकदा जिमला विचारले,

'प्रभूसाठी तू वाट्टेल तो त्याग करायला तयार आहेस?'

'आहे ना?'

'बघ हं–राजकारण सोडशील?'

जिमीने विचार करून उत्तर दिले.

'ते जमणे कठीण आहे!'

१९६६ ते १९७० ही चार वर्षे जिमीला जॉर्जियाच्या गव्हर्नरपदाचे वेध लागले होते. या चार वर्षांत त्याने १८०० भाषणे दिली. निवडणूक प्रचारासाठी राज्याचे प्रदेश त्याने आणि रोझॅलिनने वाटून घेतले होते. प्रचारसभांना एकत्रपणे जाणे कधीच जमले नाही. सहा लाख हातांशी हस्तांदोलने करावी लागली. यावेळी सामना एका जुन्या, जाणित्या, लोकप्रिय व्यक्तीबरोबर होता. कार्ल सॅण्डर्स, भूतपूर्व गव्हर्नरही होते. पण जिमीची भिस्त कृष्णवर्णीयांच्या मतांवर होती. काळ्या हातांनी त्याला फसवले नाही. यावेळी तो निवडून आला आणि आपल्या


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०


□

राज्याचा गव्हर्नर झाला.

आपल्या पहिल्या भाषणाने त्याने काळ्यांना आणि गोऱ्यांनाही चकित केले. आणि राष्ट्रीय पातळीवरील मान्यता मिळविली. 'माझ्या देशबांधवांना मी चांगला ओळखतो. या ज्ञानाच्या आधारावरच मी तुम्हाला सांगतो, वांशिक भेदांचे युग संपले आहे. कुठल्याही दरिद्री, ग्रामीण, दुर्बल अगर कृष्णवर्णीय माणसाला शिक्षणाची, नोकरीची, न्याय मिळण्याची संधी मिळायलाच हवी.' वृत्तपत्रांनी जिमीला उचलून धरले. दक्षिणेत एक नवा सूर्य उगवल्याचा त्यांना भास झाला. 'टाईम'ने जॉर्जियाच्या नव्या गव्हर्नराचे छायाचित्र मलपृष्ठावर छापले, न्यूयॉर्क टाईम्सने रकाने भरभरून त्याची स्तुती केली. जिमीचे अभिनंदन करणाऱ्यांना तो म्हणे,

'माझ्या भाषणाचा एवढा मोठा गाजावाजा करण्याचे कारण काय मला समजत नाही. गेले कित्येक दिवस माझ्या भाषणांतून मी हेच बोलत आलो आहे. यापूर्वी असे काही कुणीच बोलला नव्हता आणि मीच कुणी द्रष्टा प्रथमच हे बोलत आहे, असे न्यूयॉर्क टाईम्सला का वाटावे ?'

आपल्या चार वर्षांच्या कारकीर्दीत अभिमान वाटाव्या अशा अनेक गोष्टी राज्यीय शासनात त्याने घडवून आणल्या. जवळजवळ ३०० समित्या, ब्यूरोज रद्द करून त्यांची संख्या त्याने २५ वर आणली. तुरुंग सुधारणा अंमलात आणल्या. राज्याच्या अंदाजपत्रकात कितीतरी सुधारणा त्याने घडवून आणल्या. राज्यकारभारच्या नोकरीत अनेक कृष्णवर्णीयांना त्याने सामावून घेतले. राज्यविधानसभेशी त्याचे अनेक खटके उडत. पण जिमी आपले म्हणणे खरे करी. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यू.) यांच्या छायाचित्राचे जिमीने राजधानीत केलेले अनावरण खूप गाजले. जिमी या काळात दोनदा परदेशात जाऊन आला. आता त्याला राष्ट्रीय मान्यता मिळाली होती. पक्षाच्या राष्ट्रीय-संमेलनांना तो उपस्थित राही. त्याचा पाठिंबा मिळविण्याची प्रतिष्ठित उमेदवारांत चुरस लागे. १९७२ सालच्या निवडणुकीत जॅक्सन यांना पाठिंबा देणारे भाषण करतानाच जिमीच्या लक्षात आले, 'राष्ट्राध्यक्षपदाची इच्छा करणाऱ्या या सर्वांइतकेच आपल्यालाही समजते. मग आपणच ही निवडणूक का लढवू नये.' राष्ट्राध्यक्षपद हे आता अप्राप्य उरले नव्हते. प्रयत्नसाध्य होते.

१९७६ सालच्या निवडणुकीनंतर तो प्लेन्सला परतला. डोक्यात विचार गुंजत होते. एका रात्री तो आईला भेटायला गेला. तिने विचारले, 'जिमी, गव्हर्नरशिपची मुदत संपल्यावर तू काय करायचे ठरविले आहेस?'

विचारांच्या धुंदीत असलेल्या जिमीने उत्तर दिले—

'मी राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवायचे ठरविले आहे.'

*पण जिमी एवढेच म्हणून थांबला नाही.*

पुढल्या दोन वर्षांत डेमॉक्रेटिक पक्षाचा अध्यक्ष म्हणून तो देशभर फिरला. लागोपाठ दोनदा पक्षाने व्हाईट हाऊसच्या उंबरठ्यावर ठोकर खाल्ली होती. पक्षसंघटना मजबूत बांधायची होती. आपण ७६ सालची निवडणूक लढविणार, हे ७५ सालीच त्याने जाहीर केले. १९७० साली जिमीचा ड्रायव्हर म्हणून कामावर लागलेला जॉडी पावेल (आता तो त्याचा वृत्तपत्र चिटणीस आहे) त्याची सर्वत्र पाठराखण करीत होता.

जानेवारी १९७६ मध्ये पार्टीचे कन्व्हेन्शन भरले ते पार्टीचा राष्ट्राध्यक्षपदासाठी उमेदवार ठरविण्यासाठी. पाचसहा मातबरांशी सामना होता. उपराष्ट्राध्यक्षपदासाठी जिमी बरा आहे असे म्हणणाऱ्यांना 'माझी धाव राष्ट्राध्यक्षपदासाठी आहे,' असे स्पष्ट बजावणाऱ्या जिमीने हां हां म्हणता राज्यामागून राज्यांत बहुमत मिळविले आणि पक्षाने आपला उमेदवार म्हणून त्याला नियुक्त केले.

१५ जुलै १९७६ रोजी कन्व्हेन्शन हॉलमध्ये त्याने २० हजार सभासदांचे अभिनंदन स्वीकारताना म्हटले,

'माझे नाव जिमी कार्टर. मी राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवीत आहे...'

१९५४ साली जिमीने नेव्हीमधले कमिशन सोडून घरी परतू नये म्हणून त्याच्याशी भांडलेल्या रोझॅलिनला आज पटले असेल की, जिमी नेव्हीत राहता तर आज फार तर ॲडमिरल झाला असता. राष्ट्राध्यक्ष झाला नसता. पण जिमीच्या विजयात रोझॅलिनचाही वाटा मोठा आहे. जॉर्जियातल्या प्लेन्सनजीकच्या शेतावरील एक शेतकरी कुटुंब जिमी (५२), रोझॅलिन (पत्नी), जॉन (मुलगा २९), जेम्स् (मुलगा २६), जेफरी (मुलगा २४) व्हाईट हाऊसमध्ये पोचले आहेत. जिमी–रोझाचा संसाराचा पट रंगला आहे. तिन्ही मुलांचे विवाह झाले आहेत. जॉनला जॉनला जेसन होऊन जिमी आजोबाही झाला आहे आणि परवा या तरुण आजोबाच्या टोपीत, राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकून एक नवा तुरा खोवला गेला आहे. □


**काळाची पाउले—** गुन्हेगार मुले व नोकरी करणाऱ्या स्त्रिया यासंबंधीच्या काही प्रश्नांचा विचार

**लेखिका—सौ. कृष्णाबाई मोटे** प्रस्तावना—श्री. स. द. पुणेकर

डेमी अष्टपत्री आकार – पृष्ठे २३२ – मूल्य रु. १५/– फक्त.

**निळे दिवस—** निवडक कथांचा संग्रह

**लेखक—प्रभाकर पाध्ये** संपादक व प्रस्तावना—आनंद यादव

डेमी अष्टपत्री आकार – पृष्ठे २५६ – मूल्य रु. १६/– फक्त.

याखेरीज कादंबऱ्या, कथासंग्रह, चरित्र–आठवणी व इतर दर्जेदार प्रकाशनांची सूची आजच मागवा.

**विश्वकर्मा साहित्यालय .....** दूरध्वनी : ४१२०९

२०३५/२ सदाशिव पेठ, टिळक पथ, पुणे ३०.

पॅरिस, आय् लव्ह यू

शांताराम पारपिल्लेवार

पुणे येथील फ्रान्स मित्र मंडळाच्यावतीने लेखक दीड-दोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी फ्रान्सला गेले होते. या वास्तव्यात त्यांना भेटलेल्या फ्रेंच माणसांची, त्यांनी पाहिलेल्या फ्रेंच जीवनाची ही ओळख. या लेखमालेतील नववा लेखांक दिवाळी अंकापूर्वीच्या ९ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. हा शेवटचा दहावा लेखांक.

# माया

France prostrate and defeated is more alive than we have ever been. Art does not die because of a military defeat, or an economic collapse, or a political debacle. Moribund France produced more art than young and vigorous America, than fanatical Germany or proselytising Russia. Art is not born of dead people.

*–Henri Miller.*

फ्रान्स जर्मनीच्या अधिपत्याखाली गेला. नाझींचं नियंत्रण पॅरिसवर झालं. हिटलर कधी आपण कलावंत व्हावं ही सुप्त महत्त्वाकांक्षा उराशी बाळगून होता. तसं त्याला होता आलं नाही. असं झालं असतं तर त्याचा सगळा मोटिव्ह कोर्स डायव्हर्ट झाला असता. तो महान कलाकार झाला असता. मोटिव्ह कोर्स वेगळ्याच दिशेनं डायव्हर्ट झाला. तो डिक्टेटर झाला. युरोपच नव्हे; जगावर स्वामित्व नाझींचं असावं असं त्याचं स्वप्न होतं. त्याच्या स्वप्नाला आकार देताना तो कितीतरी निष्पाप जीव पायदळी तुडवीत गेला. शहरं काबीज करीत गेला. आणि जेव्हा पॅरिस जर्मनांच्या हातात आले तेव्हा तो म्हणाला, 'मी स्वतः पॅरिसला जाईन.' फ्रान्सनं पहिल्या महायुद्धात ज्या रेल्वेच्या डब्यात तहाच्या करारनाम्यावर जर्मनीला सही करायला भाग पाडले होते, तोच रेल्वेचा डबा घेऊन हिटलर पॅरिसमधे दाखल झाला. त्याच डब्यात फ्रान्सला शरणपत्रावर त्यानं सही करायला लावलं. जगातलं सुंदर शहर पॅरिस, आणि जगातील सगळ्यात भव्य राजवाडा (आणि आता म्युझियम) लूव्ह आहे तरी कसा हे प्रत्यक्षच पाहावं म्हणून तो जेत्याच्या रुबाबात पॅरिसच्या सुंदर हवेल्या, सुंदर कलाकृती पाहायला बाहेर पडला. मोनालिसाची कीर्ती त्याच्या कानावर पोचलीच होती. जगातील अद्‌भुत अन् अद्वितीय चित्र तो बघणार होता. म्हणतात की, तो लूव्हमधील मोनालिसापुढे अर्धा तास सारखा चित्र पाहात उभा होता. त्याच्यातला कलाकार ते चित्र पाहून राख झाडल्यानंतर निखारा पेटावा तसा जागृत झाला होता. त्या चित्रात त्यालाही काहीतरी 'गूढ' आहे, कॅनव्हासपलीकडचं, रंगापलीकडचं आहे असं वाटायला लागलं. परतताना मोनालिसा त्याच्यासोबत होती. मोनालिसासंबंधी, तिच्या मूळ कृतीसंबंधी बरेच विवाद आहेत. कुणी म्हणतात, हिटलरनं सोबत नेलेली मोनालिसा खरी नव्हती. लूव्ह म्युझियममध्ये कितीतरी अद्वितीय, अमर कलाकृती आहेत. विवाद आहेत ते मोनालिसासंबंधी. तिच्यासंबंधी जितके विवाद वाढत आहेत; तिची किमत वाढत आहे.

...माझं चित्र लूव्हमधे लावलं जावं–ही प्रत्येक कलावंताची जन्मजात इच्छा असते.

आगस्ट रेनायर तशापैकीच एक होता. उमेदवारीच्या दिवसांत लूव्हमधली चित्रं तो तासन् तास पाहात बसायचा. जुन्या चित्रांतील रेषा आणि रंगापलीकडे तो जायचा. इतरांच्या मानाने रेनायरचा संघर्ष तेवढा तीव्र नव्हता. एखादं कॅनव्हॉस आर्ट सेलॉनकरिता द्यावं आणि त्यांनी ते चांगलं म्हणून स्वीकृत करावं असं व्हायचं. पण त्यालाच यशामुळे विद्ध झाल्यासारखं व्हायचं. तो स्वीकृत झालेलं चित्र फाडून टाकायचा. चित्रात जो सुखाचा स्वर्ग, आनंदाची अनुभूती दाखवायची होती ती आली नाही. माझा मूड रिफ्लेक्ट झालाच नाही, रंगांनीं मलाच फसवलं, असं त्याला वाटायचं. वयाच्या तिसाव्या वर्षीच तो नावारूपाला आला होता. पण त्याला व्यवस्थेचा (एटॅब्लिशमेंटचा) मान्यताप्राप्त कलावंत व्हायचं नव्हतं. विद्रोही मित्रांच्या सोबत राहायचं होतं. १८७४ मधे (रेनायर तेव्हा तेहतीसचा होता) त्याच्या इतर अठ्ठावीस विद्रोही मित्रांनी मिळून एक ग्रुप बनवला–' So eiete Anonymy des Artistes, Peintres, Seulpteurs et Graveurs. ' त्यांनी त्याची वेगळी प्रदर्शने भरविली. हाच ग्रुप पुढे 'इम्प्रेशनिस्ट' ग्रुप म्हणवला जाऊ लागला. मूळात त्याचा पिंड विद्रोही कलावंताचा नव्हता. त्याला व्यवस्थेशी नातं प्रस्थापित करायचं नसलं तरी परंपरेशी जुळून राहायचं होतं. व्यवस्था आणि परंपरा हातात हात घालून जातात. जेव्हा रोममधे त्याने राफेलची भव्य चित्रं पाहिली तेव्हा त्याला वाटलं, राफेल हा त्याचाच पूर्वज आहे. पाम्पेईच्या भिंतीवर चितारलेली पहिल्या शतकातली चित्रं पाहिली तेव्हा तो झपाटलाच गेला. त्या अनामिक चित्रकारांनी पृथ्वीवरचा स्वर्ग रेखाटला होता (आणि किती क्रूर दैवदुर्विलास? त्याच पॉम्पेईत कधी श्वापदं माणसांची शिकार करायची. तो खेळ पाहायला राजा–राणी आणि संभ्रांत नागरिक मोठ्या आनंदानं जायचे.) रेनायर असा आत कुठेतरी क्लासिझम्‌ला जवळ होता. त्याच्या रंगांना, रेखांना एक वेगळं परिमाण लाभलं. 'मॅन हू पेन्टेड हॅप्पीनेस'–असा त्याचा उल्लेख केला जाऊ लागला. सच्च्या कलावंताला छायाप्रकाशाची खरी ओळख व्हायला हवी. रंग-रेषांचं पावित्र्य समजायला हवं. त्यानं सुखाला, माणसाच्या आनंदाला धरायला हवं, जबाबदार व्हायला हवं, असा रेनायरचा दृष्टिकोन होता. म्हणून त्याचा उल्लेख 'ह्यूमॅनिस्ट-पेंटर' असा केला जातो. त्याची चित्रं लूव्ह आर्ट गॅलरीसाठी घेतली गेली तेव्हा त्याला खऱ्या अर्थानं कालमान्यता अन् लोकमान्यता मिळाली असं वाटलं. आनंदाची, सुखाची

उधळण रंगात करता यावी म्हणून नियतीनं त्याला आयुष्यही बरंच बहाल केलं. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत (७८ व्या वर्षीही) तो हातात ब्रश घेऊन कॅनव्हासवर चित्र काढीत होता.

शेवटी शेवटी तर शरीर खंगलं, डोळ्यातल्या ज्योती विझत आल्या, उजवा हात निकामी झाला. संधिवाताच्या तीव्र दुखण्याने हातापायातील शक्तीच जणू क्षीण झाली. त्याही अवस्थेत उजव्या हातात ब्रश धरून डाव्या हाताच्या आधाराने तो चित्र काढायचा. म्हणायचा, 'Earth was the paradise of Gods. And that is what I want to paint.' मृत्यूच्या काही दिवस आधी त्याने इच्छा प्रदर्शित केली. विझत आलेल्या डोळ्यांना लूव्ह् गॅलरीतील चित्रांचं, शिल्पांचं काळाने जतन केलेलं वैभव पाहायचं होतं. त्याला व्हीलचेअरवर बसवून लूव्ह्मधल्या प्रत्येक कक्षात नेलं. डोळे भरून तो तिथली चित्रं पाहात होता. तिथे भेटणाऱ्या प्रत्येकाच्या अभिवादनाचा मान लववून स्वीकार करीत होता. मोठं प्रसन्न हसू त्याच्या ओठावर होतं. आनंद त्याच्या डोळ्यात होता. आता तो मोकळा झाला होता. 'लूव्ह्' हीच त्याची अंतिम इच्छा होती. त्याला वाटत होतं— जणू तो लाटूर, लिओनार्डो डाव्हिन्सी, ले ब्रून, क्लॉद, डेव्हिड, गेरिको, डेलॅक्रॉ, रेम्ब्रॉ, राफेल, वेरोनीज, रूबेला, ह्या साऱ्यांना प्रत्यक्षच भेटतो आहे. सारेच लूव्ह्मधे त्याचं स्वागत करीत आहेत. तो परतला. त्यानं डोळे मिटले—उभं आयुष्य कृतार्थ झाल्याच्या आनंदात, मीही सुखं वाटीत आलो ह्या तृप्तीत. His earth is a beauty rejoicing under a smiling heaven— (A. Lunacharsky.)

पॅरिसला आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आम्ही सारे लूव्ह् आर्ट गॅलरी बघायला गेलो. पण ते नुसते बघणेच होते. ग्रुपमधील आम्ही अठरा अन् चार फ्रेंच मैत्रिणी. मॅडम जीन लीड करीत होती. सगळ्या गॅलरीभर नुसते चालत राहिलो. काळजीच्या स्वरात मॅडम जीन म्हणायची, 'प्लीज डोन्ड लॅग बिहाइंड. यू वील बी लॉस्ट.' लूव्ह् आर्ट गॅलरी, एकेकाळी बांधलेला राजवाडा असला तरी आतल्या आत तो एखाद्या साम्राज्यासारखा आहे. आतही जगभरचे आलेले प्रवासी इतके की, वाटायचं यात्राच भरली आहे. मानव समूहच्या समूह एखाद्या महापुरासारखा वाहात होता. आत शिरायच्या आधी मॅडम जीनने प्रास्ताविक भाषण केले— 'हा राजवाडा होता. अदमासे १२ व्या शतकात बांधलेला. आता आहे त्याच्या एकचतुर्थांश जागेत होता. सोळाव्या शतकात पिएर लेस्कॉट नावाच्या आर्किटेक्टनं ह्या राजवाड्याचा कायापालट केला. परंतु वास्तुबांधणीचे काम एका महाराणीच्या मूर्ख हट्टामुळे तसेच सोडावे लागले. तिला राजवाडा वेगळा हवा होता. तिचं नाव कॅथरिन डिमेडिसी. राजाराणी फारच भित्री असतात. कुणाएका जोतिष्याने महाराणी नवीन राजवाड्यात लवकरच मरणार आहे, असे भविष्य वर्तविले. ती परत लूव्ह्ला आली आणि बांधणीचे काम परत सुरू झाले. राजवाड्याच्या एकेका कक्षाकरिता वेगवेगळे आर्किटेक्ट नेमण्यात आले. सतराव्या शतकात लुई चौदावा, ज्याला 'सनकिंग' म्हणतात, बांधणीच्या कामात जातीनं लक्ष घालू लागला. त्यानं बर्निनी (आर्किटेक्ट) ला काम दिले. पण इटॉलियन आर्किटेक्ट फरेन्च राजाच्या पसंतीस उतरला नाही. लेवाऊ, ले ब्रून आणि क्लॉड पेरॉ ह्या आर्किटेक्टस्ना बांधणीचं आणि वाड्याला सौंदर्यविभूषित करायचं काम सोपवलं गेलं. परंतु १६८२मध्ये राजदरबार व्हर्साईला हलवला गेला आणि पुनः एकदा लूव्ह् राजवाडा ओसाड झाला.'

'ही बडबड पुरे झाली. आत तर चला. काय करायचं इतिहास ऐकून?' आमच्यापैकीच कुणी एक जण म्हणाला.

मी आडकाठी घेतली, 'त्यांचं काम त्यांना करू द्या! आपल्याला साऱ्या गोष्टींशी अवगत करायचं त्यांचं काम.'

मराठी त्यांना समजत नाही हे एक बरं! मॅडम जीन म्हणाली—'आय होप यू अंडरस्टॅंड माय इंग्लिश? एनी प्रॉब्लेम्स?'

'नो प्रॉब्लेम्स्. प्लीज कंटीन्यू.' मी उच्चरवात म्हणालो.

'आणि नंतर लूव्ह् पॅलेसची जी दशा झाली ती केविलवाणी होती. अक्षरशः वाड्याला भटारखान्याचे रूप आले. खालचा भाग किरायाने देण्यात आला. काही चित्रकारांनी इथंच आपले स्टुडियो थाटलेत. मदिरेचे गुत्ते, जुगाराचे अड्डे, खुशमस्कऱ्याचे खेळ इथं होऊ लागले. फ्रेंच क्रांतीच्या काळी वाड्याला आणखी दुर्दशा प्राप्त झाली. नेपोलियन बोनापार्टने मात्र वाड्यात लक्ष घातलं. १८०० साली एक विजयकमान (Arc of triumph) वाड्याच्या प्रवेशद्वाराशी बांधून काढली. १८१० मधे नेपोलियनचा विवाह मेरी लुईसशी ह्याच वाड्यात झाला. तिसऱ्या नेपोलियनने लूव्ह्चे राहिलेले बांधकाम पूर्ण केले. ह्याचवेळी हॉसमन नावाचा सौंदर्यशोधक मेयर पॅरिसला लाभला. त्यानं अख्खं पॅरिस सजवायचं ठरवलं. आणि अशा तऱ्हेनं जगातील सगळ्यात मोठ्या राजवाड्याच्या निर्मितीत तीनशे वर्षांचा काळ लोटून गेला. इट वाज नेपोलियन हू मेड दी लूव्ह् वर्ल्डस् रिचेस्ट म्युझियम बाय एक्झॅक्टिंग ए ट्रिब्यूट इन वर्क्स ऑफ आर्ट फ्रॉम एव्हरी कन्ट्री ही कॉंकर्ड. नाऊ लेटस् गो इन्.'

फरान्समधल्या बाया तेवढ्या नेपोलियनला शिव्या देतात. इतिहासकार त्याला अहंगंडानं पछाडलेला म्हणतात. पण त्यानं कलेची जी बूज राखली, सगळ्या जगातील कलात्मक वस्तूंचा संचय करून लूव्ह्ला ऐश्वर्यसंपन्न केलं, त्याबद्दल सारे कलापारखी, रसिक, भोक्ते त्याच्या ऋणात सदाचे बांधले गेलेत.

आम्ही सारे मॅडम जीनच्या मागे शाळेतल्या मुलांनी शिक्षिकेच्या मागे मागे जावे तसे चाललो होतो.

मी मनातच ठरवून टाकलं. लूव्ह्ला निवांतपणे पुन्हा यायचं. कुणी आलं नाही तरी चालेल. मी एकटाच येईन.

फ्लॅटवर परततो. फादर डिलाहूथ घरीच असतात. ते माझं स्वागत करतात— 'लकी वुई कुड मीट टुडे!' घड्याळात रात्रीचे अकरा वाजले आहेत.

'आय ॲम लकी. हाऊ इज इट यू हॅव्ह नॉट स्लेप्ट टुडे?'

'उद्या माझं युनिव्हर्सिटीत लेक्चर आहे. मी तयारी करतोय्. आणखी एक तास मी जागरण करणार आहे. तुला डिनर घ्यायचं आहे का?'

'मी बाहेरच आटोपून आलोय्.'

'कुठे गेला होतास आज?'

'आज खूप भटकलो आम्ही! सेनमधून बोटिंग केलं.'

'डिड यू एन्जॉय इट ?'

'वंडरफुल. मला आश्चर्य त्या तिथल्या फोटोग्राफरचं वाटलं. बोट किनारा सोडायच्या आधी तो पटापट कॅमेरा क्लिक करीत होता. कितीदातरी. अन् आम्ही बोटिंग करून परतलो तर त्यानं बाहेर छायचित्रांचं प्रदर्शनच भरवलं होतं. तासाभरात डेव्हलपिंग, प्रिंटिंग कसं केलं असणार त्यानं ? आम्हा साऱ्यांचे फोटो होते. ७ फ्रँकला एक पोस्ट-कार्ड साईझ द्यायचा.'

फादर हसतात. म्हणतात, 'आणखी काय पाहिलं ?'

'लूव्हला गेलो होतो.'

'तुला खचितच आवडलं असणार ते. तिथल्या काही शिल्पांच्या मी छोटया प्रतिकृती केल्यायत्. मोनालिसा पाहिलीस ?'

'पाहिली. आमच्या ग्रुपमधल्या साऱ्यांना आश्चर्य वाटलं. असं काय आहे त्या चित्रात म्हणालेत ? खरं सांगू फादर, माझं समाधान झालेलं नाही. पॅरिस सोडायच्या आधी पुन्हा पाहायचंय् मला.'

'तुझ्यासोबत यायला मलाही आवडलं असतं. पण मी असा गुंतलोय्.'

'गुड नाईट !...' त्यांचा तळवा दाबून मी माझ्या खोलीत येतो.

सकाळीच मी पहिला फोन मारी थेरेसला लावतो. तिला वर्ग असतात. लूव्हला ती सोबत द्यायला असमर्थ असते. शुभाला फोन करतो. तिचे होस्ट तिला व्हर्साईला नेणार असतात. मोकळं कुणी नसतंच. माझ्या पेटीवर पुस्तक पडलं आहे. फ्रंकाईसी सागानचं बोन्झू-ट्रिस्टीज. माया लॅबिशेनं दिलेलं. पॅरिसच्या वास्तव्यात, क्षणभरच वीज तळपून जावी तशी ती भेटली असते. म्हणाली असते- 'पॅरिसला सवड झाली तर कधी भेट.' तिची मेट्रोतील भेट हा एक ॲक्सिडेंट होता. कधी कधी वाटतं, एका अनामिक सूत्रानं आपण कुठून कुठून ओढून आणले जातो. कुठे कशा भेटीगाठी होतात. मायाची भेट तशीच. एवढया भेटीचा संदर्भ देऊन तिला त्रास देणं योग्य होईल का ? सयुक्तिक होईल का ? फोन करायला तरी काय हरकत आहे ?

माझी बोटं डायलवर फिरतात. कानाला लावल्या रिसीव्हरमध्ये आवाज असतो- मायाह् हीयर.

-बोन्झू... मी, शांताराम ! ओळख विसरलीस वाटतं ?'

-नाही ! नाही ! कसं शक्य आहे ? यू आर फ्रॉम दी लॅन्ड ऑफ माय ड्रीम.

-थँक्यू ! कॅन यू स्पेअर सम ऑफ युवर टाईम ?

-म्हणजे ?

-मला सोबत हवीय्. लूव्हकरिता.

-ओह ! येस्. आय लव्ह टू विझिट लूव्ह. केव्हा जायचं ?

-आज !

-भेटणार कुठे ?

-लूव्हच्या मेनगेटजवळ. अकरा वाजता.

-श्युअर !

फोनवर तिचं मोकळं हसू ऐकू येतं. मी अस्वस्थ होतो.

मी तिथं आधीच पोचतो. वेळेचा ठीक अंदाज मला नसतो. लूव्ह (राजवाडयाच्या) आर्ट गॅलरीच्या भव्य प्रवेशद्वारावरील कलात्मक स्तंभांचं बांधकाम मी पाहतो. यू आकाराची ही भव्य वास्तू सीन नदीच्या उजव्या काठावर आहे. पुढच्या बागेत सुंदर पुतळे. वास्तूवरसुद्धा उंचावर पुतळेच पुतळे आहेत. वास्तूच्या बाजूला पेव्हमेंटवर मोरोक्कन निग्रो मुलांनी हस्तकला वस्तूंचं प्रदर्शनच मांडलंय्- चामडी बॅगा, लाकडी हत्ती, हस्तीदंती कलात्मक कंगवे...

मी आलटून पालटून मनगटावरच्या घडयाळाकडे अन् लांबवरच्या मिनी आर्क डि ट्रायम्फकडे पाहत असतो. प्रवाशांची रीघ लागली आहे. माया कुठेच दिसत नाही. बेलबॉटम अन् शर्ट घालून येणारी मुलगी लांबून नजरेत दिसते. ती जवळजवळ येते अन् माझा भ्रमनिरास होतो. ती माया नसते. मी दूर लांबवर पाहत असतानाच माझ्या खांद्यावर थाप पडते-पाहतोस कुठं ?

मान वळवून पाहतो. माय गॉड ! माझा माझ्याच डोळयांवर विश्वास बसत नाही.

मायानं मायावी रूप धारण केलं असतं- मोरपंखी साडी, मॅचिंग स्लीव्हलेस ब्लाऊज, हातात राजस्थानी बांगडया, गळयात मोत्यांची माळ, डोळयांत काजळ, कपाळावर कुंकू. चापूनचोपून तिनं आज अंबाडा घातलाय्. माझ्याकडे अशी रोखून पाहतेय्. खटयाळ हसू तिच्या ओठावर आहे.

'फॅब्युलस ! यू लूक लाईक इंडियन प्रिन्सेस...माझी नजर लागायची ग तुला !' मी माझा हात हस्तांदोलनासाठी पुढं करतो. ती हात जोडून नमस्कार करते. मग हात हातात देते.

'काय-जास्त वाट पाहावी लागली नाही ना ?'

'नाही ! मला आता भीती एकच वाटते. लूव्ह बघायला आतुर डोळे-साऱ्यांचे-तुझ्यावरच खिळणार आहेत. यू वील बी मेन अट्रॅक्शन इन लूव्ह टुडे.'

'फिरकी घेऊ नकोस हं !'

माझा हात धरून ती मला आत नेते. माया सोबत आहे. त्यामुळे गाईडची जरूरी नसते.

खालच्या डाव्या बाजूच्या भव्य सभाकक्षागत दिसणाऱ्या जागेत पुतळे ठेवले आहेत. रोमन साम्राज्याच्या काळचे. काहींची तोडफोड झाली आहे. सभागृह संपतं तिथं वर जायचा मार्ग आहे. वर चढायला पायऱ्या. पायऱ्यांच्या मधल्या स्टेजवर मधोमध एक पुतळा आहे. पांढराशुभ्र. स्त्रीच्या शरीराचा आकार पण खांद्याला पंख आहेत. विस्तारलेले. माया सांगते, 'ही विजयश्री आहे. विंगेड व्हिक्टरी ऑफ सॅमोथ्रेस. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील हे शिल्प आजच्या कलेच्या परिमाणांनी जज केलं तरी अद्वितीय ठरणारं आहे. अनामिक कलावंतानं अवकाश पंखात बद्ध केलंय्.'

मी क्षणभर थांबून शिल्पाकडे पाहतो. रेखीव अवयव. नाक, डोळे, ओठ सारे किती प्रमाणबद्ध. तिच्या हालचालीत विजयाचा उन्माद आहे.

'मला एवढया सुंदर स्त्रिया फ्रान्समध्ये दिसत नाहीत.'

माया स्मित करते. 'विसरलास ? फॅब्युलस् विशेषण वापरलं होतं तू माझ्यासाठी !'

'तू फ्रेंच कुठे आहेस ?'

'मी फ्रेंच आहे ! आता तरी चल, आपण ओल्ड मास्टर्स पाहू-'

मी तिच्या मागे होतो. ती सांगत असते- 'लूव्ह एका दिवसात पाहून होत नाही. मीच कितीदा तरी आलेय्. पण वाटतं, आपण काही पाहिलंच नाही.'

'लूव्हविषयी मी पहिल्यांदा वाचलं ते मून्हेबलमध्ये. तू वाचलंस ते पुस्तक ?'

'नाही. कुणाचं ते ?'

'हेमिंग्वेच्या पॅरिसच्या आठवणी आहेत. म्हातारपणी त्यानं लिहिलेल्या. त्याच्या उमेदवारीच्या काळातील त्याचे पॅरिसमधील संघर्षाचे दिवस त्यानं त्यात जिवंत केलेत. कवी, चित्रकार, लेखक, किती तरी मंडळी त्यात भेटतात.'

'तुझ्या बोलण्यावरून, वाटतं, तुझ्यातही क्रिएटिव्ह जर्म्स असावेत.'

'आहेतच. आय लव्ह पोएट्री, पेंटिंग अॅन्ड लिटरेचर...'

'ओ...ला...ला...' ती वळून माझ्याकडे अनोळखी माणसाकडे पाहावं तशी पाहते– 'देन, बुक आय प्रेझेंटेड वाज इन राईट हॅन्ड !'

'पण अनफॉर्च्युनेटली, मला फ्रेंच येत नाही. त्यामुळे अडचण आहे.'

'एनी वे. कधीकाळी तिची इंग्लिश ट्रान्सलेशन्स मिळालीच तर जरूर वाच. बोन्झू ट्रीस्टी तसं तिचं पहिलं पुस्तक. तिनं वयाच्या अठराव्या वर्षी लिहिलं. अभ्यासात लक्ष लागेना. परीक्षेत ती नापास झाली. पण तिची कादंबरी खूपच यशस्वी ठरली. साडेआठ लाख प्रती खपल्यात अन् पाहता पाहता ती कीर्तीच्या शिखरावर जाऊन पोचली... तू लूव्ह अन हेमिंग्वेबद्दल म्हणत होतास ना ?' फोंटेन गॅलरी आणि फ्रेंच प्रिमिटिव्ह पेंटिंग्ज कक्षातून आम्ही लांबच लांब चिंचोळ्या कक्षात येतो. लाटूरची मोठी चित्रं तिथं टांगलेली असतात. एक विद्यार्थी लाटूरच्या चित्राची प्रतिकृती तयार करीत असतो. मी त्याला विचारतो, 'हिज स्पेशॅलिटी ?'

'जॉर्ज डि लाटूरच्या चित्राचा विशेष म्हणजे त्याच्या चित्रातील प्रकाशाचं चित्रण. इथं बघा. म्हाताऱ्यानं हातात मेणबत्ती धरली आहे. ती विझू नये म्हणून डाव्या हाताचा तळवा आडवा धरलाय्. मेणबत्तीच्या उजेडात नवजात अर्भक (जिजस) स्पष्ट दिसतंय्. त्याच्या चेहऱ्यावरील उजेडाचं चित्रण किती प्रत्ययकारी आहे बघा. आणि तिथं उपस्थित असणाऱ्यांचे अंधारात फेड होत जाणारे चेहरे... किती जिवंत... किती बोलके... किती रेखीव...'

'थँक्यू' म्हणून मी पुढे जातो. माया म्हणते,–'अशा चौकशा करीत बसलास तर आयुष्य लूव्हमधे उणं पडतं. अन् जेव्हा इथल्या कृतीशी नातं प्रस्थापित होतं, माणसाचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटला असतो. तो अंतर्मुख होतो–अबोल होतो. इथल्या कृतीसारखा.'

'एकेक कृती इतकी भव्य अन् रंगांची उधळण इतकी कलात्मक की वाटतं पाहतच राहावं.

'तर मी काय सांगत होतो, माया ! हं ! हेमिंग्वे ! १९२० च्या सुमाराला तो पॅरिसमधे होता. स्कॉट फिट्जिराल्डही इथे होता. त्याची बायको झेल्डा मेंटली डिरेल्ड होती. एकदा तो हेमिंग्वेला म्हणतो. झेल्डा म्हणतेय की मी जगातल्या कोणत्याच स्त्रीला सुखी करू शकणार नाही. शी सेड इट वाज ए मॅटर ऑफ मेझरमेंट... हेमिंग्वे म्हणतो, स्कॉट यू आर परफेक्टली ऑल राईट. तो त्याला लूव्ह आर्ट गॅलरीत आणतो. इथले नग्न पुतळे दाखवतो. म्हणतो त्यांच्याकडे बघ. घरी जा अन् स्वतःचंच शरीर आरशात बघ. झेल्डा वॉन्टस् टू डिस्ट्रॉय यू. इट इज बेसिकली दी क्वश्चन ऑफ साईझ इन रिपोझ ..'

'देन आय मस्ट रीड दॅट बुक. इट इज सो फ्रँक...' माया म्हणते. 'वुई वुईल सी मोना लिसा अॅट लास्ट. लेटस् सी फ्रेंच मास्टर्स ऑफ नाईंटीन्थ सेन्च्युरी...'

मौलिन गॅलरीतल्या डेव्हिडच्या 'कोरोनेशन' पुढं ती मला उभं करते. 'म्हणतात की नेपोलियननं डेविडला ह्या चित्रासाठी बोलावलं होतं. कितीतरी माणसाचा समावेश आहे त्यात. अन् प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचे भाव बघ.' राजदरबार भरलाय. एका आसनावर पोप पायस बसलाय. त्याच्यामागे त्याचे बिशप्स्. त्याच्या मागे सरदार. नेपोलियन उभा आहे. त्यानं ह्यतात राजमुकुट धरलाय. रोमनसम्राटासारखा नेपोलियनचा वेष आहे. डोक्यावर सोनेरी पानांचा मुकुट. दोन पायऱ्या खाली महाराणी जोसेफीन मान वाकवून टोंघळचावर वाकलीय. दोन दासींनी तिचं पायघोळ वस्त्र हातात धरलंय. मागे आणखी दासी उभ्या आहेत. सरदार आहेत. गॅलरीत नेपोलियनची आई आणि नातेवाईक बसले आहेत. चित्रातील ऐंशी (अंदाजे) माणसांची दृष्टी नेपोलियनने हातात धरलेल्या मुकुटावर केंद्रित झाली आहे. वरच्या खिडकीतून पाझरणारा प्रकाश खालच्या हिरव्या गालीच्यावर ओसंडत आहे.

'पोप आणि बिशप्स ह्यांच्याच नजरा तेवढ्या झुकलेल्या आहेत. असं कां, माया ?'

'नेपोलियनने राज्यारोहणासाठी पोप पायस (७) ला पाचारण केलं. पोपने स्वतः आपल्या हाताने मुकुट राजाराणीच्या डोक्यावर ठेवावा हा परंपरागत संकेत होता. परंतु अहंगंडानं पछाडलेल्या नेपोलियनला आपल्या डोक्यावर दुसऱ्या कुण्या माणसाने मुकुट ठेवावा हे कमीपणाचे वाटले. स्वतः मुकुट त्याने पोपच्या हातातून हिसकावून घेतला व आपल्या डोक्यावर ठेवला. राणीचाही मुकुट आपल्या हाताने तो ठेवायला लागला, साहजिकच पोप, बिशप ह्यांना मानहानी झाल्यासारखं झालं. पण बोलणार काय ? नेपोलियन जेत्ता होता अन् जेत्याला सारे शरण असतात. बिचारे माना निमूट खाली करून बसलेत.'

'इतका इगोईस्ट होता नेपोलियन ?'

'तेवढंच करून तो थांबला नाही, स्वतःचा सार्वभौम सम्राट म्हणून राज्याभिषेक केल्या-

पृष्ठ ३२ वर


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# सोलकढी

## □ तेजस्वी आणि भोजस्वी साहित्यिक

मराठी साहित्यिकांबद्दल माझ्या अंतःकरणात आदरकौतुकाचा डोंब नित्य उसळलेला असतो. एकविसाव्या बोटासारख्या असलेल्या त्यांच्या बॉलपेनमध्ये कसले स्फोटक रसायन भरलेले असते कुणास ठाऊक : आता ते रक्तानेच लिहीत असले तर प्रश्नच नाही. ज्ञानेश्वरांपासून माडगूळकरांपर्यंत अवघ्या बंडखोरांचे जुलूमजाळक रक्त त्यांच्या निळ्या आणि लाल धमन्याधमन्यांतून खळखळते आहे. अहाहा, काय ते त्यांचे तेज. अहाहा, काय ते त्यांचे ओज. अहाहा, काय ते त्यांचे मान. अहाहा, काय ते त्यांचे अपमान. अहाहा, काय ते त्यांचे मानापमान.

हे असे अहाहायला कारण काय घडले ते सविस्तर, सांगोपांग, सुटीपसटीकच सांगितलेले बरे. काही वर्षांपूर्वी, दोन कवींच्या कुस्तीमुळे नावारूपाला आलेला विदर्भ साहित्य संघ महाराष्ट्रात सगळ्यांनाच ठाऊक आहे. त्या विसासंतर्फे, राष्ट्रीय लेखक संघाचे एक संमेलन विदर्भातच भरणार होते. आता हा राष्ट्रीय लेखक संघ सगळ्यांनाच ठाऊक नसेल. अनंतरावांना तो अर्थातच ठाऊक आहे. राष्ट्रीय लेखक संघ म्हणजे अखिल भारतातल्या लेखकांचा संसंघ. आपली प्रांतीय दृष्टी फाकून आता राष्ट्रीय करायला हवी. आता सगळे कसे राष्ट्रीय-राष्ट्रीय होत जायला हवे. राष्ट्रीय लेखक संघ राष्ट्राच्या समस्यांचे अचूक निदान करील आणि त्यांची उलझन करण्यासाठी समाजाला प्रेरणा देईल. स्वातंत्र्याकडून अधिक स्वातंत्र्याकडे जाणाऱ्या या राष्ट्रीय लेखक संघाच्या वैदर्भीय अधिवेशनासाठी विदर्भातलेच नव्हेत तर पश्चिम महाराष्ट्रातलेसुद्धा थोर्थोर मराठी साहित्यिक विसासंने आवर्जून आणि इतमामाने बोलावले. त्याच वेळी वर्तमानपत्रात बातमी आली : तिच्यात संमेलनाला शोभा आणणाऱ्या इतर अनेक तेजस्वी साहित्यिकांबरोबर प्रा. वसंत बापट आणि पद्मश्री अनंत काणेकर याही तेजस्वी साहित्यिकांचा ठळक उल्लेख होता. बातमी वाचल्यावर आम्ही संमेलनाला जायचा विचार करू लागलो. शोभेचे साहित्यिक आणि वऱ्हाडी पाहुणचार म्हणजे मंगळवार आणि चतुर्थी असा जुळा शुभयोग होता.

पण काही तरी अडमतडम झाले. 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये प्रा. वसंत बापट आणि पद्मश्री अनंत काणेकर यांनी आपण त्या संमेलनाला जात नाही, असे जाहीर करून टाकले. शालेय पाठ्यपुस्तकातली वि. स. खांडेकरांची ती पोझ घेऊन मी विचार करू लागलो. प्रा. बापट–प. काणेकर हे काही कुसुमाग्रज–जी. ए. कुलकर्णी यांच्याप्रमाणे असू तिथे बसू या क्लबातले नव्हेत. हवे तिथे आणि नको तिथेसुद्धा वयाला साजेशा रंगीबेरंगी आणि चटेरीपटेरी उत्साहाने ते बागडत असतात. त्यांचे न जाणे शंकास्पद होते. राष्ट्रीय लेखक संघाचे हे वैदर्भीय संमेलन या दोघांना प्रचारकी आणि मिंधिलकीचे (बांधिलकीच्या चालीवर) वाटले की काय, अशी शंका मला झमकून आली. तसे वाटले असेल तर ते दोघे कसे जातील? पद्मश्री अनंत काणेकर म्हणजे विवेक, तारतम्य, शहाणपणा यांचा मक्तेदार–साहित्यिक. शिवाय लेखनस्वातंत्र्याचा सहीसिद्ध पुरस्कर्ता, आणि प्रा. बापट म्हणजे सदैव पुढे जाणारा सैनिक; विजलीब्राईट कविता लिहिणारा सेवादलित कवी; कलापथकाचा समाजवादी प्रमुख; 'साधना'–शुचित साहित्यिक आणि विचारवंत; मुक्त मानव रवींद्रनाथ टागोरांच्या स्मृत्यर्थ निर्माण केलेल्या मुंबई विद्यापीठातल्या अध्यासनावर टेकलेला ध्येयवादी प्राध्यापक; आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्यावरील मान्यवर कलावंत. असे तेज, असे ओज. ते थोडेच राष्ट्रीय लेखक संघाच्या भिगातून सांडणार?

पद्मश्री अनंत काणेकर आणि प्रा. वसंत बापट यांची पत्रे वाचून, त्यातला मजकूर समजून अहाहा असे धन्योद्गार पोटातून आमच्या ओठात पुरते येण्याआधीच नागपूरच्या राष्ट्रीय लेखक संघ संमेलनाचे संयोजक त्रि. गो. देशमुख यांचे : वसंत बापट व काणेकर यांच्याविषयी 'चे पत्र दि. १५ ऑक्टोबरच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये आम्हाला वाचायला मिळाले. प्रा. बापट आणि पद्मश्री काणेकर यांच्या पत्रांमुळे देशमुख व्यथित तर झालेच होते, पण आश्चर्यचकित अधिक झाले होते. पद्मश्री काणेकरांनी आपल्याला आलेल्या निमंत्रणाला उत्तर पाठवून दिले होते, मग वर्तमानपत्रातून खुलासा करण्याचे प्रयोजन काय, तेच त्रि. गों. ना कळेना. प्रा. वसंत बापटांचा म्हणे आधी गैरसमज होता; त्रि. गो. त्यांना भेटल्यावर तो दूर झाला; मग बापट संमेलनाला येण्याबाबत विचार करू लागले; खुद्द एस्. एम्. जोशींनी त्यांना 'यात भिण्याचे काय कारण आहे?' असे विचारले; आणि एवढे झाल्यावर आपण येत नाही, असे प्रा. बापट वर्तमानपत्रातून जाहीर करतात, या एकूण ठामपणामुळे त्रि. गो. भांबावले. या प्रतिभावंतांनी असे आतबाहेर वागू नये, असे त्रि. गों. ना वाटले. मुख्य असे की राष्ट्रीय लेखक संघ हे काय आहे, त्याची घटना कशी आहे, संमेलनाचा आतला आणि बाहेरचा हेतू एकच आहे की भिन्न आहे संमेलनाला गेल्यास आपले तेजओज कळकेल काय, असले फालतू प्रश्न विचारत बसण्यापेक्षा वैदर्भीय आतिथ्यशीलतेचे घमघमीत स्मरण प्रा. बापट व पद्मश्री काणेकर यांनी कृतज्ञपणे करायला हवे होते. ते केले नाही म्हणून त्रि. गों. ना कसेसेच वाटून राहिले.

विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातली ही नवी साहित्यिक आबाधुबी चांगली घणघणणार हे ओळखून मी सरसावून बसलो. त्रि. गों. च्या पत्रापाठोपाठ पद्मश्री अनंत काणेकरांचे उत्तर पत्र आलेच. त्यात पद्मश्री काणेकरांनी संमेलन–संयोजकांना जी गोष्ट सुनावली ती दिली होती. 'काही काळ का होईना, पण लेखकाच्या व्यवसायाला मूलभूत असणाऱ्या विचार, उच्चार, लेखन स्वातंत्र्यावर जोपर्यंत निर्बंध आहेत तोपर्यंत लेखकांनी संमेलने भरवून करायचे काय?' पद्मश्री काणेकरांनी असेही सांगितले की, त्रि. गों. नी जाहीर पत्रात जे स्पष्टीकरण केले ते काणेकरांनी संयोजकांना पाठवलेल्या पत्रानंतर लगेच केले असते तर काणेकर संमेलनाला गेले असते....पद्मश्री काणेकर नेहमी असे साफसूफ बोलतात. कराडच्या

साहित्य संमेलनाच्या वेळीसुद्धा त्यांनी– 'संमेलने भरवून करायचे काय?' हाच कुऱ्हाड प्रश्न संयोजकांना पुसला होता म्हणे. या प्रश्नावर त्यांनी पद्मश्री काणेकरांना काहीच उत्तर दिले नव्हते. तेव्हा पद्मश्री काणेकर कराडच्या संमेलनालाच गेले नाहीत. त्यामुळे कराडला पद्मश्री अनंत काणेकर हवे होते असे सगळेजण म्हणत राहिले.

प्रा. वसंत बापटांनी, एस्. एम्. जोशी यांच्या सांगण्यावरून, त्रि. गों. च्या पत्राकडे दुर्लक्ष केले.

त्रि. गों. च्या पत्राने पद्मश्री पु. ल. देशपांड्यांच्या मनाला मात्र चटका लावला. त्रि. गों. च्या खुलासेदार पत्रात, मुंबईच्या चाळीत आणि पुण्यातल्या आळीत जन्म गेलेल्या लेखकांना वैदर्भीय आतिथ्यशीलतेचे जे भोजस्वी आमिष दाखवलेले होते ते पद्मश्री पु. लं. ना मोठे अपमानास्पद वाटले असावे. त्यांनी १९ ऑक्टोबरच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये उत्स्फूर्त पत्र लिहून त्या वैदर्भीय वडेपुरणाच्या आतिथ्यशीलतेचे घुंगुरपिठले केले. आमच्या पद्मश्री पु. ल. देशपांड्यांचे अलीकडे झाले आहे तरी काय? एरवी भोजस्वी पत्कर घेणाऱ्या संमेलनसंयोजकांचे कसेसेच वाटणे त्याना तसेसे खट्टकले नसते.

कारण असे की, संमेलनसाहित्यिकांना, 'जो जे वांछिल ते लिहो' असा संदेश देणाऱ्या संमेलनाध्यक्षापेक्षा 'जो जे वांछिल ते खावो' अशी तरतूद करणारा संमेलनसंयोजक अधिक जवळचा वाटतो, हे साहित्यसंमेलनांच्या आठवणी आणि आख्यायिका पाहिल्या तर सहज लक्षात येईल दुर्गाबाईंची खाण्याजेवण्याची व्यवस्था नीट झाली नाही. माडगूळकरांना चहा वेळेवेळेवर मिळाला नाही, एकूण भोजनव्यवस्थेत गोंधळ होता, एवढीच कराडच्या साहित्यसंमेनाची बाकी उरली आहे. हैद्राबादच्या संमेलनात खाल्ला तसा भात आयुष्यात पाहिलेला नाही, असे कढत कौतुक करणारे कितीतरी साहित्यिक आढळतील. इचलकरंजीला जेवणाची सोय अप्रतिम, बाकीचे समजा, एवढाच त्या साहित्यसंमेलनाचा जमाखर्च. मडगावला वि. द. घाटयांचे यथोचित स्वागत झाले नाही म्हणून ते फुरंगटून तसेच निघून आले; हे त्यांचे वागणे बरे झाले नाही, असे ज्ञानेश्वर नाडकर्णींनी लिहिले मात्र, नाडकर्णींना तोपर्यंत रईसपणाने खिलवलेपिलवलेले सगळे वट्ट मोजून बाहेर काढले वि. द. घाटयांनी आणि आपले साहित्यिक गोत्र पावन करून घेतले. मालवणच्या साहित्यसंमेलनात किती द्रोण सोलकढी प्यायली गेली याचा हिशेब साहित्यिक एकमेकांना अजून सांगत असतात. हे सोडा. कित्येक वर्षांपूर्वी रत्नागिरीला झालेल्या साहित्यसंमेलनात हापुसचा आंबरस आणि वाढायला साक्षात शांता आपटे असा जो मिटक्यांचा योग जमला. त्याचे थबथबीत वर्णन 'जीवनसेतु' या सेतुमाधवराव पगडींच्या आत्मचरित्रात वाचायला मिळते.

या सटीपसटीक स्फुटिकातला साहित्यिकांचा तेजस्वीपणा आणि भोजस्वीपणा पाहिल्यावर अनंतरावांसारखे तुम्हालाही अहाहायला होईल असा विश्वास वाटतो. तसे झाले नाही तर मला कसेसेच वाटेल. ◻

## ◻ वधूवरांचे परस्परवय

लग्न करणाऱ्या वधूवरांचे परस्परवय काय असावे, हा एक झकासझणझणीत चर्चाविषय आहे. काहीच चर्चायला नसले किंवा सगळे चर्चचूंन झाले असले तर हा विषय मजेत तोंडी लावता येतो. कारण 'मला असे वाटते' असे म्हणत चर्चेला एक तात्त्विक पातळी देण्याची भली सोय या विषयात आहे. या विषयावर आपल्या या बुद्धिवादी महाराष्ट्रात एकेकाळी काळी-तांबडी रणधुमाळी माजली होती. एकेकाळी म्हणजे 'फार फार पूर्वी' वगैरे नव्हे; अवघ्या शे-पाऊणशे वर्षांपूर्वी. आता जमाना पालटला. वधूवरांची परस्परसंमती असेल तर परस्परवयाबद्दल काहीच बांधा येत नाही. (वधूवरांची परस्परसंमती नसेल तर परस्परवयाबद्दल बांधा जरूर येतो.)

पुन्हा वयात आता शरीराचे वय आणि मनाचे वय अशी दोन वये असतात. त्यामुळे गोष्टी अधिकच सोप्या होतात. आता एखाद्या वेळी टाळी वाजत नाही ते सोडा. तशी अमेरिकेतसुद्धा क्वचित वाजत नाही. एक गोष्टच सांगतो ना : टेक्सास राज्यातल्या वेदरफोर्ड शहरीच्या लग्नपरवानाकचेरीत तो आणि ती भल्या सकाळी गेले. वेदरफोर्ड शहरातली सकाळ आपल्याकडच्या भूपाळीतल्यासारखीच असते; म्हणून तिचे वर्णन टाळून पुढे जातो. सकाळी दोघेजण डोलतडळमळत होते. बहुधा लग्नाआधीची रात्र साजरी केली होती त्यांनी. कारकुनाने त्यांची अवस्था एकूण ओळखली. मग त्याने शेरिफच्या कचेरीत कळवले. तात्काळ पोलीस आले आणि त्यांना घेऊन गेले. लग्नाची रात्र त्यांना वेगवेगळ्या कोठडीत एकेकटयाने कंठावी लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी, सार्वजनिक जागी झिंगल्यामुळे, प्रत्येकी साडेसदतीस डॉलर्स दंड भरल्यावर त्यांची सुटका झाली. नंतर मात्र बाई बाई सांडली शाई असे झाले. तिने त्याच्याशी लग्न करायचे नाही, असे ठरवले. ती एकीकडे निघून गेली. तो दुसरीकडे निघून गेला. ती पन्नास वर्षांची होती, त्याचे वय बासष्ट होते.

येणेप्रमाणे, खरे म्हणजे दोघे परस्परानुरूप होते. ती फार मोठी नव्हती. तो फार लहान नव्हता. दोघेही दारू पिणारे होते. दोघेही झिंगणारे होते. दोघांनी रात्र एकत्र घालवली होती. असे असता तो लग्नाला योग्य नाही, असे सुचवून तिने निघून जाणे उचित नव्हते. साठी उलटल्यावर तो लग्नाच्या हुक्कीने उभा राहिला होता हे खरे. पण त्यात काय झाले. त्याचे मन साठीच्या अलीकडे किती तरी वर्षे असणार, आणि अगदी नुसत्या हाडामांसाच्या नरदेहाचा विचार केला तरी बेताबेताने घुटक्याघुटक्याने मिशी सांभाळून लग्न निभावून नेणे त्याला जरूर जमले असते. त्याच्या आधी कित्येकांना ते जमले होते. पुढेही जमणार आहे.

*त्यामुळे मला तर अशी शंका येते की*, तिलाच स्वतःचा विश्वास धरणे कठीण झाले असावे. एकूण नाट्यानुभवात वय तिचेच उसवले असावे. तेव्हा चिडकटून तिने त्याच्या वयाचे छिद्र भोकसाडून टाकले, दुसरे काय.

–अनंतराव



# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. घाणेकर

## एक

कल्पना नसते अशा काही काही वेळेला विचित्र व मनाविरुद्ध गोष्टी माणसाच्या आयुष्यात आपोआप, नकळत घडत असतात. आणि या अशा घडतात हे मानवतेचे मोठे भाग्य होय. कारण त्या तशा न घडल्या आणि सगळयाच गोष्टी सत्ताधीशांना आणि त्यांच्या बगलबच्च्यांना हव्या तशा आणि त्या त्यावेळी वेळापत्रकाप्रमाणे घडल्या, तर या जगात जुलमी राज्यसत्तेचे मरण ओढवणे कठीण झाले असते. वेडं मन अशा माणसांना म्हणत असतं की, हे कोणीतरी मुद्दाम घडवतंय-पण तसं काही नसतं.

२२ जुलै १९७४ तो २७ जुलै १९७४ हा आठवडा अमेरिकेचा भूतपूर्व अध्यक्ष रिचर्ड निक्सन याच्या बाबतीत असाच ठरला. न कळत सर्वच गोष्टी मनाविरुद्ध अशा घडत गेल्या की, त्याचे त्यालाच कळेना की आपण आहोत तरी कोठे ?

सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश अर्ल वॉरेन ह्यांच्या कोर्टात निक्सनचे दोन खटले चालू होते. सर न्यायाधीशांच्या नेमणुकीला निक्सनने पूर्वी दुजोरा दिल्यामुळे त्याला फार मोठी आशा होती- नव्हे, खात्रीच होती-की अर्ल वॉरेन आपल्याच बाजूने निकाल देईल. राज्यसत्तेचा दुरुपयोग करणारी माणसे नेहमी न्यायखात्यात आपल्याला अनुकूल माणसे पेरण्याचा उद्योग कौशल्याने करीत असतात. पण तरीही एखाद्या न्यायाधीशाची सदसद्विवेकबुद्धी ऐनवेळी उचल खाऊ शकते, किंवा न्याय करीपर्यंत न्यायाधीशच जागेवर राहात नाही. असेच काहीसे घडले.

वॉशिंग्टनमध्ये बुधवार, २४ जुलै १९७४ ह्या दिवशी सकाळीच ७ वाजता अर्ल वॉरेन हृदयविकाराने अकस्मात कालवश झाले ! आणि त्याच दिवशी ह्या दोन्ही खटल्यांचा निकाल होता.

नेहमीप्रमाणे त्या दिवशी बरोबर १० वाजता सुप्रीम कोर्ट उघडले. अर्ल वॉरेनच्या सन्मानार्थ म्हणून इमारतीवर डौलाने फडकणारा ध्वज अर्ध्यावर आणून ठेवला गेला होता.

बरोबर ११ वाजता अर्ल वॉरेन ह्यांच्याबरोबर बसणारे सहा न्यायमूर्ती वॉरेन बर्जर, डगलस, स्टेवार्ट, पॉवेल, मार्शल, बायरन व्हाइट एका पाठोपाठ मंद पावले टाकीत न्यायालयात प्रविष्ट होऊन आपआपल्या जागांवर बसले. अर्ल वॉरेनच्या ऐवजी मुख्य न्यायाधीश म्हणून वॉरेन बर्जर हे प्रमुख खुर्चीवर बसले.

आलबेल देऊन कोर्ट-कारकुनांनी मुकादमा क्रमांक ७३/१७६६ यू. एस. ए. विरुद्ध निक्सन व क्रमांक ७३/१८३४ निक्सन विरुद्ध यू. एस. ए. असा पुकारा केला. कोर्टात निक्सन हजर नव्हता, त्याचे वकील हजर होते.

निक्सन ह्यावेळी सा क्लेमंटी येथील आपल्या छोटया व्हाईट-हाऊसमध्ये आराम घेत पडला होता. पहाटेस त्याला अर्ल वॉरेनच्या मृत्यूची बातमी समजली, तेव्हाच त्याचे काळीज चर्र्र झाले. वॉशिंग्टनला सकाळचे ११ म्हणजे सा क्लेमंटीला सकाळेच आठ वाजलेले. दोन्ही वेळांमध्ये तीन तासांचे अंतर होते. बातमी ऐकून त्याच्या डोळयापुढे तिरमिरी आली आणि हातातला कॉफीचा प्याला तसाच टेबलावर ठेवीत तो नेहमीप्रमाणेच पुटपुटला, " Oh Devil, what a bad luck !'

कॉफी न पिताच त्याने घाईघाईने सिगारेट शिलगावली. शेजारील खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या आकाशाकडे पाहत पाहत धुराचे लांब-वर फवारे सोडले आणि विस्तीर्ण दिवाणखान्यात तो फेऱ्या घालू लागला.

दोन्ही खटल्यांचा निकाल काय झाला असेल हे ऐकण्याची त्याला अत्यंत उत्कंठा लागून राहिली होती. व्हाईट–हाऊसला जोडण्यासाठी त्याने टेलिफोन चार–पाच वेळा उचलला. नंबरच लागेना. कसा लागणार! चीफ–ऑफ–स्टाफ जनरल अलेक्झांडर हेग ह्याच्या हुकुमान्वये आता व्हाईट–हाऊस चाललं होतं. सगळीकडे एकजात नाकेबंदी झालेली होती. अमेरिकेचे आपण सर्वाधिकारी ह्या भाव-नेनेच हेग व्हाईट–हाऊसमध्ये वावरत होता.

इकडे न्यायालयात सर न्यायाधीश वॉरेन बर्जर यांनी निकाल-पत्र वाचायला सुरुवात केली; व काही मिनिटांनीच निक्सनचा यु. एस. ए. विरुद्ध लावलेला दावा त्याने निकालात काढून टाकला. दुसऱ्या मुकादमातील निकालपत्राचे वाचन सुरू झाले. जे प्रश्न वादग्रस्त नव्हते, अशाच्या मुद्द्यांवर वाचन करून शेवटी त्यांनी महत्त्वाचा मुद्दा पुढे आणला आणि म्हटले की, 'फेडरल जज्ज जॉन सिरीका ह्यांनी संभाषणाचे टेप्स न्यायालयात प्रविष्ट करण्यासंबंधी निक्सनवर जो हुकूम काढला, तो बरोबर आहे! त्या हुकुमानुसार रीचर्ड निक्सनने ते टेप्स त्या न्यायालयात तावडतोब हजर करावेत. दिरंगाई होता कामा नये!'

लिऑन जोव्हर्स्की निक्सनचा वकील–निकाल लागल्याबरोबर जेफर्सन हॉटेलमधील आपल्या निवासस्थानाकडे निघून गेला. त्याची पत्नी स्वयंपाक करीत होती. जोव्हर्स्की दरवाजा उघडून आत शिरताच पत्नीने त्याला विचारले,

'केसचं काय झालं?'

'ठरल्या प्रमाणेच झालं.' जोव्हर्स्की सुस्कारा टाकीत म्हणाला, 'No man is above law.–कायदा हा सर्वांसाठी एकच असतो.'

'मग आता प्रेसिडेंटचं काय होणार?'

'राजीनामा द्यावा लागणार–दुसरा पर्याय नाही!'

एवढं दोघांचं बोलणं झालं. जोव्हर्स्कीने निक्सनला टेलिफोन जोडून सर्व हकीकत सांगितली व तावडतोब वॉशिंग्टनला निघून येण्याविषयी विनंती केली.

ह्याच दिवशी संध्याकाळी वॉशिंग्टन् येथील रेबर्न हाऊस ऑफिस बिल्डिंगच्या २१४१ नंबरच्या प्रशस्त खोलीमध्ये हाऊस–ऑफ–रिप्रेझेंटेटिव्हच्या कायदाविषयक कमिटीचे अध्यक्ष पीटर रोडिनो आपल्या इतर ३७ सभासदांबरोबर ह्याच विषयाची चर्चा करीत बसले होते की, केलेल्या दुष्कृत्याबद्दल अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला सिनेटपुढे आणून दोषी ठरविता येईल किंवा नाही. दिनांक २७ जुलै १९७४ ह्या दिवशी रात्री ९ वाजता मतदान व्हावयाचे ठरले.

हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचा सभापती कार्ल अलबर्ट ह्याने ही कायदा–कमिटी नेमून त्या कमिटीचा अध्यक्ष म्हणून पीटर रोडिनो व इतर ३७ सभासदांच्या नेमणुका २४ ऑक्टोबर १९७३ला केलेल्या होत्या. त्या मुदतीमध्ये बऱ्याच जणांच्या साक्षी–जबान्या झाल्या. तीन कलमांवर आपले मत प्रकट करून कमिटी आपला अहवाल सिनेटपुढे ठेवणार होती. तीन कलमे अशी : १. न्यायकामात अडथळा आणणे, २. राष्ट्रपतिपदाच्या अधिकाराचा दुरुपयोग करणे ३. कमिटीच्या हुकुमाची अंमलबजावणी न करणे.

२७ जुलैच्या रात्री ९ च्या अगोदरच सर्व हॉल तुडुंब भरला होता. प्रमुख वर्तमानपत्रांचे बातमीदार, छायाचित्रकार, रेडिओ, टेलिव्हिजन ह्यांचे कॅमेरे सज्ज होते.

बरोबर ९ वाजता कामकाज सुरू झाले.

सुरुवातीला पीटर रोडिनो म्हणाला :

'I am the chairmen, have been guide'l by the simple principle that the law must deal fa.ıly with every man. It ls now almost fifteen centuries since, the emperor Judimiar established, this principle for the free citizens of Rome. Seven centuries have not been passed since the English Barrored free claimed the some principle by compelling King votes, at the point of the award, th accept the great doctime of Haqua Carta–the doctime that the King, like each of its subjeets, was under God and the law. We have reachd the moment wherr we are ready to debate resolutions whethers as not the counciller of the Judisiary shall recommend that home of Represen-tatives adopt Articles calling for the inpeachment of Richard M. Nixon, Make so mistake about it. This is a turning point what we decide.

Our judgement is not counceted with an individual but with a system of constitutional Govornment.'

['ह्या कायदा–पंचायत समितीचा अध्यक्ष ह्या नात्याने मी आपणास असे सांगतो की, आपल्यापुढे विचारार्ह असा एकच एक महत्त्वाचा मुद्दा आहे व तो म्हणजे कायदा हा सर्वांच्यासाठी एकच असतो किंवा नाही?

१५ शतकांपूर्वी रोम साम्राज्याचा अधिपती जस्टिनियम ह्याने 'सर्व जनतेसाठी एकच कायदा आणि तो सर्वांना सारखा लागू' ह्या तत्त्वाचा पुरस्कार केला. त्याच्यानंतर इंग्लंडमध्ये ७०० वर्षांपूर्वी जनतेच्या प्रतिनिधींनी जॉन राजाला ह्याच तत्त्वाचा पुरस्कार करावयास भाग पाडले आणि इतक्या दिवस आपणही ह्याच तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठी विचार करीत बसलो आहोत. आतापर्यंत रीचर्ड निक्सन ह्यांच्यावर त्यांच्या गैरवर्तणुकीबद्दल सिनेटनी कायदे-शीर इलाज करावा, का करू नये हाच मुद्दा आपणापुढे चर्चिला गेला आहे. ही एका व्यक्तीची चौकशी नसून राज्ययंत्रणेची मूलभूत घटना व त्याअन्वये दिले गेलेले अधिकार ह्यावरच आपण सर्वजण मत देणार आहोत, हे विसरू नका!']

दिवाणखान्यात शांत वातावरण पसरलेलं होतं. ना कोठे कुजबूज, ना कोठे चर्चा. सर्वजण कान देऊन एकचित्ताने ऐकत होते; चौफेर नजर टाकून न्याहाळत होते.

अध्यक्ष रोडिनोच्या डाव्या बाजूला सर्वांत जुने व अनुभवी असे सभासद–कोतिअर्स, एलबर्ग, डोनेव्हू, हचिन्सन्, मॅकलोरी, ब्रुक्स व उजव्या बाजूस मेझव्हिन्स्की, मिसेस जॉर्डन, रँगेल, मिसेस होल्डसमन्

कोहेन, होगन असे तीस ते चाळीसच्या घरातले, मध्यम वयाचे व कामकाजाचा विशेष अनुभव असलेले, असे बसलेले होते.

रोडिनोने सांगितले की, १५ मिनिटांच्या आतमध्ये प्रत्येकाने आपले म्हणणे लिहून आणून त्याच्यापाशी द्यावे.

टेक्सास संस्थानातून निवडून आलेला ब्रुक्स (डेमोक्रॅट) तेवढ्या-तल्या तेवढ्यात उभा राहून म्हणाला :

'सरकार–दरबारी मोठ्या प्रमाणावर चाललेल्या लाचखाऊपणा-विषयीचा पुरावा; चोर, लुटारू, दरोडेखोर ह्यांना दिल्या गेलेल्या संरक्षणाच्या कथा, आपल्यापुढे साक्षीदारांच्या जबान्यांनी पुराव्या-सहित हजर आहेत. अमेरिकेच्या १९८ वर्षांच्या कालात अशा प्रकारची अंगावर शहारे आणणारी कृष्णकृत्ये घडण्याचे व घडविण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे. ह्या सर्वांची आपण योग्य ती दखल घ्या!'

२० मिनिटांनंतर सर्व ३७ सभासदांनी आपले मत नोंदविले. २७ सभासदांच्या मते 'निक्सन दोषी' व ११ सभासदांच्या मते 'निक्सन निर्दोषी' असे मत प्रकट झाले.

टेलिव्हिजन–कॅमेरे प्रत्येक हालचालीची व वक्तव्याची नोंद करीतच होते. मतदानाचा निकाल अध्यक्ष रोडिनो ह्यांनी जाहीर केल्यावर वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी अत्यंत खूष झाले; कारण गेली २ वर्षे सतत ते निक्सनच्या पाठीमागे हात धुऊन लागलेले होते.

बहुमताने कमिटीचा निर्णय हाच झाला की, रिचर्ड निक्सनवर तिन्ही कलमांन्वये सिनेटनी कारवाई करावी. अहवालाच्या शेवटी लिहिताना अध्यक्ष रोडिनोंनी म्हटले :

'थोडक्यात, सारांशरूपाने सांगावयाचे म्हणजे रीचर्ड मिल्हस निक्सन ह्याने '' राष्ट्रपती ' *ह्या हुद्द्याचा दुरुपयोग केला आणि* अमेरिकेच्या घटनेच्या विरुद्ध वागून न्याय व कायदा ह्यांची पाय-मल्ली केली. जनतेचा विश्वासघात केला.'

'म्हणून निक्सनवर घटनेनुसार कायदेशीर कारवाई करून त्याला राष्ट्रपतिपदावरून काढून टाकावे.'

सिनेटनी ह्याच प्रकरणाचा छडा लावण्यासाठी व आपले मत प्रकट करण्यासाठी सिनेटर सॅम अर्विन ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. अर्विनचे ह्यावेळी ७६ वर्षांचे वय होते, पण त्यांनी अत्यंत कसोशीने जबाबदारी पार पाडली.

त्याच्या कमिटीमध्ये हॉवर्ड बेकर, एडवर्ड गुरने, लोवेल वीकर हे तीन रिपब्लिकन्स होते व हरमन टॉलमेज, डॅनियल इनोय्ये व जोसेफ मॅंटोया हे तीन डेमोक्रॅटस होते.

बहुमत पक्षाशी सॅम्युएल डॅश व लघुमत पक्षानी फ्रेड थॉम्पसन ह्या नामांकित वकिलांच्याकडे आपआपली बाजू मांडण्यासाठी नेमले होते.

वॉशिंगटन येथील न्यू सिनेट ऑफिस-बिल्डिंगच्या तळघरातील हॉलमध्ये ह्या कमिटीचे कामकाज गेले वर्षभर चालू होते. कमिटीचे कार्यालय अगडबंब होते. ९७ कारकून, २५ वकील, २० चौकशी करणारे अन्वेषक, ३० निरनिराळ्या विषयांवरील तज्ज्ञ, ७१ वैय-क्तिक सेक्रेटरीज, काम्प्यूटर्सवर काम करणारे २२ दर्दी लोक. ह्या कमिटीवर सर्व मिळून जुलै १९७४ पर्यंत १५ लाख डॉलर्स खर्च झाला होता.

ह्या कमिटीने आपला निर्णय २२ जुलैलाच तयार केला होता, पण तो २४ जुलै १९७४ ला संध्याकाळी बाहेर पाडला. निर्णय स्पष्ट होता–' सिनेटपुढे निक्सनची चौकशी करावी.'

सिनेटर एरव्हिन कमिटीचा २२ जुलैचा अहवाल, सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींनी दिलेला २४ जुलैचा निकाल, आणि हाऊस ऑफ रिप्रे-झेंटेटिव्हच्या कायदा-कानू कमिटीने दिलेला २७ जुलैचा निकाल–ह्या सर्व गोष्टी रीचर्ड निक्सनला दोषी ठरवीत होत्या.

निक्सनच्या मनाची द्विधा स्थिती झालेली होती. एका बाजूने त्याचे मन सांगत होते की शेवटपर्यंत लढत घ्यावी व आपण निर्दोषी आहोत, हे काहीही करून जगाला दाखवून द्यावे. पण लगेच दुसरे मन म्हणत होते, ' जाऊ दे–झाली एवढी बेअब्रू अन नाचक्की बस झाली! आणखी मानहानी करून घेण्यात काय अर्थ आहे ?'

जबाबदार वर्तमानपत्रे २७ जुलैनंतर पुकारा करू लागली–

' GREATEST SHOW ON EARTH.'

' MIGHTY NIXON HAS FALLEN '

स्पेशल सरकारी वकील लिऑन जवरस्की दु:खाने उद्गारला–

" In Richard Nixon, Middle America had elected a man of talent and ability, a President so powerful as to change the world, so powerful that Richard Nixon alone had been able to destroy Richard Nixon!"

'मध्य अमेरिकेनी रिचर्ड निक्सनसारख्या एका बुद्धिमान आणि कर्तृत्वसंपन्न अशा व्यक्तीला पुढे खेचला, राष्ट्रपती म्हणून त्याने जगाचा सर्व नूर पालटला, पण दु:खाची गोष्ट की त्याने स्वत:च्याच हातानी स्वत:चा सर्वनाश करून घेतला !'

२० जुलै १९७४ ला सकाळी निक्सन वॉशिंग्टनला परत आला. जनरल हेग हा व्हाईट हाऊसमध्ये होताच. त्याच्याशी बोलताना निक्सन म्हणतो, ' असल्या निकालांना भिऊन जाणारा मी काही लेचापेचा राष्ट्रपती थोडाच आहे ! जज्ज सिरीकाच्या कोर्टात जे पाहिजेत ते सर्व टेप्स धाडून द्या. पण काही झालं तरी सिनेटकडून मी माझी चौकशी कधीच करून घेणार नाही. हजारो अडथळे व कायदेशीर हरकती आणीन.'

हातात असलेल्या सत्तेची धुंदी अशीच भयानक असते ! सर्व शत्रूंच्या कचाट्यातून निसटण्याचा मार्ग सापडू शकतो परंतु पापे कधी मरत नाहीत–आणि ती हात धुऊन पाठीस लागतात आणि सत्यानाश करतात याचा विसर मदांधांना पडत असतो हेच खरे. नाही तर परिस्थितीनी पुरी मात केलेली प्रत्यक्ष डोळ्याला दिसत असताना निक्सन अजूनही परिस्थितीवर मात करीन असे म्हणता ना!

जज्ज सिरीकाच्या न्यायालयात जे टेप्स द्यावयाचे होते, ते निक्स-ननी स्वत: लावून पाहिले व लक्ष देऊन ऐकले. त्यावेळी हेग, बुझार्ट, झिगलर, वॉर्डेल हे त्यांच्याजवळच होते. २३ जून १९७४ चा टेप हा फार महत्त्वाचा गणला गेलेला टेप होता. तो निक्सनने ३-४ वेळा पुन:पुन: लावून ऐकला व शेवटी म्हणाला, ह्यात विशेष असं काहीच नाही. उगीचच माझ्याविरुद्ध हे काहूर उठविलं गेलं आहे !'

२३ जुलै १९७४ चा टेप म्हणजे वॉटरगेट दरवड्यानंतर ६ दिव-सांनी झालेली बोलणी. निक्सनला त्या दिवशी सांगण्यात आलं की ॲटॉर्नी-जनरल मिचेल ह्याचे हात ह्या दरोडघाशी निगडीत झालेले आहेत. पुढील धोके लक्षात न घेता जॉन डीन, मिचेल व बॉब हल्डमन

ह्यांच्या सल्याने, निक्सनने सी. आय. ए. मार्फत F. B. I. ला कळवून टाकले की वॉटरगेट दरोड्याच्या बाबतीतील चाललेली चौकशी तावडतोब थांबवावी.

पहिली घोडचूक निक्सननी केली !

ही चूक लपविण्यासाठी त्याला पुढील दोन वर्षे जनतेशी खोटं बोलावं लागलं, प्रत्येकाला बनवावं लागलं, हाऊस-ऑफ-रिप्रेझेंटेटिव्हज व सिनेटर्स ह्यांच्याशी देखील खोटं बोलावं लागलं. इतकंच काय पण स्वत:शी देखील खोटं बोलून आत्मवंचना करून घ्यावी लागली.

जनरल हेग हा ह्यावेळी राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयाचा मुख्य होता. तो युद्धावरून परत आलेला शूर वीर, राजकारणाचा पूर्ण अननुभवी, मॅक आर्थर, मॅकनामारा, रॉबर्ट केनेडी, हेन्री किसिंजर ह्यांच्याबरोबर हिरीरीने हरएक काम केलेला. ३१ जुलै १९७४ पासून हा हेगच जणू काय राष्ट्राध्यक्ष झालेला, अशा लष्करी थाटात व्हाइट हाऊसमधून हुकूम सोडत होता. ते हुकूम पाळले जातात की नाही ह्याची पूर्ण दखल घेत होता. त्याला पूर्ण माहीत होतं की, आज ना उद्या निक्सनला व्हाईट हाऊसचा रामराम घ्यावा लागणार. उपाध्यक्ष फोर्ड ह्याला तो सर्व वेचक बातम्या समक्ष कळवीत होता. पण फोर्ड त्याच्या बातम्यांवर विशेषत: विश्वास ठेवीत नव्हता. आजपर्यंत बुचातिन, प्राइस, सफायर हे खंदे लेखनिक निक्सनच्यासाठी वाटेल त्या विषयांवर सुंदर लेख व भाषणे लिहून देत असत. ३ ऑगस्ट १९७४ ला बुचातिनने राजीनामा दिला !

निक्सनच्याजवळ आता त्याची पत्नी, दोन्ही मुली, दोन्ही जावई, प्रेस सेक्रेटरी–रोनाल्ड झिगलर व खाजगी सेक्रेटरी रोझ मेरी वुडसर व बेब रेबे झो एवढ्याच व्यक्ती होत्या. बाहेरच्या जगाशी त्याचा संबंध जवळजवळ सुटल्यासारखाच झाला होता. बाहेरून त्याला कोणी फोन केला तर हेग तो अडवून ठेवीत असे.

शनिवारी ३ ऑगस्टला निक्सन आपल्या परिवारासह कॅम्प डेव्हिड येथील निवासस्थानाकडे राहावयास गेला व सोमवारी टी. व्ही. वरून जे भाषण करावयाचे होते ते तयार करण्यासाठी म्हणून दुसऱ्या दिवशीच्या विमानानी कॅम्प डेव्हिडला लेखनिकांनी यावे म्हणून त्याने व्हाइट हाऊसमध्ये निरोप ठेवला होता.

रविवारी ४ ऑगस्टला लेखनिक प्राईस, जनरल हेग, रेबे झो, झिगलर हे जमले. प्राईस मसुदा तयार करीत होता. बरेचसे मुद्दे उपस्थित होत होते. दुरुस्त्या सुचविल्या जात होत्या. पुन: खोडणे, पुन: बदलणे, हे काम संध्याकाळपर्यंत चालूच होते. रात्री ९ वाजता कच्चा मसुदा तयार झाला. रात्री सर्वजण वॉशिंग्टनला रवाना झाले.

सोमवारी ५ ऑगस्टला वॉशिंग्टनला परत येऊन निक्सन मसुद्यावर शेवटचा हात फिरवणार होता. निक्सनचा खाजगी वकील गार्मेट हा मसुद्यावर नजर टाकण्यासाठी व्हाईट-हाऊसमध्ये आला होता.

व्हाईट हाऊसमध्ये गोंधळ-गडबड उडू नये म्हणून प्रत्येकजण सावधान चित्ताने आपले व्यवहार उरकीत होता. संभाषणाने सर्व गोष्टींचा खुलासा वेळ पाहून व्हाइट-हाऊसचा नोकरवर्ग, कॉंग्रेसमेन, सिनेटर्स ह्यांच्यापुढे जनरल हेग हा करणार होता.

निक्सनने केलेला मसुदा नजरेखालून घालण्यासाठी कॉंग्रेसमधील अल्पसंख्यांक प्रतिनिधी हिल, जॉन-होडस, रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष जॉर्ज बुश व्हाईट-हाऊसवर येऊन गेले. रिपब्लिकन पक्षातील जुनी खोडे सेंट क्लेअर व टिमान्स-निक्सनला येऊन भेटून गेली.

एक्झिक्युटिव्ह ऑफिसच्या बिल्डिंगमधील ४५० नंबरच्या प्रशस्त हॉलमध्ये, जनरल हेगने व्हाईट-हाऊसमधील वरवरच्या १५० अंमलदारांना बोलावून घेतले. निक्सन लवकरच त्यागपत्र देणार असल्याची बातमी त्याने सांगून टाकली !

५ ऑगस्टलाच संध्याकाळी ५ वाजता ॲरिझोनचा सिनेटर गोल्डवॉटर, सिनेटर कार्ल कर्टिस, डीन बर्च व इतर रिपब्लिकन सिनेटर्स ह्याच विषयाचा ऊहापोह करीत होते. N. B. C. ही टेलिव्हिजन संस्था जॉन चॅन्सेलरची ६ वाजता मुलाखत घेत होती. मुलाखतीत तो म्हणाला, ' राष्ट्राध्यक्ष निक्सनने आपल्या अधिकारात न्यायालयीन कमिटीपुढे ज्या प्रकारची खरी जबानी द्यावयास पाहिजे होती ती देऊ दिली नाही. एवढेच नाहीतर आपल्या वकिलांपासूनही सत्य दडवून ठेवले, ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी व तिरस्करणीय आहे, असेच कोणीही म्हणेल. '

ह्याच ५ ऑगस्टला संध्याकाळी ७ वाजता रिचर्ड निक्सन सिक्रोझी ह्या लहानशा बोटीत आपल्या घरच्या मंडळींच्या बरोबर मोटोमॅक नदीवर सहल करीत होता. जनरल हेगने ह्याच बोटींवर त्याला कळविले की, ६ तारखेला मंत्रिमंडळाची बैठक भरविण्याचे नक्की झाले आहे व निक्सननी हजर राहावे.

मंत्रिमंडळाची बैठक ६ तारखेला ठरल्यावेळी भरली. देशातील व परदेशातील इतर परिस्थितीचा आढावा घेण्यातच निक्सन गुंतला होता. स्वत:च्या विषयी तो काहीच बोलला नाही.

बैठकीनंतर एका तासाने किसिंजर निक्सनला भेटला व त्याने त्याला स्पष्ट सांगितले की, ' आपण होऊन पदत्याग करणे हे मानाचे आहे म्हणून तसेच करावे. ' काही वेळाने वुइल्यम टिमॉन्स भेटावयास गेला व त्यांनी देखील गोडगोड भाषेत निक्सनला तोच सल्ला दिला. संध्याकाळी जनरल हेगनी लेखनिक प्राईस ह्याला बोलावून घेतले व त्याला राष्ट्राध्यक्षांच्या राजीनाम्याचे भाषण तयार करावयास सांगितले.

बुधवार ७ ऑगस्ट उगवला. जनरल हेगची धावपळ सुरू झाली. तो कोर्टाला भेटला व त्याच्या कानांवर त्याने इत्थंभूत हकीकत घातली.

ओव्हल ऑफिसमध्ये बॅरी गोल्डवॉटर, ह्यू स्कॉट व जॉन होडस येऊन बसले. पण निक्सनजवळ राजीनाम्याचा विषय कसा काढावयाचा ह्यावर त्यांचे एकमत होईना. तरी पण ह्या तिघांनी ज्यावेळी ग्रिफिन, वॉलेस, बेनेट, नॉरिन, कॉटन, बिल ब्रॉक, जॉन टॉवर व जेकॅब जेव्हिटस निक्सनलाच भेटावयास गेले, त्यांच्याबरोबर आपली वर्णी लावली. कॅलिफोर्नियाचा गव्हर्नर रीगन हा देखील मुद्दाम गाठ घेण्यास आला. मिसिसिपीचे सिनेटर स्टेनिस व रिपब्लिकन पक्षाचा

## " आपण होऊन पदत्याग करणे मानाचे आहे म्हणून तसेच करावे " किसिंजर

# पेपको-मिल्स

खोपोली

महाराष्ट्रातील एक अग्रेसर कागद कारखाना

आमचे खोपोली येथील कारखान्यात औद्योगिक वेष्टणासाठी

लागणारे विविध प्रकारचे कागद व पुठ्ठे तयार होतात.

## पेपर ॲण्ड पल्प कन्व्हर्शन्स लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस

११८३ शिवाजीनगर

फर्ग्युसन कॉलेज रोड

पुणे ५ (महाराष्ट्र)

मिल्स्

खोपोली

जि. कुलाबा

(महाराष्ट्र)

अध्यक्ष जॉर्ज बुश हे येऊन पोहोचले. सर्वांचे म्हणणे एकच की निक्सनने पदत्याग करणे हेच त्याच्या हिताचे होईल. व्यर्थ जिद्दीला पेटून घेऊन नाचक्की करून घेऊ नये.

सर्व निघून गेल्यावर निक्सननी किसिंजरशी २ तास ह्या विषयावर चर्चा केली व अखेर निक्सनने पदत्याग करावयाचे ठरविले.

लेखनिक प्राईस ह्याने तयार केलेला मसुदा जनरल हेगने निक्सनकडे धाडून दिला. रात्री २ वाजून गेले तरी निक्सन त्या मसुद्यात दुरुस्तीच करत होता.

गुरुवार ८ ऑगस्ट उजाडला. जनरल हेगनी निक्सनच्या राजीनाम्याच्या शक्यतेची बातमी सकाळीच व्हाईट हाऊसमधील नोकरवर्गाच्या कानावर घातलेली होती.

रात्री ९ वाजता रेडिओ–टी. व्ही. वर, निक्सन पदत्यागासंबंधी भाषण करणार असल्याचे जाहीर झाले.

ठरल्याप्रमाणे निक्सन भाषण करण्यासाठी उभा राहिला. सुरुवातीसच तो म्हणाला.

" In all the decisions I have made in my public life, I have always tried to do what was best for the Nation.

I Shall resign the Presidency effective at noon tomorrow. Vice President Ford will be sworn in as President at that hour in this office. "

' राजकीय जीवनामध्ये ज्या ज्या वेळी मी महत्त्वाचे निर्णय घेतले ते राष्ट्रहिताच्या दृष्टीनेच घेतले गेले, अशी माझी पूर्ण समजूत आहे.

' राष्ट्रपतिपदाचे मी त्यागपत्र देत आहे, त्याचा अंमल उद्या दुपारपासून सुरू होईल व उपराष्ट्रपती फोर्ड हे त्याचवेळी ह्या दिवाणखान्यात अध्यक्षपद स्वीकारण्याची शपथ घेतील. '

हे भाषण करण्यापूर्वी एक्झिक्युटिव्ह ऑफिस बिल्डिंगमधे कॉंग्रेस मधील महत्त्वाच्या व्यक्ती जमा झाल्या होत्या. त्यांना भेटण्यासाठी निक्सन तिकडे वळला. प्रत्येकाच्या जवळ जाऊन, हस्तांदोलन करीत तो निरोप घेत होता. त्याचं अंतःकरण पिळवटून आलं होतं. जीव मुठीत धरून तो पुढे जात होता. निक्सनचे खास सिनेटर्स स्नेही निरोप देण्यास जमा झाले होते. काही सिनेटर्स व कॉंग्रेसमन Diplomate Reception Room मधे निरोप देण्यासाठी उभे होते. निक्सनला पाहिले आणि त्यांना रडूच कोसळले. निक्सनचे डोळे देखील ओलावले होते.

प्रत्येकाजवळ जात निक्सन सांगत सुटला :

' I have let you down–मी तुमचा विश्वासघात केला–

विश्वासघात केला......... मला माफ करा ! '

शरीरावरचा त्याचा ताबा सुटला. उभा राहाण्याचा ताण देखील त्याच्यात राहिला नाही. बॅरी गोल्डवॉटर निक्सनला धरून त्याच्याबरोबर चालत होता.

सगळीकडे रडारड — बोलणं नाहीच !

बुझार्ट व्हाईट हाऊसवर दुःखित अंतःकरणाने येऊन पोहोचले. निक्सनचे आणि त्याचे १९७३ पासूनच अनेक खटके उडालेले होते; परंतु आता एकमेकाला पाहिल्यावर दोघांनाही गहिवरून आले. दोघेही काही वेळ शांतपणाने बोलत बसले. निक्सन म्हणाला :

' काय सांगावं, हे प्रकरण कोठपर्यंत जाणार आहे ? मला एकवेळ तुरुंगवासाची शिक्षा देखील होण्याचा संभव आहे. ठीक आहे... गांधी...लेनिन ह्या महात्म्यांनी तुरुंगवासातच सुंदर लिखाण केलं... मी देखील वाचीन–लिहीन. '

बुझार्ट निक्सनची समजूत घालीत होता. त्याला हे माहीत होते की, तुरुंगात जाणारा प्रत्येकजण महात्मा नसतो !

कौटुंबिक मंडळींबरोबर व्हाइटहाऊसमध्ये निक्सनने शेवटचं जेवण केलं. कोणाचेच मन ठिकाणावर नव्हते. अगदी निकटच्या स्नेही मंडळीचे टेलिफोन येत होते. काहींना निक्सन आपणहून टेलिफोन करीत होता, पण त्या बोलण्यात आर्जवीपणा अन् काकुळती अधिक होती.

' I am sorry ! I have let you down ! ' हीच वाक्ये एकसारखी त्याच्या तोंडातून बाहेर पडत होती.

रात्र केव्हाच संपून गेली. ९ ऑगस्ट उजाडला. सकाळपासूनच टेलिफोनवर टेलिफोन येत होते. व्हाईट हाऊसमधील नोकरवर्ग आपल्या सत्ताधीशाचे अखेरचं दर्शन घेण्यासाठी Grand Hallway-Guest wing च्या बाजूला जमा झाला होता. हिरवळीवरील एका कोपऱ्यात बरेचसे सिनेटर्स, कॉंग्रेसमेन सकाळपासूनच निक्सनला पाहण्यासाठी उभे होते.

पहिल्यांदा ट्रिशिया, नंतर मिसेस निक्सन, नंतर निक्सन, त्याच्या पाठोपाठ ज्यूली व डेव्हिड आयसेन हॉवर अशी रांगेने सर्वांचे निरोप घेत होते.

दुपारी १२ वाजता फोर्डचा शपथविधी होणार होता; तेव्हा त्या तयारीला बरेच व्हाईट-हाऊसमधील नोकर गुंतलेले होते.

व्हाईट-हाऊसच्या हिरवळीवर आणून ठेवलेल्या हेलिकॉप्टरमध्ये सर्वजण जाऊन बसले आणि दुपारी १२ वाजून पंचवीस मिनिटांनी सेंट ॲन्ड्रुज विमानतळावर जाऊन पोहोचली.

निक्सनचे विमान काही वेळातच मध्यअमेरिकेच्या भागावरून जात होते. एलिनॉइस व मिसुरी ह्या संस्थानांचा तो भाग होता. ह्या भागातील ८० टक्के मत १९७२ च्या निवडणुकीत निक्सनला दिले गेले होते. बऱ्याच वर्षांत मध्यअमेरिकेला त्यांचा असा नेता मिळाला नव्हता. निक्सन हाच त्यांचा पहिला आणि आता तरी शेवटचाच असा नेता ठरला. ज्यांनी त्याच्यावर अलोट प्रेम केलं त्यांचा त्याने विश्वासघात केला होता.

निक्सनने स्वतःची राजकीय हत्या स्वतःच करून घेतली होती. कायदा, न्यायदेवता, वर्तमानपत्रे, न्यायालयीन कमिट्या-किंवा मिचेल, मॅग्रूडर, डीन, हल्डमॅन, एहरलिचमन–ह्यांच्यासारख्या बदमाष व्यक्ती–यांच्यापैकी कोणी कोणीही त्याचा राजकीय खून केलेला नव्हता.

अमेरिकेत वरच्या थरामध्ये वावरणारा कम्युनिस्ट अल्जर हिस

## " विश्वासघात केला.........मला माफ करा ! "

ह्यांची १९४८ साली निक्सनने पाळेमुळे खणून काढली. त्याला १९५० साली ५ वर्षांची शिक्षा झाली. तो ह्या वेळेस बाहेरच होता. तो अत्यंत बुद्धिमान होता. त्याच्याविषयी बोलताना निक्सन १९५० साली म्हणाला होता :

" It is not a pleasent picture to see the whole brilliant career of this person destroyed before his own eyes. "

[ आपल्याच डोळ्यादेखत नेत्रदीपक आयुष्यक्रमाची वाट लागलेली पाहणे त्या माणसाच्या नशिबी यावे, हे दृश्य क्लेशकारक आहे. ]

९ ऑगस्ट १९७४ ला निक्सन वॉशिंग्टन सोडून 'सा क्लेमंटी' येथे निघून गेला आणि लगेच दुसऱ्या दिवशी रात्री ABC नि T. V. वर मुलाखत देण्यासाठी ह्याच अल्जर हिसला बोलावून घेतले. मुलाखतीत तो निक्सनविषयी तेच म्हणाला :

" This is political obituary of Nixon. It is not a pleasant picture to see the whole brilliant career of this person destroyed, before his own eyes ! "

[ निक्सनला ही राजकीय श्रद्धांजलीच आहे. आपल्याच डोळ्यादेखत, नेत्रदिपक आयुष्यक्रमाची वाट लागलेली.. ... ]

९ ऑगस्ट १९७४ ला ही घटना घडली पण ती एकदम, अकस्मात घडलेली अशी घटना नव्हे. निक्सनचा अध:पात हा कसा घडला, कोणी घडवून आणला ह्याची पूर्ण उकल करावयाची झाल्यास १९४६ पासूनची निक्सनची कारकीर्द सविस्तरपणे तपासून पाहावी लागेल. कारण पापाची रास झाली म्हणजे ती नजरेत भरत असली तरी त्याची सुरुवात कणाकणाने सुरू हीत असते.

[ क्रमशः ]

## आभार

गजाझाड असलेल्या व नसलेल्या अनेक मित्रांनी 'माणूस' परिवाराला दीपावलीनिमित्त कलात्मक अशा शुभेच्छा-पत्रिका पाठवल्या आहेत. जागेअभावी सर्वांचा उल्लेख कठीण आहे. तरी पण....

Simplex Eng. Co., Bombay.
Premchand Kasturchand & Sons, Bombay.
Sulekha Printers, Pune.
Bhargaw Rolling Shutters, Latur.
M/s Rachana Products, Pune.
Swaroop Mudran, Pune.
R. C. G. Instruments, Pune.
Pamm Enterprises, Pune-2.
Kulkarni Eng. Asso. Pvt. Ltd., Sangli.
Ace Copiers, Pune.
Sangam Press Ltd, Pune.
Joshi A. V. Agencies, Bombay.
Sumangal Calender Company, Bombay.
सदानंद प्रकाशन, पुणे.
मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई.
स्टुडिओ सालकर, पुणे.
यशवंत सहकारी साखर कारखाना लि. अकलूज.
स. प्र. भट, इगतपुरी.
आर्. आर्. नातू, कोल्हापूर.

श्री. मु. शं. किर्लोस्कर, पुणे.
" गोपालजी ठक्कर, पुणे.
" व्ही. जी. व श्रीमती कुसुम कुलकर्णी, पुणे.
" श्रीहरी परांडे, नागरगाव.
" शाम बोरगावकर, पुणे.
" भरत अवचट, पुणे.
" प्रकाश विश्वासराव, मुंबई.
" सुरेश खेर, मुंबई.
" स. वि. देवधर, पुणे.
" बी. टी. धामणे.
" सुहास श्रीमती माधवी बाक्रे, ठाणे.
" कांतीभाई पारीख, येरवडा.
" जुगल व श्रीमती सुशीला राठी, पुणे.
" आनन्द व श्रीमती ऊर्मिला बागलकोटे, मिरज.
" द. रा. मेहेन्दळे, येरवडा.
" अप्पासाहेब जोशी.
" उमाकांत ठोमरे, मुंबई.
" मनोहर कुलकर्णी, नासिक.
" प्रकाश जावडेकर, येरवडा.
" राम जगताप.

**या सर्वांच्या सहभावाबद्दल मन:पूर्वक आभार**
**माणूस परिवार.**

## पुस्तके

### Winning Through Intimidation

By Robert J. Ringer
( Fawcett Publications,
Pages 303, Rs. 18·95 ).

सध्या USA मध्ये दोन पुस्तके फार गाजत आहेत. ही दोन्ही पुस्तके दुसऱ्यावर वरचष्मा ठेवून यश कसे संपादन करावे या विषयावर आहेत. (आता प्रत्येकजण प्रत्येकाला दहशत घालायला लागला तर शेवटी-भेडसावयाचं कुणाला हा एक प्रश्न उपस्थित होईलच म्हणा! या विषयावर एक छान विनोदी लेखही लिहिता येईल!) त्या दोन पुस्तकांत रींगरचे वरील पुस्तक तर आहेच, पण दुसरे Power! How to Get It, How to Use It–by Michael Korda (Rondom House. Rs. 90/–) हे पुस्तकाशी याच विषयावर आहे. या दोन्ही पुस्तकांचा परिचय येथे करून देतो.

ज्या ऑफिसमधून सत्ता ओसंडत आहे ते ऑफिस कसे असावे? ते एका कोपऱ्यात गडद निळ्या रंगाचे असावे व त्यात लाल रंगाच्या छटा असाव्यात म्हणजे भेटीला आलेल्या लोकांत थोडीशी दहशत निर्माण होईल. तुमच्या खुर्चीपेक्षा इतरांच्या खुर्च्या थोड्या कमी उंचीच्या असाव्यात. अॅश ट्रे पाहुण्यांची थोडी गैरसोय होईल अशा ठिकाणी ठेवावी. अभ्यागताशी सौदा करावयाचा असेल तर त्याला अगदी समोरासमोर बसवावे. सौदा चुकवायचा असेल व त्याला फक्त खूषच करावयाचे असेल तर कुठे बसावे ते आकृत्यांसहित दाखविले आहे!

तुम्ही स्वतः जर भेट देणारे असलात तर यजमानाला फोन करावयाचा आहे असे सांगून त्याच्या टेबलावरच बसावे (Violation of territory) व फोनच्या रिसीव्हरवरून आत्मविश्वासानं बोटं फिरवावी! आणि त्याच्या मागचा संकेत असा आहे, 'It is a Strong Phallic Power Symbol!'

आता समजा पाहुणा तुमच्यापेक्षा वयाने मोठा असेल तर त्याची त्रैधातिरपिट कशी उडवून द्यायची? तुमच्यापेक्षा त्याला अनुभव निश्चितच जास्त असणार. पण त्याला न्यूनगंड वाटावा म्हणून अगदी हळू बोलून तो बहिरा होत चालला आहे की काय असा त्याला भास होऊ द्या. याने काम झाले नाही तर त्याला जुन्या आठवणी सांगायला लावा. म्हणजे तो जुन्या धोरणांचा पाठपुरावा करायला लागेल. तो एकदा तसे करायला लागला की तो *Out-of-date* होत चालला आहे अशी अप्रत्यक्ष सूचना द्या! उदाहरणार्थ– 'सध्याचे जग फारच झपाट्याने धावत आहे. त्यात वयोवृद्ध माणसे होरपळून निघत असतील.' म्हणजे त्याचा आत्मविश्वास थोडा खचेल!

आपले बूट नेहमी चकचकीत ठेवा. ज्याचे उत्पन्न अगदी जबरदस्त असेल त्याने ब्रीफकेस वगैरे घेऊन हिंडू नये, असाही एक trend USA मध्ये चालला आहे.

रिंगरला बऱ्याच लोकांनी शेंडी लावली होती. त्याच्या दलालीच्या धंद्यात काही माणसे त्याचे कमिशनच बुडवत. याला अमेरिकेत कमिशनडेक्टोमी म्हणतात. म्हणजे डॉक्टर लोक जसे टॉन्सिल्स कापायला टॉन्सिलेक्टोमी, नसबंदीला वॅसेक्टॉमी, अपेंडीसायटीस् काढण्याला जसे अॅपेन्डेक्टॉमी, गर्भाशय काढण्याला हिस्टरेक्टोमी म्हणतात तसे. (आता माझ्या वाचनालयाची वर्गणी कुणी बुडवली तर त्यांनी सब्स्क्रीप्शनडेक्टोमी केली असे म्हणायला हरकत नाही!) तर ती 'कमिशनडेक्टोमी' न व्हावी याला रिंगरनी काय तोडगा काढला बघा! त्याने १०×१० इंचाचे प्रत्येकी ५० रु. किंमतीचे व्हिजिटिंग कार्डस् छापली! (म्हणजे काही धंदा झाला नाही व एखादे कार्ड परत मिळाले नाही की अल्सरच व्हायचा!) पण USA मध्ये ५० रु. म्हणजे ५ डॉलर. त्या कार्डावर अॅपॉलो स्पेसशिपमधून पृथ्वी कशी दिसते त्याचा फोटो होता. 'विचारी लोक पृथ्वीवर पैशाची चांगली गुंतवणूक करतात!' अशा आशयाचा मजकूर होता. साहजिकच एवढे इंप्रेसिव्ह कार्ड बघून काही लोक intimidate झाले. असले व्हिजिटिंग कार्ड धारण करणारा मनुष्य अनन्यसाधारण असेल असा साहजिकच लोकांचा समज झाला. यापुढे रिंगरच्या दहशतवादी धोरणाला सुरुवात झाली व त्याची व कॉरडाची पुस्तके लोकप्रियतेच्या लाटेवर डौलाने आरूढ झाली. कधी कधी रिंगर तर आपल्या अशिलांना विमानतळावर बोलवीत असे. तिथे त्याचे स्वतःचे विमान असे. रिंगरना अशिलांना जणू असेच म्हणावयाचे आहे: 'बघा व माझ्या वैभवाने घाबरा म्हणजे तुमच्याशी व्यवहार करायला मला सोपे जाईल!'

रिंगर हा दिसायला अगदी सामान्य आहे. त्याचा फोटो बघून तो हुषार वगैरे आहे असे खचितच कोणी म्हणणार नाही. उलट फोटोत


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १) | तसबीर आणि तकदीर–(आत्मचरित्र)– श्री. के. क्षीरसागर | रु. ४०/– |
| २) | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी–पु. ल. इनामदार | रु. २०/– |
| ३) | 'हंस' कथा (भाग ५ वा)–संपादक-आनंद अंतरकर | रु. १५/– |
| ४) | अरेबियन नाईट्स् (भाग ३ रा)–अनुवाद-गौरी देशपांडे | रु. ५०/– |
| ५) | काळाची पावले–(स्त्री व बालजीवनविषयी लेख) कृष्णाबाई मोटे | रु. १५/– |
| ६) | कर्ण खरा कोण होता?–(कर्णासंबंधी लेख)–दाजी पणशीकर | रु. १५/– |
| 1) | **Winning Through Intimidation**–( Bestseller-Nonfiction–Gate-crash your way to success by bullying other!)–Robert J. Ringer | Rs. 18/90 |
| 2) | **Schdar Extraordinary**–The Life of professor the Rt. Hon. **Friedrich Max Mullar P. C.**–(Biography) Nirad C. Chaudhari | Rs. 85/– |

- आपणास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवतो (V. P. नाही.)
- खास फॅक्टरीतील लोकांचे सोयीकरीता लायब्ररी दर बुधवारी बंद राहील.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

तो सामान्य व मख्खच वाटतो! आणि कॉरडा मात्र कोल्ह्यासारखा धूर्त वाटतो. कॉरडाचे पुस्तक रिंगरपेक्षा फारच सफाईदार आहे. तो सत्तेच्या हपापाने जवळजवळ पछाडलेला, पेटलेलाच आहे. जाता जाता असे सांगावेसे वाटते की, अलीकडे आपल्या मोठ्या शहरात सुद्धा बऱ्याच लोकांना ही दहशतवाद्यांची कला न शिकवता अवगत आहे. बापाचा दहशतवाद बघून मुलगा शिकतो. एक यशस्वी होण्याच्या मार्गावर असलेली व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडून त्याचे धडे घेतच असते. पण ज्यांना या कलेची उत्तुंगता गाठायची आहे त्यांनी ही दोन्ही पुस्तके अवश्य वाचावी. जीवन हे फार अनिश्चित, तोकडे व अर्थहीन आहे म्हणून तुम्हाला जितके पैसे कमवता येतील तेवढे कमवा व मजा लुटा, असे कॉरडा व रिंगर यांचे म्हणणे आहे. आता हे काय नवीन पिढीला सांगायला हव? रिंगर प्रस्तावनेत तर म्हणतो की, वास्तवतेला संपूर्णपणे समजून घ्यायला पृथ्वीवर अवसरच मिळणार नाही. विश्वात दुसरीकडे त्यासाठी धडपड चालली असावी.

एक गोष्ट मात्र कबूल करावी लागेल की, जे काही वाटतं ते हे लोक सरळ सांगून टाकतात. सध्याच्या प्रस्थापित व्यवस्थेसारखा खोटा आव आणीत नाहीत. मुखमें राम बगलमें छुरी हे या लोकांनी टाळले आहे.

रिंगरच्या पुस्तकाबद्दल आणखी एक गोष्ट सांगायला हवी ती ही की, सबंध पुस्तक वाचून काही लोकांची कल्पना होईल की, हे पुस्तक म्हणजे Real Estate च्या एजंटची कहाणी आहे. ती तर आहेच, परंतु त्याची कहाणी म्हणजे एक उदाहरण आहे. त्यातले निकष तुम्ही इतर क्षेत्रांत सहज लावू शकता.

आधी प्रामाणिकपणे कष्ट करून रिंगरने पैसा मिळविण्याचा प्रयत्न केला. पण त्याला कळून चुकले की, या 'जंगलात' (तो 'रेट-रेस' ला सरळ जंगल म्हणतो!) या गुणाचा निभाव लागणार नाही. त्यापुढे त्याने स्वतःचे असे एक तत्त्वज्ञान बनवले व या तत्त्वज्ञानाचा त्याला 'जंगलात' बराच उपयोग झाला!

पुस्तकातले काही कार्टुन्स बरे आहेत. पार्किन्सन लॉ प्रमाणेच रिंगरने स्वतःचे सिद्धांतही या पुस्तकात मांडले आहेत. कदाचित 'पार्किन्सन लॉ' इतकीच ही पुस्तके लोकप्रिय होतील व सध्याची तरुण पिढी तर ही पुस्तके अगदी चवीने वाचेल.

सध्याचे जग झपाट्याने बदलत आहे. कालच्या नीतिमूल्यांना येथे काही किंमत नाही. जे संवेदनाशील लोक तडतोड न करता आपली नीतिमूल्ये जपून ठेवतील ते flotsam व Jetsam बनून लांब फेकले जातील. किंबहुना असले लोक समाजात हळूहळू कमीच होत जातील. कारण त्यांचा निभावच लागणार नाही. असल्या वातावरणात ज्यांना टिकून राहायचे आहे त्यांच्यासाठीच ही रिंगर व कॉरडाची पुस्तके आहेत!

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ — ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ — ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ — ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ — ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ — ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ — ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ — ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ — ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ — ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० — ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ — ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ — ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ — ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० — ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ — ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० — ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ — ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ — ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ — ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० — ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० — ०० |
| २२ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० — ०० |

# कहाणी पिरॅमिडची....

## एका लोकविलक्षण मजेशीर प्रयोगाची !

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

तशी धमाल तर आपल्याभोवती सगळीकडेच सुरू असते. एखादा अशोक शहाणे वा शंकर सारडा उठतो आणि भल्याभल्यांना गुगली टाकून मोकळा होतो. अत्रे–फडके वादाची याद देत डॉ. स. गं. मालशे आणि म. वा. धोंड असे मोठे विद्वान कधी रिंगणात उतरतात. राजा ढाले भोवतालची माणसे चक्रावून जातील असे काही बोलतो. अरेबियन नाईटस प्रसिद्ध करताना रमेश रघुवंशी उगाचच 'अला आला डूर'ची डरकाळी फोडतो.

–मजेची गोष्ट अशी की, आपल्याभोवती इतर हजार क्षेत्रांत हे जे घडते तेच नेमके जगभरच्या विज्ञानक्षेत्रातही अधूनमधून घडते. अशा वेळी विज्ञानक्षेत्रातील या प्रयोगांची रंगत भलतीच वाढते. तसे पाहता फक्त आपल्या भारतवर्षापुरतेच बोलावयाचे तर विज्ञान-क्षेत्रात तसे वाटेल ते नेहमीच घडत असते. येथे सत्यसाईबाबा जादूचे प्रयोग करतात. चक्क आपल्या हातामधून नंबर असलेली स्विसमेड घड्याळे बाहेर काढतात. आपले भारतातील शास्त्रज्ञ (सोलकढी-वाल्या अनंतरावांच्या भाषेतील फार्र फार्र मोठे शास्त्रज्ञ) या प्रयोगांना भक्तिभावाने हजर असतात. एखाद्या शास्त्रीय मासिकात एखादा भारतीय शास्त्रज्ञ प्राचीन भारतीयांना जगातील चालू घडीचे सारे ज्ञान कसे अवगत होते, यावर एखादा अभ्यासपूर्ण लेख लिहितो. अहमदाबादचा एखादा शास्त्रज्ञ विज्ञानाचे सारे नियम खुंटीला टांगून पाऱ्याचे चक्क सोने बनवितो. शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत हटयोगी राव चक्क पाण्यावर चालण्यास निघतात. योगसामर्थ्याने एखादा योगी मंगळावर पोचलेल्या व्हायकिंगवर मात करतो !

हे सारे राहू द्या. यावर माझा कधी विश्वास नव्हता. पण विज्ञान आणि भोळेपणा यांच्या सीमारेषेवर अनेकदा एखादे विलोभनीय इंद्रधनुष्य उभे राहते. मला आठवते, तीन–चार वर्षांपूर्वीची गोष्ट. मुंबईत फ्ल्यू पसरावा तशी तांब्याच्या कड्यांची साथ पसरली होती. या तांब्याच्या बांगड्या हातात घालून आमच्यासारखे अनेक मर्द विश्वासाने वावरत होते. किमान घालणाऱ्यांचा एक अनुभव होता. या कड्यामुळे हातातील कंप थांबत होता. हातातील दुःख कमी होत होते. सारे लोक खोटे बोलत होते, असे मुळीच नव्हे. हा मानस-शास्त्राचा खेळ होता किंवा तांब्याच्या कड्यांमधून खरोखरच काही लहरी वाहत होत्या. काही तरी वेगळे घडत होते खास ! आता-पर्यंतच्या ज्ञात ज्ञानाला वाकुल्या दाखवत हे गंमतीदार अनुभव मिस्कीलपणे उभे होते !

या तांब्याच्या कड्याची गोष्ट भारतात घडते त्या वेळी एक बरे असते. 'नॉनसेन्स' या एका शब्दात आपण त्याचा निकाल लावू शकतो. पण हेच परदेशात घडते, तोलामोलाच्या शास्त्रीय मासिकात येते, त्या वेळी थोडी पंचाईत होते. पु. ल. देशपांडे यांनी एके ठिकाणी म्हटलंय, 'चाळीमधल्या तरुण-तरुणींनी केले तर ते लफडे–नल-दमयंतीने केले तर ते प्रेम !' नेमके अगदी असेच काहीसे होते. सांगण्याचा मुद्दा थोडा वेगळा. तुम्हा–आम्हाला लहानपणापासून पुस्तकातून परिचित असलेले इजिप्तचे पिरॅमिडस जगातले एक महत्त्वाचे आश्चर्य. भल्याभल्यांना चक्रावून टाकणारे. विज्ञानाची मती गुंग करणारे. त्या पिरॅमिडसनी सध्या आणखी एक धमाल उडवून दिली आहे. त्याचे प्रयोग जगभरच्या विज्ञान मासिकांतून प्रसिद्ध होत आहेत.

### पिरॅमिडचे रहस्य.....

तसे पाहिले तर या पिरॅमिडची नुसती निर्मिती हेच तसे अजून विसाव्या शतकातील मानवाला न सुटलेले कोडे आहे. हे पिरॅमिडस बांधले कुणी ? बांधले कसे ? बांधले का ? बांधले कधी ? या साऱ्या प्रश्नांवर एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभा असलेला माणूस काही तरी थातूरमातूर, अघळपघळ, गोलमाल उत्तरे देऊन मोकळा होतो ! एवढे बरीक खरे, हे पिरॅमिडस म्हणजे पाच हजार वर्षां-पूर्वीच्या मानवाच्या ज्ञानाचे आणि कौशल्याचे जीतेजागते मानदंड. या पिरॅमिडसपैकी फार महत्त्वाचा मानला गेलेला गिझाचा पिरॅमिड पाहा. हा इसवी सनापूर्वी तीन हजार वर्षे या काळात बांधला गेला असावा. प्रचंड आकाराचे तेवीस लाख दगड त्यासाठी वापरण्यात आले. त्यातील प्रत्येक दगड हा आधुनिक विज्ञानाने आश्चर्याने पाहावे अशा काटेकोरपणे कापण्यात आला. त्यानंतर हे दगड पद्धत-

क्षीरपणे एकमेकांवर रचण्यात आले. ४८० फूट उंचीचा एक भव्य पिरॅमिड त्यातून उभा राहिला. त्या पिरॅमिडच्या प्रत्येक बाजूची लांबी ७६१ फूट आहे. प्रत्येक बाजू अगदी अचूकपणे जमिनीला ५१° कोन करून उभी आहे.

या वाळवंटात हे दगड आणले, कोठून ? आणले कुणी ? आणले कसे ? ज्ञात इतिहासाप्रमाणे त्या वेळच्या मानवाला यंत्रे ज्ञात नव्हती. मग हे दगड एकमेकांवर रचले कसे ? अनेक भिन्न भिन्न मतप्रवाह याबाबत प्रचारात आहेत. 'हत्ती आणि सात आंधळे' या गोष्टीमधील आंधळ्यांनाही हसू यावे, एवढे हे मतप्रवाह परस्पर विरोधी आहेत ! कोणी म्हणतात, त्या वेळी इजिप्तमध्ये एखादी आणीबाणी पुकारली गेली असेल. एका हुकूमशहाच्या मर्जीखातर लक्षावधी लोकांना तोंडात लगाम घालून आणि डोळ्यांना झापडे बांधून काही दशके गुलामासारखे वेठीला लावले असेल. हे दगड एवढ्या उंचीवर चढविण्यासाठी बांधकामाच्या जवळच एखादा उंच डोंगर उभारला असेल. त्या डोंगरावर घाटात असतो तसा उतरणीचा रस्ता बांधला असेल आणि त्या घाटात पायात आणि तोंडात दोऱ्या अडकविलेले मजूर पाठीवर चाबकाचे आसूड घेत हे दगड ओढत राहिले असतील. मग आणखी एक प्रश्न उरतो, हे पिरॅमिडस बांधले कशासाठी ? अखेर हे पिरॅमिडस वापरले गेले राजांची थडगी म्हणून. प्रत्येक हुकूमशहा हा अखेर स्वतःचे थडगे स्वतःच्याच हातांनी बांधत हिंडत असतो. त्यासाठी अनुशासनात गोवलेले लक्षावधी लोक चकार शब्द न बोलता राबत असतात. त्यातून उभ्या राहतात या अशा भव्य डोळे दिपवणाऱ्या वास्तू ! ज्या पाहून बघणाऱ्यांचे डोळे दिपतात. पण भोवतालच्या समाजाच्या दृष्टीने त्याची किंमत असते शून्य ! त्या समाजाची दुःखे कमी करावयास या वास्तूचा उपयोग नसतो. कारण या वास्तू उभारताना जनतेला वेठबिगारी म्हणून वापरले जाते, माणूस म्हणून नव्हे. ही वास्तू का व कशासाठी बांधावयाची, हे विचारावयाचा त्या गुलामांना अधिकार नसतो. तोंडात लगाम घालून आणि डोळ्यांना झापडे बांधून त्यांनी फक्त काम करावयाचे असते. अगदी स्वतःलाच नकळत हुकूमशहाचे थडगे उभारण्यासाठी !

असो ! हे आपले शास्त्रीय जगातले एक सरळ, सोपे, बालबोध मत. अगदी दुसऱ्या टोकाचे शास्त्रीय जगातले मत लक्षात घ्यावयाचे तर काही मोठे शास्त्रज्ञ म्हणतात, पाच हजार वर्षांपूर्वीचा माणूस काही वाटेल ते केले तरी असले अचूक आणि भव्य बांधकाम करू शकणार नाही. परग्रहावरील काही माणसे त्या वेळी या पृथ्वीवर उतरली असतील. आज आपण चंद्रावर उतरतो ना त्याप्रमाणे. आपल्या प्रयोगांना वा अंतराळयानांना उपयोगी पडतील, अशा या वास्तू त्यांनी बांधल्या. त्यानंतर आयत्या बिळावर नागोबा या न्यायाने कोणी तरी राजाने केव्हा तरी त्यात आपले थडगे बांधले.

सांगण्याचा मुद्दा एवढाच की, या पिरॅमिडची निर्मिती, त्याचे कार्य, त्याच्यातील गुप्त खजिने याबाबतचे मानवाचे आजचे ज्ञान अगदी अकटोपासून विकटोपर्यंत आहे. आणखी एक—या पिरॅमिडबाबतची एक भयंकर सत्य गोष्ट तुमच्यापैकी बहुतेकांनी या पूर्वीही ऐकली असेल. हे पिरॅमिड ज्यांनी सर्वप्रथम शोधले, त्याचे उत्खनन केले, त्या मोहिमेत भाग घेतला, त्या सर्वांचा 'सत्यानाश' झाला. कोणी आत्महत्या केली, कोणाला वेड लागले, कोणी विचित्र साथींना वा विचित्र दुखण्यांना बळी पडले, कोणाचे खून झाले, कोणाला अनाकलनीय अपघात झाले. त्या सर्वांची जंत्री इतिहासात ज्ञात आहे. कोणी म्हणतात, त्या पिरॅमिडच्या आतील मृत व्यक्तींनी या सर्वांना तळतळाट दिले. तसे पाहिले तर या घटना ऐतिहासिक घटना म्हणून खऱ्या आहेत. पण या घटनांचे शास्त्रीय पृथक्करण झालेले नाही. कावळा बसल्यावरही फांदी मोडते. कावळ्याच्या शापाने गाय गेली असेही कोणाला वाटते. पण या घटनेला विज्ञानक्षेत्रात महत्त्व नसते.

## पिरॅमिडचा आतला आवाज. . . .

पण यावेळी पिरॅमिडने निर्माण केलेले गूढ वेगळे आहे. अधिक गहिरे आहे. या पिरॅमिडसची सुप्त शक्ती.—या पिरॅमिडच्या आकारातील आतला आवाज—पिरॅमिडच्या हृदयातील हळुवार स्पंदने—त्यातून फिरणाऱ्या अद्भुत शक्तीच्या अणुलहरी (Micro waves). या व असल्या अनोख्या शब्दांनी यावेळी शास्त्रीय जगात नुसती धमाल उडवलीये ! भल्या भल्या शास्त्रज्ञांना या पिरॅमिडच्या आकारातील आतल्या आवाजांनी गुंग करून टाकलाय. यावेळी या पिरॅमिडसनी शास्त्रीय जगाला खरोखरच एक धक्का दिलाय.

या पिरॅमिडच्या आत काही अद्भुत शक्ती असावी अशी इतिहासातील सर्वप्रथम नोंद तशी नेपोलियन बोनापार्टने केली आहे. नेपोलिअनने एक रात्र या पिरॅमिडच्या आतील कफनगृहात मुक्काम केला होता. दुसऱ्या दिवशी नेपोलियनने नोंद केली— मला काल रात्री अनाकलनीय, विचित्र, विलक्षण अनुभव आले. पण ते अनुभव एवढे विलक्षण आहेत की, ते सांगण्याची माझीही हिंमत नाही. लोक मला वेड्यात काढतील. नेपोलियनने आपला अनुभव नोंदवला खरा, पण तो विज्ञानक्षेत्रात कुणी फारसा मनावर घेतला नाही. दशके आणि शतके ओलांडली. नेपोलियनने केलेली ती नोंदही तशी विस्मृतीत जमा झाली आणि १९७० साली पाश्चात्य देशात एक छोटेसे वादळ उठवीत या पिरॅमिडच्या 'आतल्या आवाजाने' प्रवेश केला.

१९७० सालची गोष्ट. शैल ओस्ट्रेंडर (Shetla Ostrander) आणि लीन श्रोडर (Lynn Schroeder) या दोन फ्रेंच बाबू मोशायांनी एक वेगळे पुस्तक लिहिले. पुस्तकाचे नाव होते— 'पोलादी पड्यामागे चाललेले मनोवैज्ञानिक प्रयोग' (Psychic Discoveries Behind the Iron Ourtain). एका मान्यवर प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रसिद्ध केले होते. या पुस्तकात असा सप्रमाण दावा आहे की, पिरॅमिडच्या आकारात काही शक्ती असते आणि त्या शक्तीचा वापर करण्याचे तंत्र सेकोस्लाव्हाकिआने आत्मसात केलेले आहे.

सेकोस्लाव्हाकिआतील या प्रयोगांची सुरुवातही तशी मजेशीर योगायोगाने झाली. १९३० सालची गोष्ट. बोव्हिस (Bovis) नावाचा एक प्रवासी या पिरॅमिडमधून हिंडत होता. पिरॅमिडमध्ये राजाची कबर जेथे असते त्या खोलीतून हिंडत असताना त्याला एक गोष्ट आढळली. त्या खोलीत केराची टोपली होती. मेलेले उंदीर, मांजरे, खारी त्यात टाकलेले होते. वाळवंटातील हे प्राणी कधी चुकून पिरॅमिडमध्ये शिरतात. परतीचा रस्ता सापडला नाही

तर भुकेने व्याकूळ होऊन हे प्राणी पिरॅमिडमध्येच मरण पावतात. पिरॅमिडची साफसफाई करणारा माणूस हे सारे प्राणी एकत्र करून त्या कोपऱ्यातील कचऱ्याच्या पेटीत ठेवतो. सारी पेटी भरली की ती बाहेर वाळवंटात नेऊन फेकून देतो. म्हणजे हे मेलेले प्राणी काही दिवस, काही वेळा काही आठवडे, या कचऱ्याच्या पेटीत पडून असतात. बोव्हिसला आढळलेली आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या पेटीत टाकलेल्या त्या प्राण्यांना वास येत नव्हता. ते सडले वा नासले नव्हते. खरे पाहता राजाचे कफन असलेल्या त्या खोलीची आर्द्रता (humidity) तशी खूप होती. तरीही ते प्राणी खडखडीत वाळून त्यांच्याही त्या खोलीतील राजाप्रमाणेच ममी बनल्या होत्या. बोव्हिसने आणखीही काही गोष्टींची नोंद केली. कोणत्याही पिरॅमिडमध्ये राजाचे थडगे असलेली खोली एकूण पिरॅमिडच्या बरोबर तिसरा हिस्सा उंचीवर बांधलेली असते. म्हणजे पिरॅमिडची उंची तीनशे फूट असेल तर ही थडग्याची खोली बरोबर १०० फूट उंचीवर असते. आणखी एक गोष्ट म्हणजे पिरॅमिडचा पाया बरोबर चुंबकीय उत्तर–दक्षिण ध्रुवावर असतो.


बोव्हिस विज्ञानाचा नम्र अभ्यासक होता या नोंदी बरोबर घेऊन तो आपल्या घरी गेला. त्याने पुठ्ठ्याचा एक पिरॅमिड बनविला. त्या पिरॅमिडच्या बरोबर तिसरा हिस्सा उंचीची एक छोटी पेटी बनवली. ती पेटी त्या पिरॅमिडच्या आत ठेवली. आणि त्या पेटीच्या वरच्या भागावर पिरॅमिडच्या एक तृतीयांश उंचीवर आलेल्या त्या भागावर एक पुठ्ठा बसवला. या पुठ्ठ्याला नाव दिले व्यासपीठ या व्यासपीठावर त्याने काही प्रयोग केले. त्यापूर्वी पिरॅमिडचा पाया आणि हे व्यासपीठही उत्तर–दक्षिण ध्रुवाच्या समरेषेत ठेवावयाची काळजी घेतली.

बोव्हिसने प्रथम दोन मेलेली मांजरे घेतली. त्यातले एक मांजर त्याने पिरॅमिडच्या आत व्यासपीठावर ठेवले. दुसरे मांजर पिरॅमिडपासून लांब एका डब्यात ठेवले. त्या डब्यावरही झाकण ठेवले. आणि बोव्हिसला एक विचित्र गोष्ट आढळली. पिरॅमिडच्या बाहेर ठेवलेले मांजर काही दिवसांत सडून गेले. त्याला दुर्गंधी येऊ लागली. पिरॅमिडच्या आत ठेवलेल्या मांजराची मात्र खडखडीत वाळून एक झकास 'ममी' बनली. बोव्हिसने आपला प्रयोग उंदीर, घुशी, कुत्रे, खारी या प्राण्यांच्या मृत देहावर केला आणि प्रत्येकवेळी त्याला हाच अनुभव आला. बोव्हिसने आपले प्रयोग आणि अनुभव प्रसिद्ध केले आणि आणखी असेच काही दिवस गेले. दोन तीन दशके ओलांडली. बोव्हिसला एक समानधर्मी भेटला. कार्ल ड्रॅबल (Karle Drabal) या झेक रेडिओ इंजिनीअरला या प्रयोगांचे कुतूहल वाटले तो बोव्हिसच्या प्रयोगांची दिंडी पुढे घेऊन निघाला.

### वावटळ आली–वावटळ गेली ....

कार्ल ड्रॅबलने एक पिरॅमिड बांधला. त्या पिरॅमिडच्या आतील व्यासपीठावर आपण वापरत असलेले दाढीचे ब्लेड ठेवावयास त्याने सुरुवात केली. त्याला आढळून आले की असे पिरॅमिडच्या आत ठेवलेले दाढीचे ब्लेड अनेकवेळा वापरता येते. त्याची धार अधिक काळ शाबूत राहते. आपल्या प्रयोगाचे व्यापारी महत्त्व जाणून त्याचे व्यापारी हक्क (Patent) मिळविण्यासाठी १९५९ साली झेक सरकारकडे त्याने मागणी केली. त्याची ती मागणी मंजूरही झाली. त्याने आपल्या यंत्राचे नाव ठेवले होते: 'ब्लेडचे आयुष्य वाढविणारा पिरॅमिड' (Cheopas Pyramid Razor Bladc Sharpuer).

या व अशा स्वरूपाचे किस्से सांगणारे त्या दोन फ्रेंच लेखकांचे



पिरॅमिडच्या आकाराची शहरे ! साऱ्या प्रश्नांवर एकमेव उपाय !!

पुस्तक प्रसिद्ध झाले मात्र आणि मग एकच धमाल उडाली. अनेक व्यापारी कंपन्या आणि अनेक प्रयोगवीर पुढे आले. या पिरॅमिडवर विविध प्रकारचे मजेशीर प्रयोग या प्रयोगवीरांनी केले. या पिरॅमिडच्या आतील व्यासपीठावर झोपले तर फार शांत झोप लागते. अशी काही जणांनी नोंद केली. काहींचा निद्रानाश या खोलीत आल्यावर पळाला. या उलट कुंभकर्णासारखे झोपणारे या पिरॅमिडमध्ये ठरल्यावेळी जागे झाले. या पिरॅमिडमध्ये झोपल्यावर दुसरे दिवशी खूप उत्साहाने काम होते, असे काहीनी नोंदवले. काहींनी प्यावयाचे पाणी या पिरॅमिडमध्ये ठेवले. त्यांना त्या पाण्याची चव अमृतमय लागली. उत्साह वगैरे वाढलाच. घरी रेफ्रिजेटरमध्ये पदार्थ ठेवण्यापेक्षा पिरॅमिडमधील व्यासपीठावर ते अधिक चांगले टिकतात आणि चवदार लागतात, अशीही नोंद झाली. एकदोघांनी तर सांगितले, या व्यासपीठावर एक दिवस ठेवून दुसरे दिवशी प्रेमपत्र प्रेयसीला दिले आणि तिने चक्क लगेच होकार दिला !

मागणी तसा पुरवठा या न्यायाने पिरॅमिडचे तयार आकार पुरविणाऱ्या कंपन्या निघाल्या. तुम्ही एकच करायचे. दुकानात जावयाचे, पाहिजे त्या आकाराचा कार्डबोर्ड वा प्लॅस्टिकचा पिरॅमिड घ्यावयाचा. घरी येऊन त्या पिरॅमिडमधील व्यासपीठावर आपले प्रयोग करावयाचे. बघता बघता पिरॅमिडचे प्रयोग करणाऱ्या प्रयोगवीरांचा एक पंथच निर्माण होऊ लागला. पराचा कावळा आणि कावळ्याचे वादळात रूपांतर होणार असे वाटले. काही जण आणखी पुढे गेले. त्यांनी सांगितले, नवी शहरे आणि त्यातील घरे पिरॅमिडच्या आकाराची व उत्तर-दक्षिण ध्रुवाला समरेषेत बांधा. आणि त्यात तिसरा हिस्सा उंचीवर असलेल्या व्यासपीठावर माणसाची राहावयाची सोय करा. त्या माणसाला मानसिक स्वास्थ्य धिक मिळेल. इतकेच काय, त्या शहरांचे वीज, गॅस वगैरे शक्तीचे प्रश्नही या पिरॅमिडमधील शक्तीचा वापर झाल्याने आपोआप सुटतील ! या अशा शहरांची रचना दाखविणारी चित्रे पण प्रसिद्ध झाली.

आणि व्हायचे तेच झाले. 'अती झाले अन् हसू झाले' असे या प्रयोगांचे झाले. खरे पाहता सगळा घोटाळा व्यापारी कंपन्यांनी केला. तयार पिरॅमिड घेऊन या कंपन्या घाईघाईने बाजारात आल्या. या प्रयोगामागील जिज्ञासूंची वैज्ञानिक भूमिका संपून जाहिरातबाजी सुरू झाली. आपल्याकडे औषधी कंपन्या आमची टूथपेस्ट वापरल्याने दात मोत्यासारखे होतात, आमचे क्रिम वापरल्याने तुम्ही हेमामालिनीसारखे दिसता, या गोळ्या घेतल्याने तुम्हाला दारासिंगची ताकद येते म्हणून सांगतात ना अगदी तसेच झाले ! थोडक्यात, 'दमडीच्या कोंबडीला रुपयाचा मसाला' अशी आफत आली ! परिणामी लाट जेवढ्या जोरात आली तेवढ्याच जोरात परतूही लागली. लोकांची थोडी करमणूक झाली आणि लोक पिरॅमिडची शक्ती विसरूही लागले.

### पिरॅमिडच्या शक्तीचे तिसरे पर्व....

आणि ही लाट अशी झपाट्याने ओसरत असतानाच पिरॅमिडच्या आतल्या शक्तीचे तिसरे पर्व सुरू झाले. जी. पॅट्रिक फ्लॅनगन (G. Patrick Flanagan) हा ३१ वर्षांचा एक उमदा शास्त्रज्ञ शास्त्रीय भाषेत पिरॅमिडचे सामर्थ्य सांगत रिंगणात उतरला. डॉ. फ्लॅनगन हा तसा एक दादा आदमी आहे. वयाच्या अकराव्या वर्षी डॉ. फ्लॅनगनने काही नवी वैज्ञानिक प्रमेये मांडली. अमेरिकेतील प्रमुख प्रख्यात शास्त्रज्ञांची यादी दर वर्षी प्रसिद्ध होत असते. वयाच्या चवदाव्या वर्षी फ्लॅनगनचा या यादीत समावेश झाला. वयाच्या पंधराव्या वर्षी बहिऱ्या लोकांना सुलभपणे स्पष्ट ऐकू येईल असे एक उपकरण बनवून फ्लॅनगनने त्याचा अमाप खर्च करून दाखविला.—सांगण्याचा मुद्दा इतकाच की फ्लॅनगन काही बोलला तरी आपण त्याला लगेच अलपटात काढू शकत नाही. त्याच्यावर थोडा विचार करावाच लागतो.

डॉ. फ्लॅनगनच्या मते 'सूक्ष्म लहरी' ही पिरॅमिडच्या शक्तीची गुरुकिल्ली आहे. या 'सूक्ष्म लहरी' विद्युतचुंबकीय शक्तींच्या वा लहरींच्या स्वरूपात अस्तित्वात असतात. पिरॅमिडच्या आकारामुळे या लहरींचे कंपन व संकलन फार चांगल्या प्रकारे होते.

[ Key to pyramid power lies in microwaves. Microwaves are a form of electromagnetic radiation of very short wave lengths. Electromagnetic radiation consists of waves of magnetic and electrical energy which results from the acceleration of electrical charges. Pyramid shape is an efficient resonator of microwave signals. ]

डॉ फ्लॅनगन पुढे म्हणतो, अमेरिकेच्या अंतराळ संशोधन विभागाने या पिरॅमिडसच्या उपयोगाबाबत काही महत्त्वाचे संशोधन केलेले आहे. त्याचे सर्व हक्क (Patents) आज अंतराळ संशोधन विभागाकडे आहेत. त्यापैकी एका शोधात, विश्वात अनेक ठिकाणी विखुरलेल्या सूक्ष्म लहरींचे एकत्रीकरण करून त्यापासून विद्युतशक्ती मोठ्या प्रमाणात निर्माण करण्याच्या शक्यतेबाबत चर्चा आहे. या शोधात पुढे असाही दावा केलेला आहे की, आजच्या अनेक अद्ययावत उपकरणांपेक्षा ही पद्धत अधिक कार्यक्षम ठरेल.

[ One Patent discussess in detail the possibility of *using the pyramid or cone shape to convert randomly* polerized microwave signals in the universe into electrical power. It is claimed that this device will be far more effective than photocells for efficient energy conversion. ]

पुढे एका ठिकाणी डॉ. फ्लॅनगन म्हणतो, काही संशोधकांनी या सूक्ष्म लहरींचा उपयोग इतर लहरींचे गुणधर्म बदलण्यासाठी, विशेषतः त्या लहरींची उंची दुप्पट वा तिप्पट करण्यासाठी केलेला आहे. आता पिरॅमिडमध्ये सूक्ष्म लहरी मोठ्या स्वरूपात केंद्रित झालेल्या असल्याने ज्यावेळी इतर लहरी पिरॅमिडमध्ये जातील, त्यावेळी त्यांचे गुणधर्म बदलतात.

[ Some researchers have used low density microwaves to increase alpha rhythm output and this coincides with the results of alphe rhythms being doubled or tripled in amplitude when the subjects were placed inside the pyramid. ]

डॉ. फ्लॅनगनने पिरॅमिडची ही कल्पना आणखी थोडी पुढे नेली आहे. तो म्हणतो, पिरॅमिडच्या ऐवजी वासुदेवाच्या टोपीच्या आकाराचा एखादा शंकू (Cone) आपण वापरला तर हे सारे काम अधिक प्रभावीपणे होईल. कारण अखेर शंकू म्हणजे ज्याला अगणित बाजू आहेत असा पिरॅमिडच.

## डॉ. फ्लॅनगन आणि सत्य साईबाबा....

–डॉ फ्लॅनगनचे हे सारे म्हणणे समजावून घेत असतानाच आपण आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कदाचित काही वेगळे घडते आहे. हे असे घडते आहे असे फ्लॅनगनला जाणवते आहे वा भासते आहे. तो त्याचे शास्त्रीय स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतो आहे. चाचपडत अडखळत प्रयत्न करतो आहे. आपल्याकडे सत्यसाईबाबांनी हातातून घड्याळे काढण्यापेक्षा हा प्रकार वेगळा व हितकारक आहे. खरे पाहता शून्यातून काही निर्माण करणे म्हणजे आतापर्यंतच्या ज्ञात विज्ञानातील सारे नियम झुगारून देणे. पण तरीही आपण ते स्वीकारतो. प्रो. गोकाक व डॉ. भगवंतम यांच्यासारखी थोर माणसे सत्यसाईबाबा करतात ते सारे अंधळेपणाने स्वीकारतात ! त्याचे स्पष्टीकरण देण्याचा वा मागण्याचा प्रयत्न करीत नाहीत. विज्ञानाच्या दृष्टीने नेमकी ही गोष्ट निषेधार्ह ठरते. थोडक्यात ती बुवाबाजी होते. जे घडते आहे ते खरेच घडते आहे का हे तपासण्याचा व त्याचे आजवरच्या ज्ञात व अज्ञात असलेल्या ज्ञानाच्या संदर्भात स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्नही होऊ दिला जात नाही. असा प्रयत्न करू पाहणाऱ्यांचीच गळचेपी होते.

या उलट डॉ. फ्लॅनगन म्हणतो, असेल बुवा, कदाचित प्रयोग करताना माझी काही गफलत होत असेल कदाचित. मी चकव्यात सापडलो असून तुम्हीहि प्रयोग करून पाहा. मी प्रयोग करताना येऊन माझे प्रयोग तपासा. 'सायन्स डायजेस्ट' हे अमेरिकेतील विज्ञान सोप्या व रंजक भाषेत समजावून सांगणारे एक मासिक. त्याचे सहसंपादक डॉ. मारव्हिन ग्रॉसविर्थ (Marvin Grosswirth) हे या संदर्भात फ्लॅनगनला भेटावयास गेले होते. फ्लॅनगन त्यांना म्हणाला, तुमचे प्रयोग तुम्हीच करून पाहा. अमेरिकेत आज पाहिजे तेवढे पिरॅमिड विकत मिळतात. पण आपल्या प्रयोगासाठी लागणारा हा पिरॅमिड पण डॉ. मारव्हिन यांनी स्वत.च बनविला. हा पिरॅमिड बनविणे तसे सोपे असते. तुम्हाला प्रयोग करावयाचे असतील तर तो तुम्हीही बनवू शकाल. तो कसा बनवावा याची माहिती सोबतच्या चौकटीत दिली आहे.

## जिज्ञासूंचे प्रयोग....!

या अशा प्रकारे बनविलेल्या आपल्या पिरॅमिडमधे डॉ. मारव्हिन यांनी काही प्रयोग केले. त्यांचे सारेच प्रयोग तसे सोपे आहेत. पहिल्या प्रयोगात त्यांनी एक सोललेले केळे घेतले. त्या केळ्याचे त्यांनी तीन भाग केले. त्यातील एक भाग बशीत ठेवून ती उघडी बशी रेफ्रिजरेटरमधे ठेवली. दुसरा भाग आपल्या पिरॅमिडमधील व्यासपीठावर ठेवला. तिसरा भाग पिरॅमिडपासून दोन फूट अंतरावर एका प्लॅस्टिकच्या डब्यात ठेवला. त्या डबीवर झाकण ठेवले. पिरॅमिड व प्लॅस्टिकची डबी अर्थातच हवाबंद नव्हती. म्हणजे त्यांना असलेल्या फटीतून हवा सहजपणे आत–बाहेर जात होती. असेच दहा दिवस गेले. दहा दिवसानंतर रेफ्रिजरेटरमधील केळ्याच्या तुकड्याचे वजन ५५ ग्रॅमवरून ४० ग्रॅमपर्यंत उतरले होते. म्हणजे त्याचे वजन

### तुम्हाला पिरॅमिड बांधायचाय ?

पिरॅमिडचे प्रयोग करण्यासाठी तुम्हाला स्वत:चाच पिरॅमिड उभारायचाय ?–रचना तशी सोपी आहे. एक जाड पुठ्ठा घ्या. त्याच्यावर नऊ पूर्णांक सात अष्टमांश इंचाचा पाया असलेला व बाकीच्या दोन बाजू आठ पूर्णांक सात अष्टमांश इंच असलेला एक समद्विभूज त्रिकोण काढा. या आकाराचे एकूण चार त्रिकोण बनवा. हे चार त्रिकोण चिकटपट्टीने अशा प्रकारे चिकटवा की त्यातून पिरॅमिडचा आकार तयार होईल. हा पिरॅमिड दुसऱ्या एका पुठ्ठ्यावर ठेवा. पिरॅमिडच्या पायाभोवती रेघा मारा. थोडक्यात दुसऱ्या पुठ्यावर एक चौरस तयार होईल. हा चौरस तुम्ही कापून काढलात की तुम्हाला पिरॅमिडचा पाया मिळेल.

या चौरसावर मध्यबिंदूतून अशा दोन रेघा आखा की, त्या चौरसाचे त्यामुळे चार सारखे भाग होतील. त्यानंतर पुठ्ठ्याचा एक दोन इंच उंचीचा छोटा डबा बनवा. म्हणजे हा डबा पिरॅमिडच्या उंचीच्या बरोबर तिसरा हिस्सा उंचीचा असेल. या डब्यावरच तुम्ही ज्याच्यावर प्रयोग करणार आहात ती ब्लेडस, केळ्याचा तुकडा, प्यावयाचे पाणी वा मेलेले कीटक तुम्ही ठेवणार आहात. म्हणजे हे झाले तुमच्या प्रयोगाचे व्यासपीठ. तुमचा पिरॅमिड ठेवण्यासाठी रेडिओ, टेलिव्हिजन, विद्युतउपकरणे यापासून लांब आणि खिडकीपासून दूर अशी एखादी जागा निवडा.

चुंबकाचा वापर करून चुंबकीय उत्तर–दक्षिण ध्रुव शोधा आणि तुमच्या पिरॅमिडचा पाया तेथे अशा प्रकारे ठेवा की, तुम्ही या पायावर आखलेल्या दोन रेघांपैकी एक रेघ नेमकी उत्तर–दक्षिण ध्रुवावर असेल. त्यानंतर तुम्ही ज्याच्यावर प्रयोग करणार आहात तो डबा या चौरसावर ठेवा. तुमचा हा डबा जर आयताकृती असेल तर तो पण पायावर अशा प्रकारे ठेवा की त्याची लांब बाजू ही उत्तर–दक्षिण ध्रुवाच्या समरेषेत असेल. डब्याचा मध्यबिंदू आणि चौरसाचा मध्यबिंदू एकमेकावर आहेत याचीही काळजी घ्या. त्यानंतर पिरॅमिड पायावर ठेवून टाका.

प्रयोगाला सुरुवात करण्यापूर्वी पिरॅमिड उचलून तुम्ही व्यासपीठावर तुम्हाला प्रयोग करावयाचा असलेली वस्तू ठेवून पुन्हा पिरॅमिड पायावर ठेवून द्या. तुम्ही व्यासपीठावर ठेवलेल्या वस्तूची लांब बाजू पण शक्यतो उत्तर–दक्षिण चुंबकीय ध्रुवाच्या रेषेत असावी. तुम्ही ब्लेड वापरून प्रयोग करणार असाल तर क्रोमियम वा प्लॅटिनम लावलेल्या ब्लेडपेक्षा साधी ब्लेडस अधिक चांगली सेवा देतात, हे लक्षात ठेवा... तुमचे प्रयोग आता सुरू झाले आहेत ! ❋

७·७ टक्क्यानी कमी झाले होते. त्याचा रंग बदलला नव्हता पण त्याची चव नाहीशी झाली होती. प्लॅस्टिकच्या डब्यात ठेवलेल्या तुकड्याचे वजन ४५ ग्रॅमवरून ३८ ग्रॅमवर घसरले होते. म्हणजे ते १५·६ टक्क्यांनी कमी झाले होते. कपाच्या तळाशी चिकट द्रव पसरला होता. मुख्य म्हणजे त्या केळ्याच्या तुकड्यावर आत व बाहेरून काळी बुरशी आली होती थोडक्यात, तो तुकडा सडला होता. त्याची चव घेण्याचा काही प्रश्नच नव्हता. या पिरॅमिडमधे ठेवलेल्या केळ्याच्या तुकड्याचे वजन ६० ग्रॅमवरून ५० ग्रॅम इतके कमी झाले होते. म्हणजे ते वजन १३·७ टक्क्यांनी घसरले होते. पिरॅमिडच्या आत व्यासपीठावर वा इतरत्र कोणताही चिकट द्रव जमला नव्हता. केळ्यावर थोडीशी बुरशी जमल्यासारखी वाटत होती. पण ती बुरशी हळुवारपणे हाताने दूर केल्यावर आत पिचळाधमक केळ्याचा तुकडा होता. महत्त्वाचे म्हणजे तो केळ्याचा तुकडा इतर तुकड्यांपेक्षा अधिक चवदार होता.

डॉ. मारव्हिन यांनी आपला दुसरा प्रयोग कॉफीवर केला. त्यांनी कॉफीच्या काही बिया घेतल्या. त्या बियांपासून कॉफीची पूड बन-

## आणखी एक विलक्षण प्रयोग

प्लँचेट, मृतात्म्यांशी बातचित, इतकेच कशाला अगदी पुनर्जन्म या विज्ञानाच्या दृष्टीने तशा मध्ययुगातील गावगप्पा आहेत. अशावेळी माणसाचा आत्मा अस्तित्वात असतो आणि त्याच्याशी संबंध साधणे शक्य असते असे मत खुद्द 'थॉमस अल्वा एडिसन' यांनी मांडलाय असे तुम्हाला कोणी सांगितले तर ते खरे वाटेल का? पण असं घडलंय. डॉ. गॅरिसन यांनी १५ जून १९७६ च्या 'नॅशनल इनक्वायरर' या मासिकात एक लेख लिहिलाय. त्या लेखात ते म्हणतात, 'एडिसन म्हणजे विज्ञानक्षेत्रातला हिमालय. या महापुरुषाने 'जादु ई दुनिया' वाटावी अशी शेकडो वैज्ञानिक उपकरणे तयार केली. खऱ्या अर्थाने एडिसनने मध्ययुगाचे विज्ञानयुगात रूपांतर केले. त्या एडिसनने १९२० साली एका तोलामोलाच्या शास्त्रीय मासिकाला मुलाखत दिली. त्या मुलाखतीत त्याने सांगितले, 'माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या शरीरातील काही 'शक्ती-लहरी' अस्तित्वात असतात आणि त्यांच्याशी संपर्क सांधता येतो.' हा सिद्धान्त मला आता पटू लागला आहे. या कल्पनेवर मी चार वर्षे काम करतो आहे. आपल्या कोणत्याही प्रयोगाबाबत तो संपूर्णपणे यशस्वी होऊन त्याचे व्यापारी हक्क (Patent) आपल्या नावावर जमा होईपर्यंत एडिसन फार मोठी गुप्तता राखत असे. ही कदाचित अशी पहिलीच वेळ असेल की, ज्यावेळी एडिसन प्रथम काही मोघम तरी बोलला. एडिसनने अर्थातच जादा काही माहिती दिली नाही. पण अतिशय सूक्ष्म आणि क्षीण लहरी पकडू शकतील अशा एखाद्या शक्तिशाली उपकरणाबाबत तो त्यावेळी बोलत असावा. एक मात्र खरे, एडिसनच्या मृत्यूनंतर त्याच्या या प्रयोगाबाबत काहीच माहिती मिळू शकली नाही. त्याने आपले हे उपकरण कधी वापरले होते का, याचीही काही माहिती मिळाली नाही. *

## पदार्थविज्ञान आणि आपले धर्मग्रंथ. . . .

प्राचीन भारतीयांना आधुनिक पदार्थविज्ञानातील सारे काही माहीत होते. विश्वाची आणि अणूची रचना त्यांना पूर्णपणे समजली होती हे सारे कोणत्या तत्त्वाने होते, ते विश्वातील मूळ तत्त्व त्यांनी जाणले होते. काही पाश्चात्य शास्त्रज्ञांना असे वाटते. कॅलिफोर्निया विद्यापीठातील लारेन्स बर्कले प्रयोगशाळेतील प्रोफेसर एफ. कॅपरा यांनी 'न्यू सोसायटीच्या' २० नोव्हेंबर १९७५ च्या अंकात याबाबत एक महत्त्वाचा लेख लिहिलाय. आपल्या लेखात ते म्हणतात—

'आधुनिक पदार्थविज्ञानातील प्रमुख तत्त्वांचा नीटपणे अभ्यास केल्यावर मला असे वाटू लागले आहे की, ही तत्त्वे आणि हिंदू आणि बौद्ध धर्मांच्या प्राचीन धर्मग्रंथात सांगितलेले विचार अखेर एकच आहेत. त्या धर्मग्रंथांनी सांगितलेले मूलभूत सिद्धान्त, गूढ विचार, ते विचार मांडण्याची त्यांची पद्धती अर्थातच वेगळी आहे. एक मात्र खरे, विज्ञानक्षेत्रात एखादा नवा विचार मांडताना जी मेहनत व जो काटेकोरपणा संशोधकाकडे लागतो तोच काटेकोरपणा व तीच मेहनत हे विचार मांडणाऱ्या अभ्यासकांपाशी होती. हे विचार मांडणाऱ्या प्राचीन अभ्यासकांनी केलेली मेहनत आणि त्यांची 'वैज्ञानिक विचार पद्धती' यांचे पुरावे या ग्रंथात जागोजाग आढळतात.

'सर्वसामान्य माणसाला न दिसणाऱ्या, आकलन न होणाऱ्या गोष्टी समजावून घेण्यासाठी वैज्ञानिक काही उपकरणे वापरतो. त्या प्राचीन प्रयोगवीरांनी (वा ऋषींनी) पण स्वतःच्या अवलोकनाच्या काही पद्धती आणि आत्मिक शक्तीचा नियंत्रित वापर या गोष्टी आपल्या संशोधनासाठी वापरल्या होत्या. हे सारे सांगितल्यावर काही लोक एक प्रश्न विचारतात—पदार्थविज्ञानक्षेत्रात आपण संशोधनावर अमाप खर्च करतो आहोत. प्राचीन भारतीयांना जे ज्ञात होते ते पुन्हा शोधून काढण्यासाठी आपण एवढा खर्च करावा का? हा प्रश्न माझ्या मते अर्थातच अप्रस्तुत आहे. वर्तुळाच्या एकाच केन्द्राकडे निघालेले हे दोन मार्ग भिन्न आहेत. हे दोन वेगळे प्रांत आहेत. या दोन मार्गांचे सहकार्य वा भांडण संभवत नाही. त्या दोघांना एकमेकांची जरूरी नाही, पण मानवाला मात्र या दोन्ही मार्गांची जरूरी आहे. आपल्या समोरील अथांग विश्वाचे कोडे समजावून घ्यावयास आपण या दोन्ही मार्गांची मदत घेतली पाहिजे!' *

विली. आणि कॉफीच्या भुकटीपासून प्रत्येकी ३५ ग्रॅम वजनाच्या दोन पुडचा बांधल्या. एक पुडी २४ तास पिरॅमिडमधे व्यासपीठावर ठेवली. दुसरी पुडी पिरॅमिडबाहेर ठेवली. आपल्याच घरी त्यांनी वेगवेगळचा वेळी नेहमीच्या पद्धतीने या दोन पुडचांतील भुकटीची कॉफी बनवली. घरच्या माणसांना यातील काही माहीत नव्हते—पण पुन्हा तेच. प्रत्येक वेळी पिरॅमिडमधे ठेवलेल्या भुकटीपासून बनविलेली कॉफी अधिक चवदार व कमी कडवट आहे असा जवळजवळ एकमुखी निर्णय झाला. असाच प्रयोग त्यांनी सिगारेटवर केला. तो प्रयोग पण थोडचा फार प्रमाणात यशस्वी झाला. आपल्या हातात एखादा लंबक घेऊन तो पिरॅमिडच्यावर वा पिरॅमिडच्या आत त्या व्यासपीठाच्या पातळीवर धरला तर तो आपोआप हालतो असेही डॉ. मारव्हिन यांना वाटले. डॉ. मारव्हिन यांनी केलेला आणखी एक मजेशीर प्रयोग म्हणजे त्यांनी पाण्याची बाटली २४ तास पिरॅमिडव्यासपीठावर ठेवली. दुसऱ्या दिवशी प्यावयास फक्त तेच पाणी वापरले. एक आठवडा हा असा क्रम चालू ठेवला. आणि काय आश्चर्य, त्या सबंध आठवडचात आपण अधिक उत्साही आहोत, कमी दमतो आहोत, काही अधिक सृजनशील गोष्टी करतो आहोत, असे डॉ. ग्रासविर्थ यांना वाटले.

## तात्पर्याची गोष्ट...

या प्रयोगापेक्षा आपल्या या प्रयोगापासून डॉ. मारव्हिन यांनी काढलेले निष्कर्ष अधिक महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, 'मी केलेले हे सारेच प्रयोग तसे गंमत म्हणून घाईगर्दीने केलेले आहेत. शास्त्रीय भाषेत बोलावयाचे तर माझे हे प्रयोग तसे गोलमाल आहेत. त्यातूनही पुन्हा मला आलेल्या अनुमानाचेही नीट पृथक्करण केलेले नाही. म्हणजे असे—. मी लंबक पिरॅमिडमधे धरल्यावर तो आपोआप हलू लागला. शक्यता आहे, मला नकळत माझा हात प्रथम थोडा हलला असेल. किंवा माझ्या सुप्त मनाला आपण तो लंबक हलवावा असे वाटले असेल. प्लँचेटच्या वेळी धरलेला हातही अनेकदा असाच आपोआप हलत असतो. पिरॅमिडमधील पाणी घेतल्यावर माझा आठवडा अधिक उत्साहात गेला. कोणी सांगावे, त्या आठवडचात माझ्या बायकोने कदाचित अजीबात चिडचिड केली नसेल. त्या आठवडचात माझी पाळण्यातील मुलगी रात्रभर निवांतपणे झोपत होती म्हणून माझी अजीबात झोपमोड झाली नसेल. हे सारे शक्य आहे. हे सारे मला मान्य आहे. पण तरीही माझ्या या प्राथमिक प्रयोगांनीही मला घोटाळचात टाकले आहे. काहीतरी मुलखावेगळचा गोष्टी अधीमधी या पिरॅमिडमध्ये घडतात असे मलाही आता वाटू लागले आहे. त्याचे स्पष्टीकरण, शास्त्रीय स्पष्टीकरण आपण मिळवले पाहिजे.

(It would appear, even on the basis of my own less–than-scientific, less-than-spectacular experiments, that something is certainly going on inside all those model pyramids.)

आणखी एक गोष्ट खरी आहे. शास्त्रीय जगात डॉ. फ्लॅनगन हा एकच नावाजलेला शास्त्रज्ञ काही शास्त्रीय प्रयोगांवर, शास्त्रीय भाषेत, पिरॅमिडसच्या अद्भुत शक्तीबद्दल बोलत आहे. डॉ. फ्लॅनगन याने वयाच्या पंधराव्या वर्षी बहिऱ्या लोकांना ऐकू येईल असे एक उपकरण बनवून अमाप पैसा मिळविला होता. आजही डॉ. फ्लॅनगनचे काही आर्थिक हितसंबंध या पिरॅमिडसच्या प्रयोगात गुंतले असावेत असे म्हणण्याइतका पुरावा उपलब्ध आहे. त्यामुळे डॉ. फ्लॅनगन काही हातचे राखूनही बोलत असेल आणि म्हणूनच आणखी काही शास्त्रज्ञांनी हे काम मनावर घेतले पाहिजे. खरे तर हे काम तरुणांचे आहे. आपले 'एम्. एस्सी.' वा 'पीएच. डी. चे संशोधन करावयास काही तरुणांनी पिरॅमिडचे हे गूढ निवडले पाहिजे. कारण अनुमान कोणतेही निघाले तरी विद्यार्थ्याला मिळणाऱ्या पदवीवर त्याचा परिणाम होत नसतो. नवे विचार ग्रहण करावयास वा त्याचे खंडन करावयास तरुण रक्त नेहमीच अधिक उपयोगी पडते. पदवीसाठी काम करताना शास्त्रीय काटेकोरपणा त्या तरुणांना संपूर्णपणे सांभाळावा लागतो—माझ्या व डॉ. फ्लॅनगन यांच्याही प्रयोगातून आजच्या घडीला याच्याहून कोणताही दुसरा निष्कर्ष मला काढता येत नाही. माझे मत एवढेच आहे की, काही तरुण संशोधकांनी संशोधनातील पदवी मिळविताना मन लावून प्रयोग करावेत, एवढचा योग्यतेचे हे पिरॅमिडस वाटतात. त्या तरुणांच्या या संशोधनाचे पुढे काय होईल हे अर्थातच सांगता येत नाही. त्यांच्या या प्रयोगातून कदाचित काही मिळणारही नाही. त्यांच्या या संशोधनाच्याच 'ममी' बनवून नंतर कदाचित एखाद्या पिरॅमिडसमध्ये ठेवाव्या लागतील!

बस्स! पिरॅमिडचा आतला आवाज, डॉ. बोव्हिस, डॉ. कार्ल ड्रेबल, डॉ. फ्लॅनगन, पिरॅमिडची गूढ शक्ती .. या सर्वांची कहाणी आजच्या घडीला ही एवढीच आहे. तसे पाहावयाचे तर शास्त्रीय जगात एखादी अगदी सोपी, साधी, क्षुल्लक पण प्रचलित ज्ञानाच्या विरुद्ध असलेली नवी गोष्ट स्वीकारताना केवढे उमदे पण तरीही काटेकोर आणि जागरूक मन ठेवावे लागते त्याची ही कहाणी! — पाऱ्याचे सोने, शून्यातून घडचाळ, व्हायकिंगपूर्वी मंगळावर पोचणे, पाण्यावरून चालणे या व अशा सनसनाटी प्रयोगांनी अर्ध्या हळकुंडाने पिवळे व्हावयास निघालेले आपल्याकडील उत्साही प्रयोगवीर मनात आणले तर या कहाणीपासून बरेच काही शिकू शकतील! □

### आणखी एक विचार

इंग्लंडमधील रॉयल कॉलेज ऑफ सर्जनच्या डॉ. आर. बेन्टाल यांनी 'न्यू सायन्टिस्ट' च्या २२ एप्रिल १९७६ च्या अंकात एक लेख लिहिलाय. त्यात त्यांनी म्हटलंय, विद्युतचुंबकीय शक्तींचा मानवी शरीरावर व मनावर होणारा परिणाम हा तसा अजूनही अनाकलनीय असा प्रकार आहे. आजवरच्या प्रयोगांतून मिळालेली अनुमाने तशीं घोटाळचात टाकणारी आहेत. त्यात त्यांनी स्वत: केलेले काही प्रयोग दिलेले आहेत. त्यांच्या प्रयोगाप्रमाणे विद्युतचुंबकीय लहरींचा रोग्यांच्यावर इष्ट तो परिणाम झाला. त्यांच्या वेदना कमी झाल्या. विशेषत: शस्त्रक्रियेनंतर रोग्याच्या वेदना झपाटचाने कमी करावयास व त्याची जखम झपाटचाने भरून येण्यास या लहरींनी मदत केली. त्यांच्या मते विज्ञानाच्या निरनिराळचा क्षेत्रांतील लोकांनी या स्वरूपाचे प्रयोग करून पाहिले पाहिजेत. 'विद्युतचुंबकीय लहरींचा औषधोपचार' असा एखादा नवा पंथ त्यातून निर्माण होऊ शकेल. *

हिंदी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

## तीन तासांत तीन दिलीपकुमार

# बैराग

कथा एस. खलिल यांच्या नावे मांडली असली आणि संवादाचं श्रेय तर अब्रार अलवी आणि डॉ. राही मासूम रझा असे दोन नामी मोहरे खर्ची घालून दिलं–दाखवलं असलं, तरी (निर्माते मुशीर–रियाझ आणि तथाकथित दिग्दर्शक आसित सेन यांच्यासकट) सर्वांना ठाऊक आहे की, बैराग हा चित्रपट फक्त आणि सबकुछ दिलीपकुमारचा आहे.

सगळ्यांना हेही ठाऊक आहे की, बैराग त्याच्या योग्य वेळेपेक्षा थोडाथोडका नव्हे तर तब्बल तीन वर्षं उशिरा प्रदर्शित झाला आहे, आणि हा उशीर केवळ दिलीपच्या हट्टापायी झाला आहे. त्यानंच हस्तक्षेप करून चित्रपटात हवे ते व हवे तसे फेरफार करून घेतले.

सगळ्यांना हेही ठाऊक आहे की, दिलीपनं या चित्रात एक–दोन नव्हे तर चक्क तीन भूमिका पार पाडल्या आहेत. म्हणजेच चित्रपटाच्या जवळजवळ प्रत्येक 'फ्रेम'मध्ये दिलीपच दिलीप भरून राहावा, अशी कडेकोट खबरदारी घेतलेली आहे.

अर्थात दिलीपची ही 'ग्रँड ट्रिपल' भलतीच देखणी झाली आहे. पण ती वगळता बैराग हा निव्वळ वैतागच आहे. चित्राला आहे थोडीफार तीही कथा केविलवाणी प्लस हास्यास्पद झाली आहे. दोन जुळे भाऊ, नियमानुसार जन्मत:च ताटातूट, एक शहरी उस्ताद तर दुसरा गंवार बम्भोले बनून जाणं, आणि यथावकाश दोघांची भेट, खलनायकाचा संयुक्तरीत्या केलेला पाडाव आणि उभयतांचं आंधळा बाप व (आपापल्या) नायिका यांच्याशी पुनर्मीलन असा हा राजमार्गावरून जाणारा मामला. मग थोडंफार वेगळेपण दाखविण्यासाठी आणि मुख्यत: नाट्यनिर्मितीसाठी, बाप आंधळा दाखवलाय, आणि जन्मांध असलेल्या एका मुलाला अंधळेपणाच्या यातनातून वाचवण्यासाठी mercy death देण्याचा प्रयत्न तो करतो, पण तो मुलगा वाचतो आणि एका खेड्यात वाढतो, अशी addition केलीय्. हे एक वेळ ठीक. पण पुढे त्या मुलाला (भोलेनाथ) साप चावून (की शंकराच्या कृपाप्रसादानं वगैरे) दृष्टी येते, हा त्या नाट्याचा शेवट डोकं फिरवणारा आहे. *संजय व भोलेनाथ* आणि या दोघांचे पिताजी कैलासनाथ मायुर या तीन भूमिका करणाऱ्या दिलीपकुमारांच्या जोडीला दोन नायिकाही (तारा–सायराबानू व सोनिया–लीना चंदावरकर) अधनंमधनं पडद्यावर दिसतात. शिवाय प्रेम चोप्रा, हेलन, मदनपुरी वगैरे दोन नंबरची गँग आहेच. सायरा व लीना दोघींच्याही वाट्याला दुय्यम महत्त्वाच्या, जवळजवळ नगण्य भूमिका पाहिल्या आहेत. त्या यथाशक्ती निभावण्याचं आणि गोड वगैरे दिसण्याचं कर्तव्य त्यांनी निष्ठेनं पार पाडलं आहे. कल्याणजी–आनंदजींचं संगीत–पार्श्वसंगीत मात्र फार दिवसांनी उल्लेखनीय आहे. अर्थात ही गाणी तशी जुनी आहेत, दोन वर्षांपासून गाजताहेत. चित्राची इतर सर्व अंगं ठीक आहेत, एवढंच.

तीन वेगळ्या भूमिकांत दिलीपचा अभिनय पाहणं हा या बैरागमधला एकमेव इंटरेस्ट आणि रिलीफही आहे. मुळात, संपूर्ण चित्रपटभर ज्यांचा अभिनय भरून उरावा अशा ताकदीचे अभिनेते आता दुर्मिळ होत चालले आहेत. दिलीपनं बैरागमध्ये खाल्लंय तेवढं 'फूटेज्' खाणारे स्टार्स कितीतरी आहेत, पण दिलीपनं त्या भूमिका ज्या ढंगानं रंगवल्या आहेत, त्याला जोड मिळणं डबलरोल आणि मल्टिस्टार्सच्या रणधुमाळीतही मुष्किल. बैराग हा काही त्याच्या उमेदीच्या *काळातला* चित्रपट नव्हे, पण त्याच्या त्या गाजलेल्या अभिनयसामर्थ्याची याद, या इतक्या ताकदीची अदकारी त्यातल्या दीड आंधळ्यांच्या भूमिकेचा त्यानं सांभाळलेला खानदानी आब, आणि त्यासाठी वापरलेली संयमित संवादफेक व Subdued पण वजनदार कायिक अभिनय् ही शस्त्रं अमोघ आहेत. भोलेनाथच्या भूमिकेतही तो आंधळा असेतोपर्यंत दिलीपनं जान आणली आहे. मध्यंतरानतर मात्र चित्रपट आणि दिलीपही, आधीचे भावनात्मक संघर्ष आणि मानसिक ताणतणाव सोडून अकारणच गुन्हेगारी वळ-

**पण सगळ्यांना ठाऊक नसेल की . . .**

पण सगळ्यांनाच हे ठाऊक नसेल, की बैरागची तब्बल सहा रिळं दिलीपनं पुनर्चित्रित करून घेतली. चित्रपट दोन-तीन वर्षं रेंगाळणं व पुनर्चित्रणाचा भुर्दंड याच्याखाली निर्माते मुशीर व रियाझ यांचा पार चुराडा झाला. त्यांना आपला कारखाना व एक बंगला विकावा लागला, अशीही वार्ता आहे.

*दिलीपच्या या अवाजवी हस्तक्षेपामुळं* संवादलेखक डॉ. रझा व दिग्दर्शक आसित सेन यांनी बैरागमधनं अंग काढून घेतलं होतं. त्यामुळे शेवटी, निर्मितीपासून थेट वितरणापर्यंत सर्वत्र दिलीपकुमारचंच राज्य होतं.

आणि यावर मुशीर-रियाजची प्रतिक्रिया ?

'बैराग हा चित्रपट निर्माण करून आम्ही मूर्खपणाचं अव्वल सर्टिफिकेट पदरात पाडून घेतलं.' अशी धाडशी आणि खळबळजनक कबुली त्यांनी पत्रकारांजवळ दिल्याचं कळतं. 'आमचा 'सफर' चित्रपट यशस्वी झाल्याच्या धुंदीत, अनेकांनी इशारे देऊनही आम्ही दिलीपच्या नादी लागलो, त्याचं पुरेपूर प्रायश्चित आम्हाला मिळालं. एका परीनं आमच्याच पायावर आम्ही धोंडा पाडून घेतला,' अशी त्यांची प्रतिक्रिया.

वैराग म्हणजे वैराग्य.

*या वैराग्यनिर्मितीचा पहिलाच फटका त्याच्या निर्मात्यांनाच बसावा ना ?* ✱

णावर गेला आहे. तो सगळा भाग आणि त्यातला त्याचा अभिनयही ठिगळ लावल्यासारखा वाटतो. दुसरा दोष त्याचा चेहरा मात्र चॉकलेटसतेज राहिलेला नाही. विशेषतः लीनाबरोबर त्याला (सोनिया–संजय) पाहणं जरा जडच जातं.

असो. पडद्यावर पैसे फेकून दिलीपच्या अदाकारीची दाद देणाऱ्या त्याच्या रसिक व जाणकार भगतणात माझा समावेश नसल्यानं, एक गोष्ट स्पष्टपणे सांगितलीच पाहिजे की, बैरागचा तिहेरी नायक म्हणून दिलीप लाजवाब असला तरी बैरागचा कथापटकथासंवादलेखकदिग्दर्शकसंकलक वगैरे सबकुछ म्हणून, तो ठार अपयशी आणि बेकार ठरला आहे, अगदी आपल्या सबकुछ मनोजकुमारजीपेक्षाही वाईटच ! □

# महाचोर

## नावातच सर्व काही

निर्माते दिग्दर्शक नरेन्द्र बेदी यांची 'महाचोर' ही साधी फिल्म नसून 'महाफिल्म' आहे, असा प्रचार जाहिरातीमध्ये केला जातो. यावरून फार तर नरेन्द्र बेदी आणि जाहिरातकर्ते यांना 'महा' या विशेषणाचा अर्थ कळत नसावा एवढंच सिद्ध करता येईल. सिनेमा पाहिल्यानंतर मात्र बेदीसाहेबांना उरलेल्या 'फिल्म'चा अर्थही कळला नसल्याचं लक्षात येतं. किंवा या फिल्ममुळे खिशात येणारा अर्थ त्यांना जास्त कळला असावा, अशीही शक्यता आहे. सुदैवानं प्रेक्षकांनी या चोराला फारसा थारा दिलेला नसल्याचेच रिपोर्टस् आहेत, यावरून आपले पिटातले प्रेक्षकही निदान सरदार नरेन्द्रसिग बेदीपेक्षा जास्त हुशार होऊ लागले की काय, अशी गोड शंकाही मला आली. आजपर्यंत महा, महान वगैरे विशेषणं एक तर महात्म्यांसाठी किंवा थेट महामूर्खांसाठी वापरली जात असत. नरेंद्रसिहजींनी हे विशेषण आता एका चोरालाही बहाल करून टाकलं आहे. हा 'जाता जाता दलितोद्धारा'चा प्रकार असावा. नाहीतरी अलीकडे चोर आणि चोरी या वस्तू हिंदी पडद्यावर बऱ्यापैकी सुप्रतिष्ठित होऊ पहात आहेत. व्हिक्टोरिया २०३ चे निर्माते ब्रिज यांनी तर धडधडीत 'चोरी मेरा काम' या नावाचाच एक सिनेमा काढून टाकला होता. अर्थात ते एकच सिनेमा नावं बदलून पुन्हापुन्हा काढतात असं एका फिल्मफौजदाराचं म्हणणं पडलं. त्यावरून 'चोरी मेरा काम' हे शीर्षक ब्रिज यांनी आत्मचरित्रात्मक म्हणून दिलं आहे, असा तर्क मी केला. नरेन्द्र बेदीजींच्या पूर्वचरित्राबद्दल अर्थातच मला काही माहीत नाही.

नरेन्द्र बेदींचा हा महाचोर म्हणजे अर्थातच आपला सुपरस्टार राजेश खन्ना होय. अर्थात महाचोर हे काही सुपरस्टारचं भाषांतर नव्हे. चित्रपटाचं नाव 'महा'चोर का ठेवलं असावं याचं कोडं, राजेश खन्ना हा साधासुधा स्टार नाही हे ध्यानात घेतलं की झटक्यात सुटतं. अर्थात प्रत्यक्ष सिनेमात हा महाचोर उच्चकोटीच्या संतसज्जनांसारखा वागतो. मधून मधून 'पोचलेल्या' स्मगलरला शोभेलशा सफाईनं चोऱ्या करतो. चोरीच्या पैशातून आपल्या गरीब वस्तीवाल्यांसाठी काहीबाही करतो. याखेरीज तो चार गाणी गातो आणि प्रेम चोप्रा व नीतू सिंग यांच्याबरोबर (अनुक्रमे) फायटिंग व एल ओ व्ही ई करून टाकतो. एका गाण्यात तुरुंगातल्या कैद्यांबरोबर मिटल्या डोळ्यांनाच सुखावेल असा किळसवाणा नाच करतो, आणि 'मेरा नाम यारों महाचोर है, महाचोर लेकिन कोई और है', अशी कबुली देतो. प्रेक्षकही तो 'कोई और' सिनेमा का पाहिला गेलो नाही म्हणून हळहळतात. हा सुपरचोर हिंदुमुसलमानातली जातीय दंगल केवळ एक गाणं गाऊन साफ मिटवतो–त्याचं नावच मुळी 'राजूखान' असं संकरित बियाण्यांच्या जातीला शोभणारं आहे. सिनेमाच्या उत्तरार्धात हा इसम रायगड नामे कोण्या एका संस्थानचा नकली राजपुत्र म्हणून जातो. हे मध्ययुगीन काळातलं संस्थान दाखवलं असलं तरी ते मुंबईतच कुठेतरी किंवा मुंबईपासून हाकेच्या अंतरावरच असतं. इथे सज्जनदुर्जनांचे दोन वेगळे 'कॅम्प्स्' तयार होऊन राजघराण्यालाच साजतील अशी जजबाती कारस्थानं, संघर्ष वगैरे होतात. शेवट कसा होतो आणि तसा का होतो ते बहुधा कुणालाच कळत नाही. पण तो गोडच गोड होणार हे महाचोरापासून महाप्रेक्षकांपर्यंत सर्वांनी गृहीतच धरलेलं असतं. वाहवा रे सुपरस्टार ! खरं तर ही महाफिल्म, त्यातला तो महातारा आणि त्याचे महानिर्माते या सर्वच महाचोरांची वाहवा करायला हवी.

अर्थात प्रेक्षकांना आपण महामूर्ख ठरल्यासारखं वाटलं तरी वाईट वाटून घेऊ नये. आफ्टर ऑल, 'महाचोर' या नावातच सगळ्या सिनेमाचं सर्व काही सार वगैरे आहे !

# गीत–मीलन

'प्रतिलता' म्हणून प्रसिद्ध झालेल्या उदयोन्मुख गायिका कु. चारुशीला बेलसरे यांचा 'गीत–मीलन' हा कार्यक्रम 'स्वरविलास' या संस्थेतर्फे नुकताच पुण्यात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात श्रीकृष्णचरित्रावरील गीतांचा समावेश होता, अर्थात राधाकृष्णमीलनाची भागी त्यात बरीच होती. ही गीतं सोलापूरचे एक नवोदित कवी श्री. रा. श्री. पंचवाघ यांनी रचलेली आहेत. विशेष म्हणजे या एकवीस पदांचं संगीतदिग्दर्शनही स्वतः चारुशीला बेलसरे यांनीच केलं होतं आणि सर्व गाणी त्यांनी स्वतःच गायलीही. अशाप्रकारचा हा त्यांचा पहिलाच प्रयत्न होता.

आपल्या या प्रयत्नात गायिकेला समाधानकारक दर्जा गाठता आलाय असं म्हणायला हरकत नाही. गीतरचनेची बाजू मात्र कमालीची कच्ची होती. विषय पारंपरिक तशीच सर्व गीतं अर्थानं आणि रचनेच्या दृष्टीनंही अतिशय मर्यादित चाकोरीतली होती. रचनेत नवखेपणा, वृत्तात्मक पुनरावृत्ती आणि भावाचा अभाव ठळकपणे जाणवले. या दोषांचा अडसर गायिकेलाही झाला असावा. गद्यनिवेदनाची बाजूही थोडी लंगडीच पडली. 'शैलीदार निवेदन' म्हणजे कृत्रिम निवेदन नव्हे.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

२०।११।७६ ते २६।११।७६

**मेष : प्रतिष्ठा उंचावेल**

दुसरा गुरू, चौथा शनी, आठवे रवी–मंगळ अशी ग्रहरचना आहे. सामान्यपणे मन उत्साही राहील. पण तब्येतीची काही ना काही कुरकुर चालूच राहील. थंडी, पडसे वगैरे काही तरी त्रास संभवतो.आर्थिक बाजू बरीच भक्कम होईल. रेसमध्ये पैसे मिळू शकतील. कर्जाचा डोंगर कमी होण्यासारखी चिन्हे दिसू लागतील. स्थावराची प्राप्ती होणार आहे. स्थावराचे वारसविषयक काम अवश्य होईल. विद्यार्थ्यांना वाहन मिळेल. तुमच्यापैकी वाहनखरेदीची ज्यांची योजना असेल त्यांना ते लाभेल. नोकरीची बाजू भक्कम राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. काही तरी मागणी मान्य होईल. नवे काम वरिष्ठांच्या योजनेनुसार करावे लागेल. शुभ दिनांक २०, २३.

महिलांना : आवडता दागिना घेऊ शकाल. माहेरचा पैसा मिळेल.

विद्यार्थ्यांना ; वाहनाची अडचण दूर होईल.

**वृषभ : स्त्रीकडून लाभ**

राशीत गुरू, तृतीयेत शनी, रवी-मंगळ सप्तमात अशी ग्रहांची स्थिती आहे. ही स्थिती कौटुंबिक व सांसारिक जीवनात थोडेफार असमाधान ठेवील. परंतु पतिपत्नींनी एकमेकांच्या भावना जाणून घेऊन वागल्यास मतभेद कटुतेपर्यंत रूप धारण करणार नाही. मुलगी पाहणे, लग्न ठरवणे अशा प्रकारची कामे मात्र यावेळी करू नयेत. व्यवसायात स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचा अथवा कौशल्याचा उपयोग करून घ्या. फायदा होईल. नवी योजना अंमलात आणू शकाल. भांडवल कमी पडणार नाही. नोकरीत तात्पुरते समाधान लाभेल. वरिष्ठांची मर्जी राहील. आर्थिक बाजू सुधारेल. शुभ दिनांक २१, २२.

महिलांना : स्वतःच्या धंद्यात लक्ष घाला. नोकरीत काळजी घ्यावी लागेल.

विद्यार्थ्यांना : शेती व कला यांचा अभ्यास करा.

**मिथुन : विरोधक नमतील**

अनेक प्रकारच्या त्रासानंतर ग्रहांची कृपादृष्टी आता तुमच्याकडे वळली आहे. अनेक दिवस रेंगाळत राहिलेली तुमची कामे यावेळी मार्गी लागून तुम्हाला अपेक्षित असलेला लाभ पदरात पडणार आहे. प्रामुख्याने जे सेवानिवृत्त होऊन पेन्शन वा ग्रॅच्युअटीची वाट पाहत आहेत, त्यांची कामे मार्गी लागणार आहेत. एरवी हा आठवडा अनुकूल आहे. आर्थिक बाजू काळजी करावी इतकी वाईट राहणार नाही. बेकारांना नोकरी वा धंद्यासाठी मदत मिळेल. नोकरीत प्रयत्न करावा. हेतुपूर्वक व मुद्दाम त्रास देणारे लोक यावेळी सहकार्यासाठी पुढे येतील. आरोग्य सुधारेल. शुभ दिनांक २२–२३.

महिलांना : संसारात यावेळी समाधानकारक घटना घडतील. पैसा मिळेल.

विद्यार्थ्यांना : लेखनात रस घ्याल. मन प्रसन्न राहील.

**कर्क : यशाची चढती कमान**

राशीत शनी आहे. ही जरी साडेसाती असली तरी कर्तृत्वाचा प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने हा शनी उत्तम आहे. व्यक्तिमत्त्व उंचावत आहे. पाचवे रवी-मंगळ कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध करून देणार आहे. अधिकार वाढणार आहेत. वरिष्ठांच्या मनातील गैरसमज दूर होऊन ते गुणांचे चीज करतील. व्यावसायिक परीक्षा द्यायला हा आठवडा उपकारक आहे. बरेच काही चांगले घडू शकेल. बढती–प्रमोशनचा योग आहे. नवा धंदा सुरू करू शकाल. चालू धंद्याला भागीदारीत जीवदान देऊ शकाल. मनातील निराशा झटकून टाका. प्रत्यक्षात तुम्ही सर्वच आघाडींवर यश मिळवणार आहात. शुभ दिनांक २४, २५.

महिलांना : गायिका व इतर कलावंतांना यश मिळणार आहे.

विद्यार्थ्यांना : अभ्यासाचे फलित हातात पडणार आहे.

**सिंह : मानसिक स्वास्थ्य**

शनीची साडेसाती आहे. पण त्याची उग्रता आता कमी होत आहे. तरी पण अजून धाडस करणे हितावह होणार नाही. प्रामुख्याने आर्थिक प्रश्नात व्यापारी लोकांनी फार मोठे वायदे करू नयेत. विक्रीचा व्यवहार फार जपून करावा. जमिनीचा प्रश्न नव्याने निर्माण होईल. वारसाहक्काने जमिनीचा प्रश्न सुटेल. चालू जमीन अगर घर कायद्याच्या प्रश्नात सापडेल. मानसिक स्थिती उत्तम राहील. विचार कमी करा. नोकरीत काळजी घेणे आवश्यक आहे. वरिष्ठांच्या कलाने वागा. काम जास्त पडेल तरी कुरकुर करू नका. सहकाऱ्यांचे काम करावे लागेल. प्रवासाचा बेत पुढे ढकलावा. वाहन खरेदीचा योग आहे. पण अडचणी येतील. शुभ दिनांक २४–२५.

महिलांना : आर्थिक बाजू सावरेल. नोकरीत वरचष्मा राहील.

विद्यार्थ्यांना : महत्त्वाचा विषय आत्मसात होईल.

**कन्या : कर्तृत्वाला संधी**

गुरुमहाराजांचे तुम्हाला हवे तेवढे पाठबळ नाही. परंतु पराक्रमात रवी-मंगळ आहेत. त्याची तुम्हाला भरपूर मदत आहे. यां वेळी अंतर्मनात योजनांचा भलताच झगडा सुरू होतो. म्हणूनच या संधीचा फायदा तुम्ही पुरेपूर उठवला तर तुमचा सगळ्या महत्त्वाकांक्षा सफल होऊन जातील. स्वतंत्र धंद्याची जी कल्पना तुमच्या मनात घर करून राहिली आहे. तिला मूर्त स्वरूप येण्यासारखी परिस्थिती यावेळी निश्चित होईल. राजकारणातील उच्चपदस्थ व्यक्ती तुमच्या सहकारात येईल व तुमची प्रतिष्ठा त्यामुळे भारीच उंचावेल. एकूण आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. नोकरीत समाधान मिळेल. शुभ दिनांक २१–२२.

महिलांना : शारीरिक स्वास्थ्य मिळून धावपळ कमी होईल.

विद्यार्थ्यांना : उत्साहाने कोणतेही काम पुरे होईल.

**तूळ : पैसा मिळेल**

सध्या तुमचे सारे तंत्र शनी-मंगळ व रवी याच ग्रहांच्या हाती आहे. यावेळी मन प्रसन्न राहील. कर्तृत्वाला नवा अर्थ प्राप्त होतो.

गुणांना नवी नवी क्षेत्रे उपलब्ध होतात. तुम्ही जर कापड व्यापारी असाल तर यावेळी तुम्हाला आणखी एखादे दुकान टाकायला हरकत नाही. तुम्ही जर सिने वा नाटचकलाकार असाल तर तुमच्या अभिनयाचे भारीच कौतुक होणार आहे. तुम्ही जर लेखक असाल तर तुमचे साहित्य लोकप्रिय होणार आहे. तुम्ही जर सार्वजनिक कार्यकर्ते असाल तर तुम्हाला मान मिळणार आहे. तुमच्यापैकी जे नोकरी करीत असतील त्यांच्या प्रमोशनचे काम मार्गी लागणार आहे. वरिष्ठांची मर्जी संपादन करू शकाल. शुभ दिनांक २४–२५.

महिलांना : नोकरीत बढती मिळून बदली होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांना : नातेवाइकांची मदत मिळून प्रसन्नता राहील.

**वृश्चिक : प्रतिष्ठा उंचावेल**

तुमचा पिंड प्रशासकाचा आहे. अशा स्वाभाविक गुणांना जर ग्रहांची जोड मिळाली तर तुमच्या दैवाला खरोखरच आनंदाचा पारावार राहाणार नाही. रवी-मंगळ राशीत ही घटनाच मुळी तुमच्या बाबतीत असामान्य म्हणावी लागेल. नोकरीत तुम्ही सध्या कोणतेही स्थान भूषवीत असा, त्या स्थानापेक्षा तुमचे स्थान निश्चित उंचावणार आहे. नोकरी खासगी असो वा सरकारी असो, प्रमोशन मिळणार आहे हे निश्चित. अनेक प्रकारचे लाभ दृष्टिपथात येतील. आर्थिक बाजू मात्र भक्कम होणे तूर्त तरी अशक्य आहे. राजकारणात पुढे पाऊल पडेल. तब्येत उत्तम राहील. शुभ दिनांक २३–२५.

महिलांना : स्थावराची प्राप्ती होण्याची शक्यता आहे. नोकरीत बढती.

विद्यार्थ्यांना : संशोधनाचे क्षेत्र उपलब्ध होईल.

**धनू : खर्चात वाढ**

तुमच्या बाबतीत आता संकट असे काही उरलेले नाही. जे काल्पनिक संकट आहे असे वाटत होते तेही आता इतिहासजमा झाले आहे. पण रवी-मंगळ योग्यस्थानी आहेत, ते आर्थिक बाजू कमकुवत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पैसा कितीही मिळो, खर्च दत्त म्हणून उभा राहत आहे. त्यामुळे तुम्ही काही काळ काटकसरीचे धोरणच तुम्ही अवलंबिणं आवश्यक आहे.नोकरीत त्रास मात्र पडायचाच आहे. ताण पडणार आहे, पण गुणांना संधी मिळेल. तुमच्या मागण्या वरिष्ठांच्या कानावर घाला, उपयोग होईल. प्रवासात अडथळे नाहीत. यावेळी तुमच्या खर्चात मात्र भलतीच वाढ होणार आहे. लेखन व साहित्य प्रसिद्ध होईल. दुय्यम धंदा चालेल. तब्येत जैसे थे अशीच राहील. शुभ दिनांक २४–२६.

महिलांना : स्वतंत्र असा एखादा धंदा करू शकाल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात लक्ष देणे जरूर आहे.

**मकर : अनपेक्षित लाभ**

तुम्ही जर रेस–लॉटरीत नेहमी भाग घेत असाल तर यावेळी तुमचे नशिब बहरून येण्याची शक्यता आहे. कारण रवी व मंगळ अकरावे आहेत. असे अकरावे ग्रह येतात तेव्हा श्रमाशिवाय संपत्ती मिळू शकते. तुम्ही यावेळी कदाचित नशिबवान ठरणार आहात. अर्थात जन्मस्थ ग्रह उच्चीचे असतील तर मग दुधात साखरच पडेल. तुम्ही नोकरीत नवे काम स्वीकारा. गुणांना वाव मिळेल. शेती–व्यापार सुधारेल. खते व स्टेशनरी यांचा जे व्यापार करीत असतील ते खूप पैसा मिळवतील. शेतीचा धंदा मनासारखी संपत्ती मिळवून देईल. चालू नोकरीत अनुकूल स्थित्यंतर घडेल. इच्छा-आकांक्षा पुऱ्या होतील. शुभदिनांक २१–२३.

महिलांना : तब्येतीतील नैराश्य दूर होईल. उत्साह द्विगुणित होईल.

विद्यार्थ्यांना : प्रवासात प्रसन्नता राहील.

**कुंभ : नोकरीत बदल**

ग्रहांच्या जगातील रवी–मंगळ दहावे ही एकच घटना तुमच्याबाबतीत प्रगतीची नवी दालने दृष्टिपथात आणायला पुरेशी आहेत. धंदा–व्यवसाय–नोकरी अगर इतर कोणतेही क्षेत्र असो, ते कार्यक्षमतेने उजळून निघणार आहे. प्रामुख्याने चालू नोकरीत बदल करण्याला इतका छान काळ नजीकच्या काळात तरी येणार नाही. तुम्ही सरकारी नोकरीत असाल तर महत्त्वाची जबाबदारी तुम्हाला स्वीकारावी लागणार आहे. प्रमोशनची वाट पाहाण्याची गरज आता संपली आहे. ते सहज मिळणार आहे. आरोग्याची गुरुकिल्ली सापडणार आहे. शेती, बँकिंग व व्यापार या क्षेत्रात हातून महत्त्वाची कामगिरी घडणार आहे. वकिली व्यवसायाला स्फूर्ती मिळेल. शुभदिनांक २३–२६.

महिलांना : नोकरीत स्थैर्य येईल. पैसा देखील बऱ्यापैकी मिळेल.

विद्यार्थ्यांना : चाकोरीबाहेरचे शिक्षण घेण्याची संधी मिळेल.

**मीन : प्रसन्नता राहील**

राशिस्वामी गुरू तिसरा पराक्रमात आहे, तर समर्थ ग्रह भाग्यस्थानी आहेत. त्यामुळे सध्या प्रगतीच्या पायावर उभे आहात. जे घडणार नाही असे वाटत होते तेच अचानक घडणार आहे. मन प्रसन्न राहील. आजूबाजूचे वातावरण समाधानकारक राहील. अनेकांचे सहकार्य मिळेल. लेखक, पत्रकार यांना प्रसिद्धी व लोकप्रियता लाभणार आहे. बेकारांना यावेळी नोकरी मिळू शकेल. ज्यांना प्रकाशनाची आवड आहे त्यांनी हा व्यवसाय सुरू करावा. त्यांना अपेक्षित यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. चालू व्यापारातील मंदी संपुष्टात येऊन नव्या उमेदीत कामाला सुरुवात होईल. परदेशी प्रवासाचे प्रयत्न यापूर्वी ज्यांचे अयशस्वी झाले असतील, त्यांचे प्रयत्न यावेळी यशस्वी होतील. शुभदिनांक २२–२४.

महिलांना : माहेरची यात्रा घडणार आहे. पैसेही मिळणार आहे.

विद्यार्थ्यांना : यावेळी मोठे यश तुमच्या पदरात पडणार आहे. □




# पॅरिस, आय् लव्ह यू : पृष्ठ ९ वरून

नंतर त्यानं पोपला आज्ञा केली. मला चर्चचा हेड म्हणून मान्यता द्या... धर्म, समाज, राज्य, साऱ्यासाऱ्यांचं नियंत्रण त्याला त्याच्या हातात हवे होते. डेव्हीडने काढलेले हे चित्र म्हणजे नेपोलियनच्या गर्वाची गाथा आहे.'

मौलिन गॅलरीतील सारी चित्रे डेव्हिडने काढलेली आहेत.

पुढच्या दारू गॅलरीत गेरीकॉचं मोठं कॅनव्हास आहे. तैलचित्रातलं 'रफ्ट ऑफ मेडुसा' बोट उद्ध्वस्त झाल्यानंतर समुद्राच्या लाटांवर हेलकावणारी एक तराफ (रफ्ट), त्यावर जीवन आणि मृत्यू ह्यांच्या सीमारेषेवर तग धरून टिकलेला मानवसमूह. पुढे समुद्राची उफाळणारी लाट नि मानवनियती-अनिश्चित, अटळ! तशातही त्यांनी आशा सोडलेली नाही. अंगातील वस्त्रं काढून ते आकाशात हालवीत आहेत. पुढचा मागच्याला हिम्मत देतो आहे. किनारा जवळ आहे. हिम्मत ठेवा. धीर धरा. कुणी गलितगात्र झालेल्यांना, थकलेल्यांना धरून ठेवीत आहेत. मानवीजीवनातील, भयंकर संघर्षनाटच चित्रात स्पष्ट आहे.

'महात्मतेच्या स्पष्ट खुणा गेरीकॉच्या कृतीत व्यक्त आहेत. पण हा महान कलावंत फारच अल्पायुष्य घेऊन् आला होता. तो डिलॉक्रॉचा समकालीन अन् मित्र होता. इथंच डिलॉक्रॉची चित्रं आहेत. वयाच्या ३३व्या वर्षी गेरीकॉ नियती आणि मानवाच्या अस्तित्वासाठी संघर्ष स्पष्ट करून काळाच्या पडद्याआड निघून गेला. '*Poor Gericault I will think of you often! I feel that yovr spirit will return from time to time and float around my work.*' डिलॉक्रॉ मित्राच्या मृत्यूचा समाचार मिळताच हळहळला होता.'

'गेरीकॉनं खूप काही दिलं असतं. तो जगायला हवा होता.'

'नशिबाचे फासे नेहमीच उलटे पडतात. हा कलावंत थेव, सुंदर होता, श्रीमंत होता. दहा वर्षांचा असतानाच ह्याच्या आईनं वरीच धनसंपदा मागे सोडली. ह्याच्या रूपावर भाळणाऱ्या किती तरी बाया त्याला भेटल्या. त्यानं बरीच प्रकरणंही केलीत. एका प्रेमभंगात मात्र तो पूर्णपणे कोलमडलाच. भयंकर दुःखी झाला. ते विसरता यावं म्हणून तो प्रवासास निघाला. रोममध्ये त्यानं मिचेलेंजेलोचं 'लास्ट जजमेंट' पाहिलं अन् तो त्या कृतीनं भारला गेला. तेव्हाच मिचेलेंजेलोची महात्मता त्याला स्पर्शून गेली. असं काही तरी भव्य चित्र काढावं, असं त्याच्या मनात होतं. १८१६ साली मेडुसा बोटीला अपघात झाला. समुद्राच्या अधेमधे ती फुटली. एकशेएकोणपन्नास असाहाय्य दाटीगर्दीनं एका तराफ्यावर जीवाच्या आकांतानं आकाशाकडे डोळे भिडवून बारा दिवस सतत समुद्राच्या लाटांवर हेलकावत होते. ही घटनाच त्याला भयंकर नाटचपूर्ण वाटली. निर्मिती आव्हानासमान वाटली. चेहऱ्यावरचे भाव वास्तविक वाटावेत, म्हणून गेरीकॉ दवाखान्यात जाऊन रुग्ण बघायचा, वेडयांच्या इस्पितळात चेहरे न्याहाळायचा. आज गेरीकॉचा उल्लेख रोमॅंटिसिझमचा उद्गाता म्हणून केला जातो.'

गेरीकॉचे रॅफ्ट ऑफ मेडुसा पाहणे ही एक आगळीच अनुभूती होती.

तिथून माया इटॅलियन-कक्षात नेते. इथं काचेच्या संरक्षित आवरणाखाली मोनालिसा गूढ गूढ हसते आहे. विच्या स्मिताने किती तरी महाभागांना वेड लावले आहे. काहींनी सारं काही सोडून ह्या कक्षात चपराश्याची नोकरी करता यावी, म्हणून फेऱ्या घातल्या आहेत. काहींनी दौलत उधळली, काहींची सुखी, हसती घरं उद्ध्वस्त झालीत. तीस बाय वीस इंचांचं हे चित्र जगातील सगळ्यात महाग वस्तूंत जमा आहे. काहीना शंका आहे-असं काय आहे ह्या चित्रात?

ह्यात नक्कीच काही तरी आहे, जे शब्दांनी नीटसं मलाही सांगता येत नाही. भीती वाटते, उद्या जर ग्रहांचे आपसात युद्ध झाले, तर विजयी ग्रहावरील प्राणी मोनालिसा आपल्या ग्रहावर घेऊनही जातील.

एरवी सगळ्या ठिकाणी कॉमेंटरी देणारी माया इथं एकदमच चूप आहे. सारखी चित्राकडे पाहते. अन् मी तिच्याकडे पाहतो आहे. माया मला मायेइतकीच, नव्हे मोनाइतकीच गूढ वाटते. रहस्यमयी वाटते.

मी विमानतळावर उभा आहे. मायानं आवर्जून म्हटलं होतं, मी निरोप द्यायला येईन. तिला द्यायला म्हणून मी हेमिंग्वेचं 'मूव्हेबल फीस्ट' आणलं आहे. पहिलंच पान मी उघडतो. तिथं लिहिलंय्-

'*... If you are lucky enough to* have lived in Paris as a young man, then wherever you go for the rest of your life, it stays with yau, for Paris is a moveable feast...'

ओर्ली (विमानतळ)च्या लाऊडस्पीकरवर सूचना दिल्या जात आहेत. एअर इंडियाचं विमान आलंय्. प्रवाशांनी कस्टम-चेककरिता लवकर हजर व्हावं...ग्रुपमधून मी एकटाच सर्वांच्या आधी परततोय्...पाहतो...माया दिसत नाही...काचेच्या पलीकडून ती धावत येताना दिसते...मीही दारापर्यंत जातो... येता येताच ती हात घट्ट दावते. धावून तिला दम लागलेला असतो. छाती वरखाली होत असते...मी पुस्तक तिच्या हातात देतो. तिनं फुलं आणली आहेत. हिरव्या पानांआड मोहरीएवढी पांढरी फुलं...लिली ऑफ दी व्हॅली...मला आठवतं, मित्रांनी आलो तेव्हा स्वागत 'लिली ऑफ दी व्हॅली' देऊन केलं होतं. जाताना निरोपही लिलीच्या फुलांनी दिला जातोय्...ती एक लहानशी पुडी हातावर ठेवते...

मी विचारतो, 'माया, हे काय?'

'पिसनलीट! वाईल्ड फ्लॉवर असतं ह्या भागात. कुठंही येतं. त्याची बीजं आहेत. भारतातल्या मातीत टाक. फुलं यावीत तिथंही...' पुन्हा अनाऊन्समेंट...जाताना मी वळून वळून मागे पाहत असतो. मायाचा हात हालत असतो.

...पॅरिस सुटतं...सुटतं कसं म्हणावं? मी तर ते सोबतच वागवतोय्. लिलीचा वास नाकात भरतो...डोळयात मायाचं रूप...

**स मा प्त**

## चुकीची दुरुस्ती

माणूस दि. १३ नोव्हेंबरच्या अंकातील श्री. विनय हर्डीकर यांच्या 'मल्लिकार्जुन मन्सूर यांचे चिरयौवन' या लेखातील २३ पानावरील 'आपल्या संगीतात........असा एक संकेत आहे.' हे वाक्य,

'आपल्या संगीतात विलंबित रचनांमध्ये शांत, गंभीर, करुण या रसांचा आणि द्रुत रचनांमध्ये शृंगार, वीर, हास्य या रसांचा, भावांचा परिपोष व्हावा असा एक संकेत आहे.' असे आहे.